# ग्यानबाची भटकंती

पुनम सिंगवी





# फणसाडचा पुष्पोत्सव









# ग्यानबाची भटकंती



लेखक

**पुनम सिंगवी**

## किंमत १५० रुपये

अंकुर प्रकाशन, ठाणे

जिथे शिक्षणातून ज्ञान उमलते

हरियाली

**ग्यानबाची भटकंती**

**पहिले मुद्रण** : **रविवार, २ जून २०१३**

**लेखन आणि निर्मिती** :
पुनम सिंगवी
५/७०२, फ्लॉवर व्हॅली
इस्टर्न एक्स्प्रेस हायवे,
ठाणे ४००६०१.
दूरध्वनी : ०९३२३२९१८९०
email : punamsingavi@gmail.com

**सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित**

**प्रकाशक आणि प्रमुख वितरक** :
**अंकुर प्रकाशन, ठाणे**
डॉ. आंबेडकर मार्ग, ठाणे (पश्चिम) - ४००६०१.
दूरध्वनी : ०२२-२५४७ ४६२२, ९९८७ ०५१५२९
website : ankurpublications.com

**सहप्रकाशक** :
**हरियाली**
२६, दादोजी कोंडदेव क्रीडाप्रेक्षागृह,
खारटन रस्ता, ठाणे ४००६०१.
email : hariyalithane@gmail.com

**मुखपृष्ठ** :
विकास फडके, ठाणे

**अक्षरजुळणी** :
**अक्षय फोटोटाइपसेटर्स**
डॉ. आंबेडकर मार्ग, ठाणे (पश्चिम) - ४००६०१.

**मुद्रक** :
राजमुद्रा प्रिंटर्स,
ए १८ - अमरग्यान औद्योगिक वसाहत,
लाल बहादूर शास्त्री मार्ग,
ठाणे (पश्चिम) - ४००६०१.

या पुस्तकामधील सर्व लेखांमधून व्यक्त झालेली मते ही लेखकाची मते आहेत. प्रकाशक त्या मतांशी सहमत असतीलच असे नाही.

’ ग्यानबाची भटकंती’ या पुस्तकाचे लेखक श्री. पुनम सिंगवी हे आहेत.  ‘अंकुर प्रकाशन’ यांनी ते २०१३ साली प्रकाशित केले. त्या पुस्तकाचे सर्वाधिकार लेखकांच्याकडे आहेत.

त्यांनी ई साहित्य प्रतिष्ठानला याचे ई पुस्तक बनवून विनामूल्य वितरित करण्याचे कायदेशीर अधिकार दिले आहेत. त्यानुसार आम्ही आमच्या वाचकांना हे ई पुस्तक विनामूल्य देत असून त्यांनी ते आपल्या ओळखीच्या वाचकांत विनामूल्य वितरित करावे ही विनंती करत आहोत.

या परवानगीसाठी आम्ही

**श्री पुनम सिंगवी,**

9323291890, email: punam.singavi@gmail.com

यांचे आभारी आहोत.

ई साहित्य प्रतिष्ठान

esahity@gmail.com

www.esahity.com

www.esahity.in

# ग्यानबाची भटकंती

## हे पुस्तक विनामूल्य आहे

## पण फ़ुकट नाही

या मागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत .

## हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिट

१ मिनिट : लेखकांना फ़ोन किंवा मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

असे न केल्यास यापुढे आपल्याला पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

दाम नाही मागत. मागत आहे दाद.

साद आहे आमची. हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यात मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा, आणि अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

# पुस्तकं वाचून कोणाला शहाणपण येतं का?

हो! आम्ही म्हणतो हो. वाचन करणारी माणसं त्यांच्याबरोबरच्या वाचन न करणाऱ्या माणसांहून अधिक प्रगल्भ आणि विचारी असतात.

अनुभवाहून मोठा गुरू नाही. कोणत्याही प्राण्याला, सजीवाला, अनुभवाने शहाणपण येतं. काही प्राण्यांना त्यांचे जन्मदाते थोडं शिक्षण देतात. बाकीचे प्राणी अनुभव घेत घेत शिकतात. फक्त मानवच असा प्राणी आहे ज्याला पुर्वीच्या पिढीतल्या माणसांचे अनुभवही शिकवतात. ते पुस्तकांद्वारे. माणसाला आपल्या सभोवताली नसलेल्या, दूर देशातल्या माणसांचे अनुभव समजून घेऊन शिकता येतं. तेही पुस्तकांद्वारे. प्रत्यक्ष अनुभवांहून चांगला शिक्षक नाहीच. पण इतरांना आलेले अनुभव, त्यांनी खाल्लेल्या ठेचा याही माणसाला शिकवतात आणि शहाणे करून सोडतात.

**अनुभव पुस्तक असतात आणि पुस्तक अनुभवच असते.**

## वाचाल तर वाचाल हे शंभर टक्के सत्य आहे.

www.esahity.in आणि www.esahity.com

मंडळी!
वाचायला तर हवंच!
पण वाचून झाल्यावर प्रतिसादायलाही हवं...
...आणि स्वतःही लिहायला हवं.

माझ्या आजवरच्या भटकंतीत
वेळोवेळी सहभागी होऊन
माझे आयुष्य समृद्ध करणारी
माझी पत्नी सौ. पुष्पलता सिंगवी,
कन्या सौ. विद्युल्लता, सौ. वीणा,
सौ. विभावरी, सौ. तृप्ती;
आणि
विस्तृत हरियाली परिवारातील
अगणित निसर्गप्रेमी मित्रांना
सप्रेम समर्पण!

– **पुनम सिंगवी**

# अनुक्रमणिका


**अ.क्र. लेखाचे शीर्षक .................................. पान. क्र**

लेखकाचे मनोगत .............................................. ६

०१ अंदमान निकोबार बेटांचा देखणा निसर्गाविष्कार ............. ०९
(रंगीत फोटो पान क्र. १, फोटो क्र. १ व २)
०२ फणसाड अभयारण्यातील पुष्पोत्सव! .......................... १६
०३ रानात फुलला बांबू .............................................. १९
(रंगीत फोटो पान क्र. १, फोटो क्र. ३)
०४ फॉल सीझन - भारतातला! ...................................... २१
(रंगीत फोटो पान क्र. २, फोटो क्र. ४)
०५ धुक्यात चाचपडणारा काशेडीचा घाट ......................... २४
०६ जलसंगीताची अनुभूती ........................................... २७
(रंगीत फोटो पान क्र. २, फोटो क्र. ५)
०७ मज लागे ध्यास 'कास'चा ...................................... २९
(रंगीत फोटो पान क्र. २, फोटो क्र. ६)
०८ वन्यजीव रक्षणासाठी अरण्यवाचन ............................. ३३
(रंगीत फोटो पान क्र. ३, फोटो क्र. ७)
०९ फणसाडचे गोड अभयारण्य ..................................... ३७
१० आदर्शवनातील गणेशसागर ....................................... ४०
(रंगीत फोटो पान क्र. ३, फोटो क्र. ८)
११ भेंडी-कामजाई-चेना परिक्रमा ................................. ४४
(रंगीत फोटो पान क्र. ३, फोटो क्र. ९)
१२ उपेक्षित विंडी आणि भूतकापरी ............................... ४८
(रंगीत फोटो पान क्र. ४, फोटो क्र. १०)
१३ डोंगर आणि काकडी ................................................ ५१
१४ महाराष्ट्राचे सुंदरबन नागला जंगल! .......................... ५५
(रंगीत फोटो पान क्र. ४, फोटो क्र. ११)
१५ ठाणे ते मुलुंड निसर्गप्रवास! ................................... ५९
(रंगीत फोटो पान क्र. ४, फोटो क्र. १२)

१६ एक आव्हान: मुंडा डोंगराचे! ................................ ६३
(रंगीत फोटो पान क्र. ५, फोटो क्र. १३)
१७ धबधब्यापलीकडचे येऊर ...................................... ६६
(रंगीत फोटो पान क्र. ५, फोटो क्र. १४)
१८ फुललेली ‘कारवी’ आणि नीरव सरोवर ..................... ७०
(रंगीत फोटो पान क्र. ५, फोटो क्र. १५)
१९ नाठाळ मानव अन् अनमोल निसर्गठेवा! .................... ७४
(रंगीत फोटो पान क्र. ६, फोटो क्र. १६)
२० चक्रावणाऱ्या अरण्यवासिनी ................................... ७८
(रंगीत फोटो पान क्र. ६, फोटो क्र. १७)
२१ बहुगुणी गुडूची अर्थात गुळवेल .............................. ८१
२२ मोहमयी द्राक्षवेल .............................................. ८३
(रंगीत फोटो पान क्र. ६, फोटो क्र. १८)
२३ जंगलातील आजीबाई ‘धावशी’ ................................ ८५
२४ घोटाळ्यात घोटाळा, वेलींचा भेंडोळा ....................... ८७
(रंगीत फोटो पान क्र. ७, फोटो क्र. १९)
२५ झाकलं माणिक ................................................ ९०
(रंगीत फोटो पान क्र. ७, फोटो क्र. २०)
२६ सृष्टीचे मूलाधार ................................................ ९२
(रंगीत फोटो पान क्र. ७, फोटो क्र. २१)
२७ नवसंजीवनी देणारा मुंडा डोंगर ............................... ९४
(रंगीत फोटो पान क्र. ८, फोटो क्र. २२)
२८ दिंडेश्वर महादेव अन् वृक्षपंढरी ............................... ९७
(रंगीत फोटो पान क्र. ८, फोटो क्र. २३)
२९ रानवणवे(?) आणि वृक्षलागवड .......................... १००
(रंगीत फोटो पान क्र. ८, फोटो क्र. २४)

## मुखपृष्ठावरील फोटो

१) मानस मंदिर, शहापूर, जि. ठाणे २) शिवथर धबधबा, जि. रायगड
३) भातसा नदीचे उगम स्थान, कसारा-इगतपुरी घाट, जि. ठाणे
४) अंदमानच्या सेल्युलर जेलमधील ‘कोलू’
५) सेल्युलर जेलचे रात्री दिसणारे बाह्य दृश्य



# लेखकाचे मनोगत

मला विद्यार्थिदशेपासूनच भटकंतीचा विलक्षण नाद होता आणि आज वयाच्या ७१व्या वर्षीदेखील तो तसाच टिकून आहे. ही भटकंती करत असताना निसर्गनिरीक्षणावर माझा विशेष भर असतो. असे म्हणतात की, निसर्गाएवढा प्रभावी गुरू दुसरा कुणी नाही आणि ज्ञान मिळविण्याचे निरीक्षणासारखे दुसरे प्रभावी साधन नाही. मी ह्या दोन्ही गोष्टींचा पुरेपूर अनुभव घेत आलो आहे.

या निरीक्षणातूनच मिळाली मला स्फूर्ती पर्यावरणरक्षणाच्या क्षेत्रात रचनात्मक कार्य करण्याची. 'हरियाली' या नामांकित संस्थेची निर्मिती ही त्याचीच परिणती होय.

आपल्या परिसरातील पर्यावरणाचे रक्षण करायचे, तर आपल्याला आपल्या परिसराची संपूर्ण माहिती हवी. त्यासाठी आपण करायला हवी आपल्या परिसरात भरपूर भटकंती ही माझी धारणा आहे. त्यामुळेच मी ठाणे-मुंबई परिसरातील भ्रमंतीवर भरपूर भर दिला. मात्र त्याचबरोबर देश-विदेशातदेखील माझे कुटुंबीय आणि इतर मित्रमंडळी यांच्या समवेत नित्त्यनियमित प्रवास करत आलो.

अशी भटकंती आणि प्रवास करत असताना त्यावर आधारित भरपूर लेखन करत गेलो. असे हे लेख लोकसत्ता, महाराष्ट्र टाइम्स, मुंबई सकाळ, मुंबई तरुण भारत, सन्मित्र ठाणे, आदी वृत्तपत्रांमधून वेळोवेळी प्रसिद्ध झाले आहेत. प्रस्तुतचे पुस्तक हे अशा देशांतर्गत भटकंतीवर लिहून प्रसिद्ध झालेल्या लेखांचा संग्रह होय. अशी सर्व वृत्तपत्रे व त्यात कार्यरत असणाऱ्या पत्रकारमित्रांच्या सौजन्याने आणि त्यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त करत हे पुस्तक वाचकांच्या सेवेत रुजू करत आहे. लेखांसोबत प्रसिद्ध झालेली बव्हंश छायाचित्रे अस्मादिकानेच काढलेली असून मुळातील काही छायाचित्रे बदललेली असण्याची शक्यता आहे. काही छायाचित्रे भटकंतीतील इतर सहकारी श्री. रवींद्र भागवत, जयंत नागावकर आदींच्या कॅमेऱ्याने टिपलेली असण्याची शक्यता आहे. या सर्व छायाचित्रांनी लेखातील शब्दांना निःसंशयपणे अधिक अर्थपूर्ण केले आहे.

ही 'भटकंती' म्हणजे नुसतेच चालत जाणे नसायचे. त्यात प्रामुख्याने त्या-त्या ठिकाणचा निसर्ग, वृक्ष, वेली, पाखरे, भौगोलिक परिस्थिती सर्वसामान्य माणसाचे जीवन आदींचे निरीक्षण असे. सर्वसामान्य दृष्टीतून त्यांचे वेगवेगळे कंगोरे टिपले जात. त्या सर्वांवर आधारित भाष्य आपल्याला या लेखांमध्ये आढळेल. म्हणूनच त्याचे शीर्षक 'ग्यानबाची भटकंती' असे देणे आम्हांला उचित वाटले. हा 'ग्यानबा' म्हणजेच आजचा 'आम आदमी' होय असे म्हणायला हरकत नाही.

माझ्या या भटकंतीत वेळोवेळी सहभागी होत गेलेले माझे कुंटुंबीय आणि अनेकानेक मित्र यांच्यामुळेच माझी ही भटकंती अनुभवसंपन्न होत गेली. ठाणे परिसरातील भटकंतीत माझे हरियालीतील सहकारी श्री. सुनील चौधरी, भास्कर भोईर, अप्पा जमदाडे, रमेश आणि विलास देशपांडे, सौ. समझ व डॉ. राजपूत, सौ. स्मिता व श्री. अशोक जोग, प्राचार्य डॉ. माधुरी पेजावर, हेमकांत गुप्ते, डॉ. मंगला बोरकर, सौ. व श्री. आशुतोष आठवले, प्रभाकर बांदेकर यांचा सहभाग प्रामुख्याने असे; तर देशांतर्गत इतर ठिकाणच्या भटकंतीत प्राचार्य अच्युतराव ओक, सौ. व श्री. नितीन खरे, सौ. व प्राचार्य लक्ष्मणराव भोळे, सौ. व. श्री. रमेश केळकर, सौ. व श्री. रत्नाकर जावडेकर आदी आघाडीवर असतात. ठाणे-मुंबई परिसरातील रानावनांतून झालेल्या भटकंतीसाठी ठाणे वन वृत्तान्त (प्रादेशिक व वन्यजीव) तसेच संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाचे सर्व वनाधिकारी आणि अन्य कर्मचारी यांचे सहकार्य व मार्गदर्शन आम्हांला नेहमीच मिळत आले.

या पुस्तकाची सर्वांगसुंदर छपाई करण्याचे व ते वेळेनुसार प्रकाशित करण्याचे श्रेय राजमुद्रा प्रिंटर्सचे श्री. राजन फडके, अंकुर प्रकाशनाचे श्री. अरुण व दीपक फडके, कलाकार श्री. विकास फडके व या सर्वांचे सर्व सहकारी कर्मचारी यांच्याकडे जाते.

तसेच पुस्तकाचे सहप्रकाशक होण्यास हरियालीतील माझ्या सर्व सहकाऱ्यांनी एकमुखी मान्यता दिली.

या सर्वांप्रती मनःपूर्वक कृतज्ञता व्यक्त करण्यात मला विशेष आनंद होत आहे.

आमची विदेश भटकंती ही प्रामुख्याने आमच्या कन्या व त्यांच्या परिवारासमवेत होत असते. त्या भटकंतीवर आधारित लिहून प्रसिद्ध झालेल्या लेखांचा संग्रह लवकरच प्रकाशित करण्याचा मानस आहे.

भटकंतीत रमणाऱ्या सर्व निसर्गप्रेमी नागरिकांना व विद्यार्थिमित्रांना या लेखसंग्रहातील माहिती व वर्णन उपयोगी पडेल अशी मी आशा करतो.

**पुनम सिंगवी**
**punamsingavi@gmail.com**

# लेखकाचा संक्षिप्त परिचय



'पुनम सिंगवी' (पुनमचंद उत्तमचंद सिंगवी) हे शिक्षणाने आणि व्यवसायाने चार्टर्ड अकाउन्टन्ट. सुमारे बारा वर्षे मुंबई येथील पोदार आणि मुलुंड कॉलेज ऑफ कॉमर्स येथे अध्यापन. लघुउद्योग प्रकल्पांच्या निर्मितीत प्रमुख सहभाग. स्पन पाइप्स मॅन्युफॅक्चरर्स ॲसोसिएशन ऑफ महाराष्ट्र या संस्थेच्या 'स्पन पाइप' या मासिकाचे संस्थापक-संपादक. मुलुंड जिमखाना आणि हरियाली या सेवाभावी संस्थांचे जनक.

मध्यमवर्गीय, सुशिक्षित, सुसंस्कृत शेतकरी-उद्योजक कुटुंबात जन्म. प्राथमिक शिक्षण धुळे जिल्ह्यातील फागणे येथील जिल्हा परिषदेच्या शाळेत, माध्यमिक शिक्षण धुळे येथे व महाविद्यालयीन शिक्षण मुंबईसारख्या ठिकाणी. त्यामुळे व्यक्तिमत्त्व सव्यसाची होण्यास मदत.

शालेय जीवनापासूनच भटकंती आणि रचनात्मक सामाजिक कार्य यांची आवड. भटकंतीच्या आवडीतून जोडले गेले पर्यावरणरक्षणाच्या रचनात्मक कार्यात. ठाणे परिसरातील पर्यावरणाविषयक जनजागृती निर्माण करण्यात सिंहाचा वाटा.

हरियालीच्या माध्यमातून लाखो वृक्षांची लागवड करण्यात प्रमुख सहभाग. पर्यावरणरक्षण, भटकंती आदी विषयांवर विपुल वृत्तपत्रीय लिखाण. ठाणे गौरव, ठाणे नगररत्न, व्यासरत्न, वसुधा महाबळ पुरस्कार आदी विविध पुरस्कारांचे व सन्मानांचे मानकरी. महाराष्ट्र राज्याच्या वनविभागातर्फे मानद वन्यजीव रक्षक म्हणून सन्मानित. वनविभाग आणि ठाणे महानगरपालिकेच्या विविध समित्यांवर सेवाभावी सामाजिक संस्थांचे प्रतिनिधी म्हणून कार्यरत.

-- -- --

# अंदमान निकोबार बेटांचा देखणा निसर्गाविष्कार



भारताच्या मुख्य भूमीपासून दक्षिण-पूर्वेला (आग्नेयेला) सुमारे २०० किलोमीटर सामुद्री अंतरावर बंगालच्या उपसागरात हिंदी महासागराच्या अगदी तोंडाशीच सुमारे ६७२ लहानमोठ्या बेटांचा एक अतिसुंदर समूह आहे, जो भारतीय संघराज्याचाच भाग आहे. इतिहासाची थोडीफार जाण असलेल्या सर्वसामान्य भारतीयांस अंदमान परिचित आहे, ते 'काळे पाणी' आणि ब्रिटिश क्रौर्य यांचे स्मारक म्हणूनच. कारण स्वातंत्र्यपूर्व काळात भारतावर इंग्रजांची सत्ता असताना महत्त्वाचे स्वातंत्र्यसेनानी आणि जन्मठेप व फाशी अशी शिक्षा मिळालेले अनेक कैदी यांना तेथील सेल्युलर जेलमध्ये ठेवले जात असे. महाराष्ट्रातील क्रांतिकारकांचे अग्रणी स्वातंत्र्यवीर सावरकर यांना दुहेरी जन्मपेठेची शिक्षा पुकारण्यात आल्यानंतर याच तुरुंगात ठेवण्यात आले होते. येथे असतानाच त्यांच्या बऱ्याच ज्वलंत साहित्य-काव्याची निर्मिती झाली होती. त्यामुळे सर्वसामान्य मराठी माणसाचे अंदमानशी एक अतिशय जवळचे भावनिक नाते आहे.

अलीकडेच अंदमान प्रामुख्याने प्रकाशात आले, ते डिसेंबर २००४मध्ये कोसळलेल्या त्सुनामीच्या संकटामुळे. हिंदी महासागरातील ही बेटे, इंडोनेशिया, श्रीलंका आदी देशांमध्ये त्सुनामीमुळे प्रचंड प्रमाणावर जीवितहानी व आर्थिक हानी झाली होती. महासागराच्या तळाशी झालेल्या काही भौगोलिक घडामोडींमुळे समुद्रावर प्रचंड वादळ निर्माण झाले. त्यात मोठ्या प्रमाणावर लाटा उफाळल्या. समुद्राने जमिनीवर आक्रमण केले आणि क्षणार्धात 'होत्याचे नव्हते' आणि 'नव्हत्याचे होते' झाले. हा फटका इतका जबरदस्त होता की, येथील सबंध रॉस बेटच गॅसच्या शेगडीवर ठेवलेल्या कढईप्रमाणे एका बाजूने पाण्याखाली दबले जाऊन दुसऱ्या बाजूने चक्क वर उचलले गेले. आजही खालच्या दिशेने कलंडल्या गेलेल्या किनाऱ्यावरील पडझड झालेली घरे आणि ताडामाडाचे असंख्य जिवंत वृक्ष एका बाजूने तिरके झालेले दिसून येतात. अनेक बेटांवर नव्याने खाचरे निर्माण झाली.

समुद्रकिनाऱ्यालगत अनेक वृक्ष मुळासकट उखडले जाऊन जागोजागी इतस्ततः उन्मळून पडले. त्यामुळे अनेक पर्यावरणीय बदल झालेले दिसतात. याचे सगळे परिणाम लक्षात यायलाच मुळी अनेक वर्षांचा कालावधी लागेल. बेटांवरील मानवी जीवन आता पुन्हा नियमित सुरू झाले आहे आणि ते तसे व्हायलाच हवे, नाही का?

आज ही बेटे भारतीय संघराज्याचा भाग बनून आहेत याचे श्रेयदेखील निर्विवादपणे ब्रिटिशांनाच द्यायला हवे. त्याचे कारण असे की, सतराव्या ते एकोणिसाव्या शतकांच्या दरम्यान युरोपातील वेगवेगळ्या देशांतील व्यापारी टोळ्या (होय, टोळ्याच!) समुद्रमार्गाने जगभर प्रवास करत असताना, तोवर उजेडात न आलेल्या अनेक सामुद्री बेटांवर जाऊन तिथे आपले बस्तान बसवत होत्या. तेथील मूळ आदिवासी आणि इतर लोकांशी कधी व्यापार, वाटाघाटी, तर प्रसंगी लढाया करत तिथे आपली राजकीय सत्तादेखील वाढवत होत्या. त्यांत प्रामुख्याने डच, पोर्तुगीज, फ्रेंच आणि इंग्रज लोकांचा समावेश होता. आपल्या आरमारी शक्तीमुळे या लोकांनी अमेरिका, आफ्रिका आणि अनेक बेटे आणि द्वीपकल्पांवर आपापल्या वसाहती आणि सत्तास्थाने निर्माण केली. त्यामुळेच त्यांना महासत्तांचे रूप प्राप्त झाले.

याच तऱ्हेने सुमारे १७६७च्या सुमारास डच लोक अंदमान-निकोबारमध्ये पोहोचले. मात्र त्यांचे तिथे नीट बस्तान बसायच्या आधीच ब्रिटिश-ईस्ट इंडिया कंपनीतील लोक तिथे पोहोचले. डच लोकांना तेथून हुसकावून लावित त्यांनी त्या बेटांचा कब्जा घेतला. त्याच सुमारास त्यांनी भारतातही हातपाय पसरायला सुरुवात केली होती. त्यामुळे भारताच्या दक्षिण आणि पूर्व किनाऱ्यांवरील केरळ, तामिळनाडू, आंध्र आणि बंगाल राज्यांतून मजूर आणून येथील मूळ आदिवासी लोकांशी मुकाबला करत त्यांनी एकेका बेटावर जम बसवायला सुरुवात केली. त्यामुळे येथील सर्वच बेटांची नावे ब्रिटिश व्यापारी आणि राज्यकर्त्यांशी जोडली गेलेली दिसतात. उदाहरणार्थ रॉस, हॅवलाक, हॅवलेट, रॉथम, स्मिथ इत्यादी.

दुसऱ्या महायुद्धाच्या १९४२ ते १९४५ या काळात जपानी लोकांनी ही बेटे इंग्रजांकडून हिसकावून घेतली व तेथे आपले राज्य स्थापले. याच कालावधीत भारताचे स्वातंत्र्यसेनानी नेताजी सुभाषचंद्र बोस येथे येऊन स्वातंत्र्याची ज्योत चेतवून गेले. १९४५मध्ये दुसऱ्या महायुद्धाची अखेर

झाल्यानंतर या बेटांचा ताबा पुन्हा ब्रिटिशांकडे आला. त्यानंतर १९४७मध्ये भारताला इंग्रजी सत्तेकडून स्वातंत्र्य मिळाल्यानंतर मात्र ही बेटेदेखील भारताच्या ताब्यात येऊन आज ती आपल्या संघराज्याचा अविभाज्य भाग बनून राहिली आहेत.

सदाहरित वृक्ष–वनस्पती आणि विलक्षण सुंदर सामुद्री जैविक संपत्तीने खचाखच भरलेल्या या निसर्गसंपन्न बेटांवरील वनसंपदेचे हरण इंग्रज लोक प्रचंड प्रमाणावर करत होते. त्यासाठी त्यांनी, त्या काळातील प्रचंड म्हणता येईल अशा, एका सॉ मिलची उभारणी इथे केली. तिचे नाव 'रॉथम सॉ मिल'. जंगलातील तोडलेले वृक्ष समुद्रकिनाऱ्यावरील बोटीपर्यंत आणण्यासाठी हत्तींचा उपयोग केला जाई. (आजही तो तसाच केला जातो.) तिथून पुढे समुद्रकिनाऱ्यावरील सॉ मिलपर्यंत व नंतर मोठ्या मालवाहू बोटींनी इंग्लंडपर्यंत ही संपत्ती वर्षानुवर्षे वाहून नेली जात असे.

संपत्ती हरण करण्यासाठी, तसेच भारतातील स्वातंत्र्यसैनिकांना आणि इतर गुन्ह्यांसाठी जन्मठेप, फाशी आदी प्रकारची शिक्षा झालेल्या खतरनाक गुन्हेगारांना कैद करून ठेवण्यासाठी ब्रिटिशांनी या बेटांचा उपयोग केला. नाममात्र भोजनावळ देऊन त्या कैद्यांकडून अनेक प्रकारची शारीरिक श्रमांची कामे करवून घेतली जात असत. त्यांना अतिशय क्रूरतेने वागवले जात असे. या कैदेतून पळून जायच्या त्यांच्या वाटा बंद झालेल्या असत. तसेच बाहेरच्या जगाशी असलेला त्यांचा सपर्कदेखील नष्ट होत असे. या बेटसमूहांची राजधानी असलेल्या पोर्ट ब्लेअर या प्रमुख बंदरावरील सेल्युलर जेलमध्ये या बंदिवानांना ठेवले जात असे. तळमजला धरून एकूण तीन मजले असलेले हे कारागृह त्याच्या केंद्रस्थानी असलेल्या कार्यशाळेपासून सप्तकोनी बराकींत विभागले होते. त्यांतील तीन बराकी आजही शाबूत असून कारागृहाच्या या वास्तूत स्वातंत्र्यसैनिकांचे स्मारक उभारले गेले आहे. इथे तुरुंगवास भोगलेल्या सर्व स्वातंत्र्यसैनिकांची छायाचित्रे एका दालनात त्यांच्या अल्प परिचयासह लावण्यात आलेली आहेत. दुसऱ्या एका दालनात नेताजी सुभाषचंद्रांच्या जीवनातील प्रमुख घटना आणि आठवणींचे चित्रण करण्यात आलेले आहे. स्वातंत्र्यवीर वि. दा. सावरकरांचे वास्तव्य असलेली खोली आवारात शिरल्यानंतर उजव्या हाताकडील बराकीतील तिसऱ्या मजल्यावरील कोपऱ्यात आहे. याच खोलीच्या भिंतीवर स्वातंत्र्यवीर सावरकरांनी

कोळशाच्या साहाय्याने आपल्या अजरामर झालेल्या काव्याची निर्मिती करून ठेवली होती. आज मात्र या भिंती रंगरंगोटी करून स्वच्छ ठेवलेल्या दिसतात. कारागृहातील बंदिवानांकडून करून घेतल्या जाणाऱ्या कामाची, तसेच त्यांना ज्या अमानुष पद्धतीने वागवले जात असे त्याची प्रतीके कार्यशाळेत ठेवलेली आहेत. 'कोलू' नावाने ओळखला जाणारा तेलाचा घाणा येथे आहे. ज्यावर कैद्यांना फाशी दिले जात असे तो वधस्तंभ बाहेर दुसऱ्या एका कोपऱ्यात आहे. फासावर लटकविण्याच्या आधी कैद्यांनी करायच्या अंतिम धार्मिक विधीसाठीचे दालनही येथे आहे. एकेका वेळी तीन-तीन कैद्यांना फासावर लटकवण्याचे फासही वधस्तंभावर लटकताना दिसतात. सध्या या कारागृहाच्या आवारात रोज संध्याकाळी ४.३० वाजता इंग्रजीतून आणि ५.३० वाजता हिंदीतून सुमारे अर्ध्या तासांचे कार्यक्रम दृक्श्राव्य माध्यमातून दाखवले जातात. त्यांतून ब्रिटिश क्रौर्याचे मूर्तिमंत चित्रण आपल्यासमोर ठेवले जाते. तसेच स्वातंत्र्यसैनिकांनी केलेला स्वार्थत्याग आणि बलिदान यांची आठवण करून दिली जाते.

मात्र आज परिस्थिती बदललेली आहे. इथे येणाऱ्या पर्यटकांनी, विशेषतः तरुणांनी, ब्रिटिश क्रौर्याच्या या इतिहासातून बाहेर पडून या बेटसमूहांचे जैविक आणि भौगोलिक महत्त्व समजून घ्यावे आणि त्यांचे जतन करण्यावर अधिक लक्ष केंद्रित करायला हवे, असे मला प्रकर्षाने वाटते. इतिहासातील बलिदान व स्वार्थत्याग यांतून योग्य तो बोध घेत उद्याचा भारत घडवण्यासाठी या बेटांचा योग्य प्रकारे उपयोग करून घेणे महत्त्वाचे आहे.

भारताच्या मुख्य भूमीच्या तीन बाजूंना असलेल्या प्रचंड समुद्रालगत कुठेही आढळून न येणारी, प्रवाळयुक्त संपन्न जैविक सृष्टी इथल्या जवळपास सर्वच बेटांलगत आढळून येते. किनाऱ्यालगतच्या उथळ समुद्रातील पाण्यात शिरून समुद्राच्या अंतरंगांचा वेध घेणे हा एक महाविलक्षण आनंद देणारा अनुभव असतो. त्यासाठी आपल्याला पाण्यात पोहता यायलाच हवे असे नाही. येथील कुशल नावाडी 'डुंगी' नावाच्या लहानशा होडग्यातून आपल्याला पाण्यात उतरवून ही अनोखी सफर अतिशय सुरक्षितपणे घडवून आणतात. फक्त आपण मनात कुठल्याही प्रकारची भीती न बाळगता ते देत असलेला जुजबी 'स्नॉर्केलिंग किट' चेहऱ्यावर चढवायचा. यात आपले नाक आणि डोळे यांवर चढवायचा ॲक्रेलिक मुखवटा असतो. त्याचबरोबर तोंडात घालून ओठांनी

धरून ठेवायची आडवी चकती आणि तिला जोडलेली एक छोटीशी नळी असते. आपण पाण्याखाली शिरल्यानंतर हे नळकांडे पाण्याच्या पृष्ठभागापेक्षा थोडे वर राहते. त्याचा उपयोग आपल्याला तोंडाद्वारे श्वास घेण्यासाठी होतो. आपण श्वासोच्छ्वास नाकाने न करता तोंडाने करायचा असतो. दोन–चार मिनिटे आपण ही क्रिया करायची सवय केली की सारे काही व्यवस्थित जमून येते. पोहायला न येणाऱ्यांनी– किंबहुना साऱ्यांनीच–पाण्यावर तरंगत राहायला मदत होण्यासाठी नवाड्यांकडूनच मिळणारी गोल व पोकळ रबरी ट्यूब वापरायला हरकत नसते. खरेतर यांबरोबर संपूर्ण शरीर झाकणारा, खास समुद्राखाली विहार करण्यासाठी वापरायचा सामुद्री पोषाख आणि सुरक्षित बूटदेखील वापरायला मिळाले, तर उत्तम. परंतु किनाऱ्यालगतच राहून छोटीशी सफर करणाऱ्यांचे त्यावाचून काही अडत नाही. ते कुशल नाखवा आपला हात धरूनच आपल्याला ही पाण्याखालील सफर घडवतात. ते करत असतानाच पाण्याखालील रंगीबेरंगी प्रवाळयुक्त खडक, वनस्पती, इतर लहानमोठे प्राणी, मासे आदींची नावे सांगत त्यांचा परिचय करून देतात. आपण फक्त त्यांचा हात धरून (किंबहुना तेच आपल्या हाताला धरून दिशा देत असतात!) बिनधास्त विहार करत राहायचे. शक्य असेल त्या सर्वच लहानथोरांनी अंदमानात गेल्यावर हा विलक्षण अनुभव घ्यायलाच हवा. एरवी दूरदर्शनवर दिसणारी 'नॅशनल जिओग्राफिक चॅनल'वरील समुद्री सृष्टी इथे जिवंत होते आणि आपण असतो त्यातील नायक!

अद्भुत समुद्री सृष्टीबरोबर इथे अनुभवायला मिळते, ते विषुववृत्तीय प्रदेशातील बारमाही वनसंपदेचे विपुल भांडार! अनेक प्रकारच्या औषधी वनस्पती, मसाल्याच्या पदार्थांचा झाडोरा, ताड–माड–सुपारी आणि इतर असंख्य वृक्षांनी येथील वने समृद्ध आहेत. विविध प्रकारची फुलपाखरे, कीटक आणि अन्य वन्य प्राणी या जंगलांमधून संचार करत असतात. या जंगलांमध्ये मूळ वस्ती असलेले जावरा जमातींचे मोजकेच लोक शिल्लक राहिलेले असून या बेटांच्या मध्य–पश्चिम ते उत्तर किनाऱ्यांलगतची वने त्यांच्यासाठी सुरक्षित ठेवली गेली आहेत. त्या बेटांवर जायला प्रवाशांना परवानगी नसते.

हिंदी महासागरावर नियंत्रण ठेवण्याच्या दृष्टीने तर या बेटांचे खूपच महत्त्व आहे. त्यामुळेच भारताच्या सुरक्षेच्या दृष्टीने भारत सरकारने आपली आरमारी ताकद इथे केंद्रित केलेली आहे.

या बेटांचा विकास करताना त्यांच्या या वैशिष्ट्यपूर्ण स्थानाचे आणि समृद्ध वनसंपदेचे, समुद्री रत्नभांडाराच्या संशोधनाचे रक्षण करण्याचेच लक्ष्य समोर ठेवायला हवे. पर्यावरणास घातक ठरतील असे कुठलेही उद्योगधंदे सुरू करण्यापेक्षा पर्यावरणीय निरीक्षण, संशोधन, संरक्षण आणि सुधारणा करण्यासाठी शिक्षण देणाऱ्या जागतिक दर्जाच्या संस्था आणि विद्यापीठांची निर्मिती करण्यावर भर द्यायला हवा. हवामान व अवकाश निरीक्षणाच्या दृष्टीनेदेखील या संस्था विकसित व्हायला हव्यात. पर्यटन उद्योगासदेखील चालना देता येण्यासारखे खूप आहे. मात्र अशा पर्यटन विकासास जाणीवपूर्वक व कटाक्षाने विशिष्ट दिशा देणे आवश्यक आहे. त्यासाठी पंचतारांकित आणि डिस्को संस्कृती फोफावू न देता निसर्गाशी संवाद साधण्यासाठी येणारे निसर्गप्रेमी व विद्यार्थी यांना उत्तेजन देणे आवश्यक आहे. भारत सरकार या दृष्टीने प्रयत्न करत असले, तरी हे काम अधिक जोमाने, वेगाने आणि जाणीवपूर्वक होणे आवश्यक आहे, असे आग्रहपूर्वक म्हणावेसे वाटते.

आजचे चित्र मात्र फारसे आशादायक नाही. इथे येणारे प्रवासी अधिकांश भारतीय, बांगलादेशी आदी असल्यामुळे 'जाऊ तिथे कचरा टाकू' या आपल्या ब्रीदाचे ते अत्यंत कटाक्षाने पालन करताना दिसून येतात! येथील 'वायपर आयलँड' म्हणजे प्लॅस्टिकच्या कचऱ्याचा प्रचंड उकिरडा झालेला आहे! आम्ही गेलो त्याच आठवड्याच्या सुरुवातीस भारताच्या राष्ट्रपती श्रीमती प्रतिभाताई पाटील येऊन गेल्यामुळे त्या जिथे-जिथे जायच्या होत्या, ती बेटे मात्र चकाचक केलेली दिसत होती! एवढी चकाचक की, त्या चकाकीसाठी अनेक वृक्षांनादेखील भुईसपाट करण्यात आल्याचे कळले!

महात्मा गांधी नॅशनल पार्क असलेल्या बंडूर नामक सुंदर बेटावर ताई जायच्या होत्या. तिथे जायला पोर्ट ब्लेअरवरून उत्तम डांबरी रस्ता (मोटारीने फक्त अर्धा तास प्रवास असलेला) आहे. तरीदेखील तेथील किनाऱ्यावर त्यांच्यासाठी छोटेसे हेलिपॅड तयार करण्यात आले होते. त्या समुद्र किनाऱ्यावर एकीकडे त्सुनामीमुळे मुळासकट उन्मळून पडलेले वृक्ष दिसत होते. त्यांच्याच जोडीला हे हेलिपॅड तयार करण्यासाठी तोडल्या गेलेल्या सुमारे शंभर-एक ताड-माड आदी वृक्षांचे बुंधेदेखील प्रकर्षाने लक्ष वेधून घेत होते.

हे होऊ नये असे आम्हांला कितीही मनापासून वाटत असले, तरी अजून काही वर्षेतरी आपल्या देशात हे असेच होत राहणार आहे हेसुद्धा तेवढेच स्वच्छ दिसते आहे.

म्हणूनच म्हणतो, अंदमानमधील बेटांचे दादर, गिरगाव, जुहू चौपाटी यांत आणि तेथील वनांचे गृहसंकुलात रूपांतर व्हायच्या आधीच ते टाळण्याच्या प्रयत्नांना सुरुवात करा. शक्य असेल त्यांनी स्वतः एकदा तिथे भेट देऊन त्या निसर्गाचा आनंद अनुभवावा. आपल्या मुलाबाळांना तिकडे सहलीवर पाठवून त्यांना बेटांचा अभ्यास-निरीक्षण-रक्षण-संवर्धन करण्याची संधी द्यावी आणि त्यासाठी उत्तेजन द्यावे. त्यातूनच होणार आहे त्यांचे रक्षण आणि त्यांचा विकास!

आज मात्र तिथे जाणे खूपच खर्चाचे आहे. (हाँगकाँग-बँकॉक-सिंगापूर आदी ठिकाणी जाऊन येणे त्यापेक्षा थोडे स्वस्तच आहे!) तिथे जाण्यासाठी आज चेन्नईहून विमानाने सुमारे अडीच तास आणि बोटीने दोन दिवस लागतात. कलकत्त्याहूनदेखील विमानाने जाता येते. ही बेटे भारताचेच अविभाज्य अंग असल्याने भारतीय नागरिकांना तिथे जायला पासपोर्ट, व्हिसा आदींची आवश्यकता नसते. राहायची सोय खिशाच्या आकारमानाप्रमाणे होते. इतर सगळी व्यस्था उत्तमपैकी होऊ शकते. दक्षिण भारत ते उत्तर भारत कोण्याही चवीचे भोजन व इतर खाद्यपदार्थ उपलब्ध होऊ शकतात.

कन्याकुमारीच्या बाजाराप्रमाणेच इथल्याही बाजारात शंख-शिंपले, नारळाच्या कवट्या आदींपासून तयार केलेल्या विविध वस्तूंनी खचाखच भरलेली दुकाने असतात.

अंदमान बेटातील सेल्युलर कारागृहाप्रमाणेच समुद्रिका, सागरिका, ॲन्थ्रॉपॉलजिकल म्युझियम यांना भेट द्यायलाच हवी.

दिशा : मे २००८



# फणसाड अभयारण्यातील पुष्पोत्सव!

मुंबईपासून सुमारे दीडशे किलोमीटरवर असलेले रायगड जिल्ह्यातील फणसाड अभयारण्य अलीकडे वन्यजीवप्रेमींचे आकर्षण ठरू लागले आहे, ते तिथे असणाऱ्या गिधाडे, शेकरू खार, इतर बरेच पक्षी, फुलपाखरे, सरपटणारे प्राणी इत्यादींमुळे. मात्र महाराष्ट्रातीलच नव्हे, तर सबंध भारतातील इतरही अभयारण्यांप्रमाणेच फणसाडमधील वन्यजीवांच्या प्रकारात व संख्येत वर्षानुवर्षे घटच होत आहे. वन्यजीवांना अभय मिळावे म्हणून वनांना अभयारण्यांचा दर्जा दिला जातो. मात्र दुर्दैवाने केवळ असा दर्जा दिल्यामुळे तेथील वन्यजीवांचे रक्षण होत आहे अथवा त्यांच्या संख्येत वाढ होत आहे असे कुठे दिसत नाही. असे होण्यासाठी मोठ्या प्रमाणावर जनजागृती व जनसहभाग यांची आवश्यकता असते, याची अधिकाधिक जाणीव संबंधितांना होत आहे; ही एक आनंदाची बाब होय.

मला मात्र फणसाड अभयारण्य भावते, ते तेथील दुर्मीळ होत चाललेल्या वन्य जीवांमुळे नाही, तर अजूनही बऱ्यापैकी शाबूत असलेल्या तिथल्या झाडोऱ्यामुळे. सदाहरित आणि पानगळी वृक्षांचे अतिशय मनोहारी मिश्रण या जंगलात आपल्याला बघायला मिळते. त्यामुळेच येथील जंगलात पाणी मुरण्याचे आणि साठून राहण्याचे प्रमाणही अजून बऱ्यापैकी आहे. इकडे पाणवठ्यांचा उल्लेख 'गाण' असा केला जातो. फणसाडगाण, चिखलगाण, धरणगाण इत्यादी येथील प्रमुख पाणवठे आहेत.

सध्या या अभयारण्यात वृक्षवेलींचा सुरेख 'पुष्पोत्सव' सुरू आहे. कुठल्याही महिन्यात या, इथे दहा-वीस वृक्षवेली सुंदर-सुंदर फुले धारण करून असतात. सध्या सीता-अशोक, सुरंगी, लोखंडी, खरसिंग, बेहेडा इत्यादी वृक्ष, तसेच करवंद, उक्षी, रानजाई आदी झाळी आणि वेली यांनी फुलोरा धारण केलेला आहे. माझ्या माहितीप्रमाणे सीता-अशोक, सुरंगी आणि लोखंडी या सदाहरित वृक्षांची बने फणसाड आणि संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाशिवाय संपूर्ण भारतात इतरत्र कुठेच नाहीत. मार्च महिना याच

फुलांचा! फुललेले पळस, पांगारा, सेवरी आपल्याला सर्वत्रच दृष्टीस पडतात. मात्र सीता–अशोक, सुरंगी, लोखंडी आदी वृक्ष–फुलांचा स्वर्गीय आविष्कार बघायला इथेच यायला हवे! सोबतच्या सुंदर छायाचित्रांवरून आपल्याला त्याची थोडीतरी कल्पना यावी! सुरंगीची फुले अतिशय मोहमयी, मादक सुगंध धारण करणारी, अगदी फांद्यांलगत येणारी! वृक्षाखालून जात असलात, तर प्रथमदर्शनी दृष्टोत्पत्तीस न पडणारी, पण नासिकांना जाणवणारी! मात्र एकदा का आपण वर नजर करून या वृक्षाच्या फांद्यांकडे लक्षपूर्वक बघितले की त्याच्या गच्च पुष्पसंभाराची कल्पना येते. याच्या सुकलेल्या कळ्यांना नागकेशर, रातू नागकेशर म्हणून ओळखले जाते. फुलांचा अर्क काढून तो ज्वराच्या रोग्याचे अंग धुण्यासाठी वापरतात.

लोखंडीची फुलेही मादक सुगंध धारण करणारी, वरून पांढुरकी आणि देठाशी लाल–केशरी रंगाची असतात. ती झुपक्याने येतात. या वृक्षाची साल, लाकूड, पाने, बियांचे तेल आदी सारेच औषधी असून वेगवेगळ्या रोगांमध्ये त्यांचा उपयोग केला जातो.

सीता–अशोक तर रानाचे, तसेच बागांचे, वैभवच! मध्यम आकाराचा हा वृक्ष लाल–तांबड्या फुलांनी लगडतो, तेव्हा बघतच राहावेसे वाटते. मोहक रंग, मंद–मादक सुगंध धारण करणारा हा वृक्षही सर्वांगांनी औषधी आहे.

उक्षीची गोष्टच वेगळी! सह्याद्रीमधील सर्वच जंगलांमध्ये ही वनस्पती विपुल प्रमाणात आढळते. मार्चमध्ये हिची गाभुळत्या रंगाची फुले बघून मन मोहरून जाते. गंध नसलेली ही फुले त्या वेलीला सर्वांगांनी झाकून टाकतात. एखाद्या वृक्षावर या वेली चढलेल्या असल्या, तर त्या वृक्षाला उक्षीमयच करून टाकतात! वाळल्यानंतर किरमिजी रंग धारण करणारी ही फुले त्या अवस्थेतही आपले मन मोहून घेतात. करवंद, रानजाई, कुडा आदींची फुले पांढऱ्या रंगाची, एकमेकांसारखी दिसणारी, माफक गंध धारण करणारी, औषधी गुणधर्म असणारी!

एवढा फुलोरा असताना तिथे पक्षी, फुलपाखरे, माकड, मधमाश्या आदींचा मेळावा भरला नाही तरच नवल होईल! त्यांना लग्न–मुंजीसारखे बोलावणे लागत नाही! ते निसर्गाचे सर्व नियम पाळत या आनंदोत्सवात सहभागी होतातच. दर महिन्याला या रानात निसर्गाचा असा आविष्कार बघायला मिळतो. इथे येणाऱ्या आणि या निसर्गोत्सवाचा आनंद

अनुभवणाऱ्या निसर्गप्रेमींना राहण्यासाठी वनविभागाने अभयारण्यातील सुपेगाव येथील परिसरात तंबूंची उत्तम व्यवस्था केलेली आहे. ठाणे, अलिबाग आदी ठिकाणच्या वनाधिकाऱ्यांच्या कार्यालयांतून तिथले आरक्षण होऊ शकते. सध्या सुरू असलेला निसर्गातील हा पुष्पोत्सव साधारणतः एप्रिल महिन्याच्या मध्यापर्यंत बघायला मिळण्याची शक्यता आहे. त्यानंतर या फुलांची वाटचाल होणार शेंगा-फळांकडे! त्यावर येणारे वेगळे पक्षी, वेगळे कीटक येणार! फुलावर वृक्ष-वेलींच्या इतर प्रजाती! केव्हाही जा, निसर्गाचा हा आनंदोत्सव सुरूच असतो! त्यातील पात्रे फक्त बदलत असतात. आता गेलात तर हरियल, श्यामा, नवरंगी, सुतार, हळदू, पोपट आदी पक्ष्यांचे दर्शन होणे अथवा त्यांचे आवाज ऐकायला मिळणे हा बोनस समजावा!

लोकसत्ता : ५-४-२००९

# रानात फुलला बांबू



आपल्या आयुष्यात एकदाच बहरणारे, नाजूक, सुंदर फुलांमुळे सर्वांगाने डवरलेले बांबूचे बेट बघायला मिळणे खूपच दुर्मीळ, परंतु नेत्रांना सुख देणारे, असते. कारण सर्वसाधारणपणे एकाच वेळी लावण्यात आलेले एका प्रकारचे बांबू सगळ्या रानात एकाच वेळी फुलतात. त्यामुळे सारे रानच मोहरून निघते. ठाण्यालगतच्या नागलाच्या रानात सुमारे चार वर्षांपूर्वी आम्हांला असे दृश्य बघायला मिळाले होते. त्यामुळे घोडबंदर रोडलगतच्या ओवळा गाव परिसरातील बाराखिंडी डोंगराच्या विंडीवर बांबूची काही बेटे फुलल्याची बातमी मिळाल्यावर जमतील तेवढ्या भाग्यवान रानवेड्यांना घेऊन आम्ही तिकडे धाव घेतली. परंतु सुमारे एका आठवड्याने उशीर झाला होता. कारण आता बांबूचा फुलोरा गळून गोड्या बांबूने बोंडे आणि काटेरी बांबूने भातासारख्या लोंब्या धारण करायला सुरुवात केली होती. त्यांच्यावर आग्या माशा घोंगावत होत्या. असा बोंडारलेला गोडा बांबू आणि लोंब्यांनी लगडलेला खारा अथवा काटेरी बांबू बघणेदेखील कमी सुखद नव्हते. या बोंडांमध्येच आता बाजरी आणि जवाच्या आकाराच्या बियांची वाढ होऊन बांबूंच्या पुनर्निर्मितीची तरतूद व्हायची होती.

बांबूची फुले असतात कशी? तर पांढरा, फिकट पिवळा आणि पोपटी रंग यांचे मिश्रण केल्यानंतर होणारा सुखद, आल्हाददायक, परंतु तेजस्वी असा रंग. छोट्या-छोट्या नाजूक पाकळ्या. ही फुले बऱ्याच अंशी उक्षीच्या फुलांसारखीच दिसतात. उक्षीच्या वेलीने एखाद्या वृक्षाला आच्छादलेले असले आणि ती फुलांवर आलेली असली, तर तो वृक्ष फुललेल्या बांबूच्या बेटासारखाच भासतो.

बांबू, कारवी आदी तृणवर्गातील वनस्पती होत. त्या पळस, पांगारा, शाल्मली आदींसारख्या वर्षानुवर्षे फुलत नसतात, तर त्यांच्या आयुष्यमानाप्रमाणे एकदाच सर्वांगांनी फुलतात आणि नष्ट पावतात. गवताच्या काही प्रकारांचे आयुष्य अगदी हाताच्या बोटांवर मोजता येईल एवढ्याच दिवसांचे असते. कारवीचे आयुष्य पाच ते सात वर्षे. बांबूचे चाळीसपासून

अडीचशे वर्षे. कारवी आणि बांबूची बेटे फुलावर येण्याच्या या प्रकाराला आदिवासी परिभाषेत 'मेळ येणे' असे म्हणतात. बांबूची अशी मेळ येणे अशुभ समजले जाते. मेळ आल्यावर बांबूचे रानच्या रान जसे नष्ट होते, तसाच मोठा मनुष्यसंहार पटकी, महामारी आदींमुळे परिसरातील मनुष्यवस्तीमध्ये होण्याची शक्यता असल्याचा समज आदिवासी समाजात आहे. बांबूंच्या शेकडो प्रजाती आणि त्याविषयीच्या वेगवेगळ्या लोककथा जगभरातील वेगवेगळ्या देशांत प्रचलित असल्याचे आढळून येते.

विंडीच्या डोंगरावर ओवळ्याच्या बाजूने जाताना आपल्याला आधी वेगवेगळ्या रानवनस्पती आढळतात. नंतर लागतो काजूचा माळ. त्याच्यावरती बांबूचे वन. त्यानंतर विंडीवर रानचिकूचे अनेक वृक्ष दगडाधोंड्यांतून उभे असलेले दिसतात. नंतर येते एका बाजूला लोखंडी-सुरंगीचे रान, तर दुसऱ्या बाजूला टपोऱ्या, जांभूळवृक्षांची मेळ. सूर्यकिरणांना जमिनीवर पोहोचण्यासाठी प्रयास करायला लागतात.

विंडीवर यंदा गोड्या बांबूचे एक आणि खाऱ्या बांबूची सुमारे दहा-अकरा बेटे फुललेली दिसली. आता पुढील दोनेक वर्षांत या रानातील सगळाच बांबू फुलून नंतर त्याची बेटे नष्ट होण्याची शक्यता आहे. तिथे बांबूची पुन्हा लागवड करण्याच्या दृष्टीने संबंधित वनविभागाने आतापासूनच नियोजन करणे आवश्यक आहे. विद्यार्थी आणि निसर्गप्रेमी नागरिकांच्या सहभागातून ही योजना राबविण्याची जबाबदारी घेण्यासाठी 'हरियाली' उत्सुक आणि सक्षम आहे.

या परिसरातच सध्या पळस, पांगारा आणि शाल्मली हे वृक्षही मोठ्या प्रमाणावर फुललेले दिसतात. कसारा परिसरात मात्र पळस आधीच फुलून झालेला आहे. आग्रा रोडलगतच्या दिंडेश्वर महादेवाच्या डोंगरात मात्र काटे-सावरीचा (शाल्मली) झिम्मा प्रचंड प्रमाणात चालू आहे. तो बघायला येणाऱ्यांनी 'हरियाली'शी ९३२३२-९१८९० या क्रमांकावर संपर्क साधावा.

एकदा जाळून झालेले असल्यामुळे सगळीकडचे रान करपटले आहे. त्यावर सगळीकडे बांबूचे वाळके पाचट, पळसाची पाने इत्यादींचा सडा पडला असून महाशिवरात्रीपर्यंत पुन्हा एकदा रानाची राखरांगोळी होण्याची शक्यता आहे. कोणी आणि कसे करायचे या मानवनिर्मित आगीपासून आपल्या डोंगरांचे रक्षण?

कोणी कुठे फुललेला बांबू बघितला, तर तो निसर्गप्रेमींच्या नजरेला आणण्यास मात्र विसरू नका.

सन्मित्र : ३१-१-२००६



# फॉल सीझन - भारतातला

आपल्या परिसरातील वृक्षांची होणारी पानगळ आपण कधी जाणीवपूर्वक बघितलीत? वृक्षांची पानगळ ही एक नित्याची आणि नैसर्गिक प्रक्रिया असली तरी तिचेदेखील एक वैशिष्ट्य असते.

जिथे हिवाळ्यात बर्फ पडतो अशा शीतोष्ण प्रदेशात बर्फ पडायला सुरुवात व्हायच्या आधी पानगळ येते. तला तिकडे 'फॉल' असे म्हणतात. त्या वेळी सर्वच वृक्षांची पाने आपापल्या गुणधर्मांनुसार रंग बदलतात. बघता-बघता सबंध आसमंत विविध रंगांनी न्हाऊन निघतो आणि लक्षात येते न येते तोवर सर्वच वृक्ष एकाएकी निष्पर्ण होऊन जातात. हिम पडायला लागल्यावर वातावरणातील सगळे रंग लुप्त होऊन सगळीकडे पांढऱ्याशुभ्र हिमाचे साम्राज्य पसरते. हिवाळा संपता-संपता निष्पर्ण झालेले हेच वृक्ष, कधी शरीराला झटके देत, तर कधी आळोखेपिळोखे देत, एका गाढ निद्रेतून जागे होतात. नव्या पर्णांना जन्म देऊ लागतात. नव्याने जन्माला आलेले हे पर्णांकुर आकाराने मोठे मोठे होत बघता-बघता सर्व वृक्षांना झाकून टाकतात. निसर्गाचे रूपच जणू बदलवून टाकतात.

आपल्यासारख्या विषुववृत्तीय प्रदेशात मात्र हीच प्रक्रिया वेगवेगळ्या वृक्षांच्या गुणधर्मांनुसार वर्षातील वेगवेगळ्या ऋतूं होत राहते. आपल्याकडे पानगळ फक्त वसंत ऋतूतच होते, हा सर्वसाधारण समज खरा नाही. मात्र बहुसंख्य प्रकारच्या वृक्षांची पानगळ त्या वेळी होत राहते. शिवाय त्याच वेळी अनेक वेलींना नव्याने पालवी येऊन त्या वेली निष्पर्ण वृक्षांना अशा बेमालूमपणे झाकोळून टाकतात की, त्या वेलींची पाने, फुले वेलीखाली लपलेल्या वृक्षांचीच वाटावीत! सध्या जंगलात उक्षी नावाचा वेल अशा गमतीजमती करत असतो.

आपल्याकडील वृक्षांमध्ये वैचित्र्य खूप. त्यामुळे त्यांची पानगळ वेगवेगळ्या वेळी होत असते. पानगळ सुरू झाल्यापासून काही दिवसांतच हे वृक्ष साफ पर्णहीन होतात. त्या वेळी त्यांची पाने वृक्षांवर नव्हे, तर सडा

पडलेल्या अवस्थेत वृक्षांच्या खाली दिसू लागतात. सध्या वटवृक्षांची अशी पानगळ चालू आहे. आपल्या परिसरातील वटवृक्षांवर लक्ष ठेवा. काही दिवसांच्या आतच आपल्याला ते संपूर्ण पर्णहीन अवस्थेत आलेले दिसतील. पिंपळ वृक्षाची अशी पानगळ संपून हा वृक्ष त्याच्या सर्वांगावर आलेल्या नव्या पालवीने लखलखताना दिसतो. आमच्या परिसरातील संपूर्ण निष्पर्ण झालेल्या अशाच एका पिंपळ वृक्षाचा अशा प्रकारे झालेला संपूर्ण कायापालट माझ्या कॅमेऱ्याने टिपला.

गुलमोहर वृक्षांची पूर्ण पानगळ होऊन तो आता फुलू लागला आहे. लाल, केशरी, नारिंगी, भगवा अशा वेगवेगळ्या रंगांच्या छटा धारण करणारा हा वृक्ष कुठल्याही रस्त्याचे वैभव ठरून येणाऱ्या-जाणाऱ्या वाटसरूंचे लक्ष वेधून घेतो. तसेच लक्ष वेधून घेतो, तो पिवळ्याधमक फुलांचे लांबच लांब घोस धारण करणारा अमलताश, म्हणजेच बहावा.

या बाबतीत पळस, पांगारा, सावरी, ग्लॅरीसिडिया हे वृक्ष आघाडीवर असतात. आता त्यांची पानगळ होऊन ते सर्वांगांनी फुलूनदेखील आले. हे वृक्ष फुललेले असतात, त्या वेळी रानावनांमध्ये लाल, केशरी, जांभळ्या रंगांची उधळण चालू असते. अशा वेळी हे वृक्ष फुलांबरोबरच वेगवेगळ्या पक्ष्यांनाही आपलेसे करतात.

सध्या पांढऱ्या केसांच्या म्हाताऱ्या आसमंतात भिरभिरू लागल्या आहेत. लखलखत्या पोपटी रंगाची पाने धारण करणारा करंज आणि तशाच गोंडस, लाल-तांबड्या रंगाची तेजस्वी पाने धारण करणारा कुसुम वृक्ष नजर पोहोचेल एवढ्या लांबूनदेखील आपले लक्ष वेधून घेतो.

वेगवेगळ्या वृक्षांच्या अशा वेगवेगळ्या अवस्थांत त्यांच्यावर विविध प्रकारचे पक्षी येत राहतात. कोणी येतात अन्न शोधायला, तर कोणी घरटी बांधायला! कोणी मोकळ्या झालेल्या फांद्यांवर नुसतेच हिंदकळायला! वृक्षांच्या निष्पर्ण अवस्थेमुळे पक्ष्यांच्या हालचाली निर्वेधपणे न्याहाळता येतात.

सृष्टीचा हा नित्यक्रम असाच चालू राहतो. या वृक्षपर्णांना आपले वृक्षांपासून वेगळे अस्तित्व नसते. पण त्यांना वेगळा जीव असतो का? त्यांना आपण नेमके केव्हा गळून पडावे हे बरोबर कळते! सूर्यशक्ती आणि वातावरणातील बाष्प ग्रहण करण्याची आपली क्षमता संपली की त्या वृक्षासाठी असलेली आपली उपयुक्तता संपली हे त्यांना बरोबर कळते. मग

वारा येवो न येवो, ती आपली सहजच गळून पडतात. इच्छामरण म्हणतात ते हेच का? या पानांना हे सारे बरोबर कसे साधते? ऊनपावसाचा मारा सतत सहन करत राहण्याच्या साधनेतून त्यांना ही योगसिद्धी प्राप्त होते का? किती जगावे? वृक्षाला आपली उपयुक्तता आहे तोवर की आपल्याला जगण्याची आसक्ती आहे तोवर? की हे असे जगणे-मरणे त्यांच्या हातात नसतेच?

हा निसर्ग आपल्यासमोर किती प्रश्न उभे करतो? आपण डोळसपणे निरीक्षण करत राहिलो, तर त्याची उत्तरेदेखील तोच आपल्याला देत राहतो. केवळ जबरदस्त इच्छाशक्ती आहे, आसक्ती आहे, म्हणून चिकटून राहायचे की इतरांसाठी आपली उपयुक्तता आहे, काहीतरी देत राहण्याची क्षमता आहे, म्हणून काम करत राहायचे?

एक मात्र खरे की, जीर्ण झालेल्यांनी केव्हातरी झडायलाच हवे. मग ते हसतमुखपणे आणि स्वेच्छेने करत राहायला काय हरकत आहे? जुनी पाने झडल्याशिवाय फांद्या नवी पालवी धारण करणार कशा?

वेगवेगळ्या क्षेत्रांत विस्तारलेल्या आपल्या समाजवृक्षाचे असेच आहे, नाही?

लोकसत्ता : १३-४-२००३

# धुक्यात चाचपडणारा काशेडीचा घाट



मुंबईहून गोव्याला जाताना नॅशनल हायवे क्रमांक सतरा या मार्गावर असलेल्या पोलादपूर आणि खेड या दोन गावांच्या मध्ये काशेडी घाट लागतो. वेडीवाकडी, अवघड वळणे, नित्यनेमाने होणारे अपघात आणि पावसाळ्यात वारंवार ढासळणारे कडे यांमुळे हा घाट एके काळी बराच बदनाम झाला होता.

मात्र टप्प्याटप्प्याने होत गेलेल्या रस्ता रुंदीकरणामुळे आता घाटातील प्रवास बराचसा सुकर झालेला आहे. अपघातांचे प्रमाण कमी झाले आहे. मात्र प्रचंड वृक्षतोड झाल्यामुळे आणि रस्तारुंदीकरणासाठी लावण्यात आलेल्या सुरुंगांमुळे डोंगराचा बराचसा भाग खिळखिळा झाला आहे. त्यामुळे जमीन धसण्याचे प्रमाण मात्र वाढले आहे.

पावसाळ्यात इतर सर्वच घाटांप्रमाणे या घाटातून प्रवास करणे रोमांचक असते. घाटमाथ्यावरून दिसणारे चहू बाजूंकडील दृश्य विलोभनीय असते. घाटमाथ्याच्या मध्यावर असलेल्या एस. टी. थांब्याच्या अलीकडे रायगड जिल्ह्याची हद्द संपून पलीकडे रत्नागिरी जिल्ह्याची हद्द सुरू होते. वातावरणातील कोकणीपणा अधिकाधिक वाढत चालल्याचे चाणाक्ष मनांना जाणवते.

या घाटमाथ्यावरच मधूनमधून डोकावताना दिसतात काही 'चक्रम माथे'. त्यातील विजय भिडे नामक चक्रम माथा सारखा इथेच भिरभिरत राहून येणाऱ्या-जाणाऱ्यांना आपल्या 'विष्णुगुप्त' आणि 'वनपर्व' या प्रकल्पांची माहिती देत प्रकल्पाच्या ठिकाणी येण्याचे आवाहन करत असतो. आपल्या मालकीच्या खासगी जमिनीचा सार्वजनिक हितासाठी उपयोग करण्याचा उपद्व्याप 'विष्णुगुप्त' आणि 'वनपर्व' या जोडप्रकल्पांचे संयोजक करत असतात. सार्वजनिक मालकीच्या जमिनीचा उपयोग खासगी हितासाठी करण्याच्या या युगात हे जरा विचित्रच वाटते. म्हणूनच अशा लोकांना चक्रम किंवा वेडे म्हणायचे!

आपल्या देशाचा विकास घडवून आणायचा असेल, तर त्यासाठी आपल्या शिक्षणपद्धतीत फार मोठे बदल घडवून आणायला लागतील. त्यासाठी विष्णुगुप्त या आद्य शिक्षकाचा आदर्श समोर ठेवून शिक्षण पद्धतीतील क्लिष्टता कमी करत आपल्या विषयांत विद्यार्थ्यांना रस निर्माण करायला हवा. विजय भिडे यांना भेटल्यावर तुमच्यावर अशा विचारांची बरसात व्हायला लागते. ज्याप्रमाणे पृथ्वी, आप, तेज, वायू आणि आकाश ही पंचमहाभूते आपल्या सृष्टीचा आधार आहेत, त्याचप्रमाणे विद्यार्थी, शिक्षक, पालक, शैक्षणिक संस्था आणि अभ्यासक्रम हे आपल्या शिक्षणपद्धतीचे मूलभूत घटक आहेत. आज हे सगळेच घटक प्रदूषित झालेले दिसतात. त्यांच्यावर योग्य ते संस्कार करत बदल घडवून आणणे आवश्यक आहे. त्यासाठी आम्ही विष्णुगुप्त प्रकल्पाच्या माध्यमातून या सर्वांसाठी वेगवेगळे कार्यक्रम करत असतो. इथे येणाऱ्या विद्यार्थ्यांना आम्ही एका साध्या चौकोनी कागदाच्या घड्या करून दाखवत वेगवेगळ्या पद्धतींनी भूमिती हा विषय शिकवतो. भौतिकशास्त्राचे साधे नियम शिकवत त्यांना पोहायला शिकवतो आणि त्यांची पाण्याची भीती घालवतो. आपल्याकडे कुठे काय-काय आहे आणि कुठे काय करायचे आहे, हे दाखवायला भिडे गुरुजी आपल्याला बाहेर नेतात. बरोबर आलेल्या लोकांना तेवढेच जरा बदल झाल्यासारखे वाटते. मात्र बाहेर आल्यानंतर निसर्गाचा आस्वाद घेत असताना अस्मानातील रंग केव्हा आणि कसे बदलत जातात ते आपल्या लक्षातच येत नाही! भिडे आपल्याला त्यांच्या आकाशदर्शन केंद्राकडे नेत असताना वाटेतच आकाशाच्या वेगळ्याच रौद्र रूपाचे दर्शन आपल्याला होते. मेघांचा गडगडाट आणि विजांचा कडकडाट! जवळपास नाही कुठला दुसरा आसरा! अशा वेळी पावसात चिंब भिजण्याशिवाय लहानथोरांपुढे पर्यायच उरत नाही. भिड्यांबरोबरच निसर्गालाही तुम्हांला काही शिकवायचे असते! तो तुमच्या वयाची पर्वा न करता तुम्हाला अगदी थोडक्याच वेळात बुकलून काढत तुमच्या मनातील पावसाची भीती घालवतो.

भिड्यांबरोबर चार भिंती आणि एक छत यांच्या सुरक्षित वाटणाऱ्या आडोशाला जावे तर तिथे भिड्यांचे विचारधन पुन्हा बरसायला लागते. तुम्हांला आता सभोवताली जी हिरवळ दिसते आहे, ती बरीचशी फसवी आणि फक्त पावसाळी आहे. पावसाळा संपला की इथे गुरांना खायला काही

उरत नाही. त्यामुळे तुम्ही लावलेली झाडेही ते टिकू देत नाहीत. करंजासारख्या झाडांची कडू पानेही ते सोडत नाहीत. बरे, त्यांच्या तडाख्यातून काही वृक्ष वाचलेच, तर ते माणसांच्या कुऱ्हाडीला बळी पडतात. आम्ही लावलेल्या हजारो वृक्षांपैकी केवळ पाच-सहा हजार झाडेच वाचवू शकलो आहोत. खरे म्हणजे सह्याद्री वाचवायचा असेल, नव्हे माणूसच वाचवायचा असेल, तर सगळीकडे फार मोठ्या प्रमाणावर वृक्षलागवड होत राहणे आवश्यक आहे. त्यासाठी उघडेबोडके डोंगर, रस्ते, रेल्वे, जलवाहिन्या या सर्वांच्या कडेने मोठ्या प्रमाणावर वृक्षलागवड व्हायला हवी. त्यात आम्हांला विद्यार्थ्यांचा सहभाग हवा आहे. लोकांनी इथे यावे, झाडे लावावीत. शिक्षणपद्धतीत वृक्षलागवडीचे महत्त्व समजावून सांगण्याची क्षमता हवी. वनपर्वात आम्ही हे करायला बघतो आहोत. विष्णुगुप्त आणि वनपर्व, म्हणजेच शिक्षणपद्धती आणि वृक्षलागवड, या रुळांवरून भिड्यांचे वाग्वाहन किती वेळा आणि किती कौशल्याने मार्ग बदलत जाते ते ऐकणाऱ्यांच्या लक्षातच येत नाही.

'आम्हांला इथे काही रिसोर्स पर्सन्स हवे आहेत. इंग्रजी आणि मराठीतून बोलणारे आणि आम्ही बोलावू त्या वेळी येणारे. आम्ही योग्य तो मेहनताना देऊ.' अशा प्रकारे भिडे आपल्या गरजांविषयी बोलत राहतात. 'आम्हांला लोकांकडून पैसे नकोत, माणसेच हवीत' या वाक्याची पेरणी मधूनमधून सुरूच राहते. त्यासाठी मुंबई, ठाणे, पुणे, कल्याण, डोंबिवली आदी सर्व ठिकाणी छोट्या शाळेपासून ते कॉलेजपर्यंत भिडे भिरभिरतच असतात.

तिकडे बरसणाऱ्या जलधारांमध्ये सचैल न्हाऊन निघत तरुणांचा एक गट चहू बाजूंकडील क्षितिज रेषेवरील बदलते रंग न्याहाळण्यात हरखून जातो. मोबाईल फोनच्या टॉवरपाशी हुंदडणाऱ्या बालकांनी आपल्याजवळूनच धगधगत गेलेल्या विजेच्या गोळ्याच्या दर्शनाचा रोमांचक अनुभव घेतलेला असतो. घाबरून माघारी फिरून धुकाटलेल्या वाटेने येताना त्यांना सारखे चाचपडायला होते. असा रोमांचक अनुभव घ्यायला तुम्हांला काशेडीच्या घाटमाथ्यावरच जायला हवे!

महाराष्ट्र टाइम्स : ३०-९-२००६

# जलसंगीताची अनुभूती



सध्या सह्याद्रीच्या सर्वच डोंगररांगांमधून जागोजागी निसर्गसंगीताचा महोत्सव सुरू आहे. त्यातूनही जलधारा आणि जलप्रवाहांमधून निघणारे संगीताचे स्वर कानांना तर तृप्त करतातच, परंतु आपली इच्छा असल्यास या जलसंगीतात न्हाऊ घालून सर्वांगालाही तृप्त करतात. पावसाची संततधार, कोसळणारा धबधबा, खळखळत जाणारा ओढा, संथ वाहणारा निर्झर, वेगवेगळ्या वृक्षांच्या पर्णिकांमधून टपटप आवाज करत अंगाखांद्यावर पडणारे जलबिंदू, आणिक इतरही कोण-कोण या जलवृंदामध्ये सहभागी झालेले असतात !

अशाच एका जलमहोत्सवात सहभागी होण्याची संधी मिळाली, गेल्या आठवड्यात शिवथर घळ आणि कशेडी घाट येथे गेलेल्या एका सहलीमधून. मुंबई-पुणे दोन्ही ठिकाणांहून सुमारे १८० किमी अंतरावर असलेल्या,मुंबई-गोवा मार्गावरील महाड शहरापासून सुमारे तीस किलोमीटरवर डोंगराच्या कुशीत शिवथर घळीचा सुरेख परिसर वसला आहे. या वाटेने तुम्ही जुलै-ऑगस्ट महिन्यात गेलात, तर डोंगरमाथ्यावरून आणि कड्यांवरून जमिनीकडे येणारे अक्षरशः शेकडो धबधबे तुमचे स्वागत करतात. वळणा-वळणाने जाणारा एकेरी रस्ता डोंगराच्या कुशीतील घळीच्या (गुहेच्या) पायथ्याशी केव्हा नेऊन पोहोचवतो, ते तुम्हांलाच कळत नाही. शंभरच्या आसपास पायऱ्या चढून वर गेलात, तर अगदी घळीच्या तोंडाशीच कोसळणारा पाण्याचा प्रचंड स्रोत तुमचे नुसते लक्षच वेधून घेतो असे नव्हे, तर तो तुम्हांला विस्मयचकित करतो. चहू बाजूंनी दाट वृक्षराईने दडवून ठेवलेल्या या प्रपाताजवळील गुहेत बसूनच समर्थ श्री रामदास स्वामींनी दहापेक्षा अधिक वर्षे साधनेत घालवली असे इतिहास सांगतो. समर्थांची साधना नुसतीच अध्यात्माच्या मार्गाने जाणारी नव्हती, तर राष्ट्रनिर्मिती आणि स्वतंत्रता यांची बीजे निर्माण करणारी आणि रुजवणारी होती हे आपल्या सर्वांना ठाऊकच आहे (निदान ते तसे असावे). याच ठिकाणी बसून समर्थांनी सार्थ श्री दासबोध या ग्रंथाचे लेखन केले असे इहिासकार सांगतात. त्यामुळे

या सगळ्याच परिसराला एक प्रकारचा भारदस्तपणादेखील लाभला आहे. मुख्य म्हणजे, हमरस्त्यापासून खूप आतमध्ये असल्यामुळे बाहेरील उपद्रवी घटकांचा त्रास कमी असतो.

घळीजवळील दरीत डोंगरावरून कोसळणाऱ्या प्रपाताचे शिवथर नदीत रूपांतर होते. ही नदी पुढे जाऊन सावित्री नदीला मिळते. तिच्या या प्रवासात अजून औद्योगिक आणि शहरी प्रदूषणाची सरमिसळ न झाल्यामुळे पुराच्या वेळची अवस्था सोडली, तर इतर वेळी पाणी स्वच्छ आणि नितळ असल्याचे जाणवते. या सगळ्याच खोऱ्यातील लोकांना अजूनही कामधंद्याची शेतीशिवाय इतर साधने फारशी उपलब्ध नसल्याचे दिसून येते.

सगळ्याच परिसरातील वेगवेगळ्या प्रकारची रानफुले जलस्रोतांच्या संगीत-महोत्सवात सामील होऊन माना डोलवताना दिसतात. वेगवेगळ्या पाखरांच्या किलबिलाटामुळे वातावरणात जिवंतपणा अनुभवण्यास मिळतो.

या सगळ्यांत विसंवादी सूर असतो, तो फक्त इथे येणाऱ्या मनुष्यप्राण्याचाच! मुळात स्वेच्छेने आलेल्या लोकांपैकी पन्नास टक्के लोकांनीतरी एवढे सुंदर, मन प्रसन्न करणारे, निसर्गरम्य असे स्थळ बघितलेले नसते. जवळपास सर्वच प्रवासी - जणू काही आपापसात आर्त स्वरात किंचाळण्याची स्पर्धा लागलेली असल्याप्रमाणे मोठमोठ्यांदा बोलत असतात. छायाचित्रण करणारे बहुतांश हौशी लोक इथल्या निसर्गाला कॅमेऱ्यात टिपण्याऐवजी आपापली छबीच कॅमेऱ्यात बंदिस्त करून न्याहाळत बसतात. ते पाहून थोडे वाईट वाटते.

निसर्गाची अशी मुक्त उधळण, संगीताची अशी मैफिल सगळीकडे अनुभवायला मिळतेच असे नाही. त्यामुळे नाक-कान-डोळे उघडे, पण तोंड बंद ठेवून मैफिलीत सामील होणे आवश्यक असते. मात्र असे क्वचितच होताना दिसते.

इथे येणाऱ्यांनी आल्याआल्या घळीच्या पायथ्याशी असलेल्या दोन छोटेखानी, घरगुती उपाहारगृहांत आपल्या जेवणाची व्यवस्था करूनच वर घळीत गेलेले बरे. त्यामुळे प्रवासातील अमूल्य वेळ वाचवण्यात मदत होते. मनन-चिंतन, निसर्ग-निरीक्षण यांसाठी येणाऱ्यांची राहण्याची सोय आता घळीतील निवासस्थानात होऊ शकते. उपाहाराची व्यवस्था मात्र खालच्या दोन उपाहारगृहांत जाऊन आपली आपणच करायची असते.

थोडे गैरसोयीचे असले, तरी पावसाळ्यातच इथे येणे अधिक आनंददायी असते.

पूर्वप्रसिद्धी : महाराष्ट्र टाइम्स

# मज लागे ध्यास 'कास'चा



सह्याद्रीच्या खोऱ्यांमध्ये जावळी या खोऱ्याचे स्थान आगळेच आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी इतिहासात अजरामर करून ठेवलेल्या या खोऱ्यावर निसर्गानेदेखील वरदहस्त ठेवलेला दिसतो. त्यातील महाबळेश्वर–प्रतापगड आदी परिसरात बहुतेक निसर्गप्रेमी कधी ना कधी जाऊन आलेले असतातच. मात्र या खोऱ्यातील 'कास' या पुष्पपठाराचे एक आगळेच महत्त्व आहे. ऑगस्टच्या सुरुवातीपासून ते ऑक्टोबर महिन्याच्या मध्यापर्यंत निसर्गदेवता दर आठवड्याला इथे वेगवेगळ्या रंगांच्या तसेच आकारांच्या फुलांची चित्तवेधक रचना करत मोहमयी रांगोळी काढीत असते! हिमालयात 'व्हॅली ऑफ फ्लॉवर्स'चे जे स्थान आहे तेच स्थान सह्याद्रीत या पुष्पपठाराचे (Plateau of Flowers) आहे असे म्हणता येईल. या फुलांच्या साथीला आहे सुंदर पर्णिकांचे मखर. रंगीबेरंगी अल्लड फुलपाखरे, चतुर, कीटक आणि छोटेमोठे पक्षीही कळत–न–कळत पर्णिकांच्या साथीला येतात. कधी अधूनमधून येणाऱ्या सरींमध्ये, तर कधी चिंब भिजवणाऱ्या मुसळधार पावसामध्ये हा सारा वाद्यवृंद मग एका सुरेल आवाजात गायला लागतो! जवळपासच्या दऱ्याखोऱ्यांतून कोसळणारे प्रपात लांबून साद घालत या जत्थ्याचे लक्ष आपल्याकडे वेधून घेण्याचा प्रयत्न करतात. मध्येच डफावर जोरदार थाप पडावी त्याप्रमाणे आकाशातून एखादी वीज कडाडते, लखलखते! कधीकधी गडगडणाऱ्या मेघांची आणि कडाडणाऱ्या विजांची जुगलबंदी सुरू होते. निसर्गाच्या या सुंदर मैफिलीत सहभागी होण्यासाठी प्रत्यक्ष मेघराज आपल्या लवाजम्यासह आपल्या आगमनाची आगाऊ सूचना देऊन या पठारावर अवतरतात. पठारावरील जागा अपुरी पडायला लागल्यानंतर त्यांच्या लवाजम्यातील भालदार–चोपदार आदी सर्व लगबगीने जवळपासच्या दऱ्याखोऱ्यांकडे जात जागा मिळेल तेथे दाटीवाटीने स्थिरावतात! त्यानंतर होणाऱ्या सुरांच्या बरसातीत सारा परिसर धुंद होऊन नाचू लागतो! एखादा राग आळवून झाल्यावर एक छोटासा ब्रेक घ्यावा,

त्याप्रमाणे मेघांना बाजूला सारत रविकिरणे सबंध आसमंत उजळवून टाकतात. या मध्यंतरात वाद्यवृंदातील सर्वच वादक आपापली वाद्ये तपासून घेत तारांची, दोऱ्यांची जुळवाजुळव करून घेतात. पुढील अदाकारीत नव्या जोमाने आणि नव्या उत्साहाने सामील होण्यासाठी सज्ज होतात!

या मैफिलीत सामील होण्यासाठी कुठल्याही प्रकारचे शुल्क भरण्याची आवश्यकता भासत नाही. जात-पात, वयोमर्यादा आदींच्या अटी नसतात की कुठला लिंगभेद नसतो! नसते कधी त्याचे जाहीर अथवा छापील निमंत्रण, तसेच नसते कधी या महोत्सवाची कुठल्याही माध्यमातून जाहिरात!

मात्र या स्वेच्छा-महोत्सवात सामील होणाऱ्यांना ते कुठून आणि कसे येऊ इच्छितात याचा विचार करून किमान एक संपूर्ण दिवस महोत्सवासाठी देण्याची तयारी ठेवावी लागते. हे पठार, म्हणजेच हा परिसर, पुण्यापासून सुमारे १५० किलोमीटर इतक्या अंतरावर आहे. पुणे-बंगलोर रस्त्यावरील सातारा शहरापासून उजवीकडे (पश्चिम दिशेला) बामणोली रस्त्यालगत हा परिसर पसरलेला आहे. सातारा शहरातून सज्जनगडाकडे जाणाऱ्या रस्त्यावर शहराच्या बाहेर पडल्यावर एक बोगदा लागतो. त्या बोगद्यातून जाणारी वाट सज्जनगडाकडे जाते. कास पठाराकडे जाऊ इच्छिणाऱ्यांनी मात्र त्या बोगद्यात न शिरता त्याच्या उजव्या हाताने जाणाऱ्या सुंदर डांबरी सडकेने कास-बामणोली अशी पाटी असेल्या दिशेने जायचे. सुमारे आठ-दहा किलोमीटरचे अंतर पार केल्यावर रस्त्याच्या दुतर्फा फुललेली ताजीतवानी फुले आपले स्वागत करतात. थेट बामणोली गावापर्यंत हे पठार पसरलेले आहे. आम्ही या वर्षी सप्टेंबरच्या २५-२६ तारखेस गेलो, त्या वेळी सबंध पठारावर पिवळ्या रंगाची 'सोनकी' ही फुले आणि आसपासच्या शेतांमधून तसल्याच रंगरूपाची, परंतु आकाराने थोडी मोठी अशी, मोहरीची फुले फुललेली होती. सीतेचे अश्रू असे समर्पक स्थानिक नाव असलेल्या निळ्या-जांभळ्या फुलांचे नैसर्गिक पट्टे मधूनच आपले अस्तित्व जाणवून देत होते. चेंडूसारखी वाटोळी, पण अगदी चिमुकली, अशी 'गेंद'ची पांढरी फुले दृष्टी जाईल तिथवर जमिनीलगत पसरलेली दिसत होती. लाल-जांभळ्या रंगाची 'मंजिरी' 'सोनकी'शी चढाओढ करत होती. पठाराच्या मध्यापर्यंत पोहोचल्यावर उजव्या हाताला एक कच्ची, पण जुन्या काळातील हत्ती, घोडे, मेणे यांच्याकरता असणारी, 'महाराजा' वाट लागते. या रस्त्याने सुमारे २५

किलोमीटर अंतरावर डोंगर पठारावरूनच महाबळेश्वरला पोहोचता येते अशी माहिती स्थानिक सूत्रांकडून मिळाली. 'हरियाली'तर्फे येत्या डिसेंबर महिन्यात या भटकंतीचे आयोजन करण्यात येणार आहे.

याच रस्त्याने थोडे पुढे चालत गेल्यावर रस्त्यालगतच उजव्या हाताला एक उथळ पठारी तलाव लागला. त्याचे नावच मुळी आहे 'सरोवर'. पाठीमागच्या दाट झाडीच्या पार्श्वभूमीवर हे 'सरोवर' खूपच छान दिसत होते. पांढऱ्या कमळासारखीच पानेफुले असलेल्या, परंतु छोटेखानी आकाराच्या, 'कुमुद' असे नाव धारण करणाऱ्या फुलांनी हे सरोवर गच्च भरलेले होते. लवकरच वेगवेगळ्या प्रकारचे प्राणी, तसेच पक्षी, या सरोवराच्या परिसरात येऊ लागतील.

जागतिक जैविक सृष्टीत या पठाराचे स्थान अतिशय महत्त्वाचे असल्याचे मानले जाते. म्हणून अलीकडेच वनविभागाने या पठाराला 'जागतिक वारसा केंद्र' असा दर्जा बहाल करण्याबाबत एक प्रस्ताव 'युनेस्को'कडे पाठवला आहे. त्याचा पाठपुरावा होणे आवश्यक आहे. त्याचबरोबर 'युनेस्को'चा ठराव अथवा त्यांचे द्रव्य यांची वाट न पाहता राज्य सरकार, स्थानिक नागरिक आणि निसर्गप्रेमी यांनी या पठाराचे रक्षण करण्यासाठी पराकाष्ठेचे प्रयत्न करत राहणे आवश्यक आहे.

मात्र फुलापानांचे आच्छादन घातलेले हे पठार एवढेच या परिसराचे वैभव नव्हे. खाली दऱ्याखोऱ्यातून चहू बाजूंनी उरमोडी, वेण्णा, कण्हेर, कोयना, सोळशी, कांधारी आदी नद्यांवर बांधलेल्या धरणांमुळे निर्माण झालेले जलाशयही इथून दृष्टीस पडतात.

बामणोली गावाजवळ कोयना-सोळशी-कांधारी या नद्यांचा त्रिवेणी संगम आहे. तिथून जवळच एक दत्तमंदिर आहे. कोयना नदीवरील शिवसागर या प्रमुख धरणाच्या 'बॅंक वॉटर'मध्ये फेरफटका मारण्यासाठी इथे नौकानयनाची सोय आहे. याच जलाशयातून पुढे तापोला तलावाकडे यांत्रिक पडावाने, तसेच रस्त्यानेही जाता येते. जलक्रीडा केंद्र म्हणून तापोला तलावाचा बऱ्यापैकी विकास करण्यात आलेला आहे. परिसरात ठोसेघर, भांबवली-वजराई आदी अनेक धबधबे आहेत. त्याचप्रमाणे साताऱ्याच्या अजिंक्यताऱ्यापासून सज्जनगड-वासोटा-कोथिंबिरा यांपर्यंत अनेक किल्ले येथे दृष्टिक्षेपात येतात. पठाराकडे जाताना डाव्या हाताला असलेल्या पेरेश्वर

गावाजवळील छोटेखानी डोंगरावरील गुहेत शिवपेरेश्वर मंदिर आहे. प्रवाशांनी परतीच्या वाटेवर त्याला अवश्य भेट द्यावी.

सातारा–पुणे–सांगली आदी ठिकाणांहून आपापल्या वाहनांनी अथवा एस.टी.ने येणारे निसर्गप्रेमी सकाळी लवकर येऊन संध्याकाळपर्यंत परतू शकतात. मुंबई अथवा अधिक लांब अंतरावरून येणाऱ्या प्रवाशांनी आदल्या रात्री येऊन सातारा येथे अथवा त्याच्या जवळपास मुक्काम करावा हे उत्तम. मुंबईहून खाजगी वाहने घेऊन येणाऱ्यांनी आदल्या रात्री साताऱ्यास अथवा सज्जनगड येथे मुक्काम करावा. दुसऱ्या दिवशी सकाळी कास पठार परिसर–बामणोली–तापोला करत (रस्त्यानेच) महाबळेश्वर मुक्कामी जावे. तिसऱ्या दिवशी महाबळेश्वर–प्रतापगड, पोलादपूर–महाड–शिवथर घळ करत गोवा महामार्गाने मुंबईस परतावे. अशी सुरेख भ्रमंती होते म्हणून सांगू!

अन्यथा घाईगर्दी असणाऱ्यांनी पहाटे लवकर निघून सरळ कास पठाराची आस धरावी. तिथून बामणोली–तापोला–महाबळेश्वर–पोलादपूर मार्गे पुन्हा रात्रीपर्यंत मुंबईला पोहोचावे. नुसताच 'ड्राइव्ह'देखील छान होतो.

सन्मित्र : २–११–२००९



# वन्यजीव रक्षणासाठी अरण्यवाचन

ऑक्टोबर महिन्यात जगभर वन्यजीव सप्ताह पाळला जातो. यात काहीतरी वेगळे करण्याच्या दृष्टीने अरण्यवाचनाची कल्पना पुढे आली. त्यातून वन्यजीव-रक्षणासाठी अरण्यवाचन किती आवश्यक आहे, याचीच प्रचिती आली. कुठल्या ना कुठल्या गोष्टीसाठी एखादा दिवस, सप्ताह, मास, वर्ष आदी आंतरराष्ट्रीय स्तरावर पाळण्याचा आता शिरस्ताच झाला आहे. एकही दिवस असा नसतो की, तो एखाद्या विशिष्ट कारणासाठी 'पाळला' जात नाही. बरे 'पाळायचे' म्हणजे काय करायचे! तर एखादी जाणकार व्यक्ती, अधिकारी अथवा पुढारी यांचे भाषण ठेवायचे किंवा प्रदर्शनाच्या उद्घाटनाचे आयोजन करायचे.

ठाणे वन विभाग (वन्यजीव), 'हरियाली' आणि सामाजिक वनीकरण विभागाने उभी केलेली शालेय विद्यार्थ्यांची हरितसेना यांनी मात्र या वेळी प्रत्यक्ष वनांमध्ये जाऊन अरण्यवाचनाचे धडे गिरवण्याचे ठरवले. ठाणे वन विभागाने आपल्या अखत्यारीतील वनांमध्ये विद्यार्थ्यांसाठी विनाशुल्क प्रवेश आणि वाटाडे उपलब्ध करून द्यायची तयारी दाखवली. सामाजिक वनीकरण विभागाने हरितसेनेतील जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना वनभ्रमंतीसाठी पाठवण्याची जबाबदारी स्वीकारली. 'हरियाली'ने वनस्पती, पशू, पक्षी, वन्यजीव आदींची चांगली जाण असलेली तज्ज्ञ मंडळी आपल्या सदस्यांमधून विनामूल्य उपलब्ध करून देण्याची जबाबदारी स्वीकारली. असा सुरेख संगम जमून आला.

एवढेच नव्हे, तर 'हरियालीने' फणसाड अभयारण्यात खास ज्येष्ठ नागरिकांसाठी दोन-दिवसीय जंगलवाचन सहलीचे आयोजनही केले. रायगड जिल्ह्यातील फणसाड अभयारण्य सदाहरित वृक्षांनी जेवढे बहरलेले आहे, तेवढेच लोकांकडून दुर्लक्षितही आहे. ज्येष्ठ नागरिक जसे खूप अनुभवी आणि माहीतगार असूनही उपेक्षित राहतात ना, तसेच. त्यामुळेही

असेल कदाचित, पण या अरण्यवाचनात सहभागी झालेल्या ज्येष्ठांची या अभयारण्याशी एकदम गट्टी जमली.

आमच्या या अभयारण्यात ११८ प्रकारचे वृक्ष, १६४ प्रकारचे पक्षी, ९० प्रकारची फुलपाखरे आणि २७ प्रकारचे सर्प आढळून येतात. ५३ चौरस किलोमीटरवर पसरलेल्या या अभयारण्यात बरेच बारमाही पाणवठे आहेत. त्यांना इकडचे अरण्यवासी 'गाण' असे म्हणतात. उदाहरणार्थ चिखलगाण, फणसाडगाण इत्यादी. मुरूड-जंजिरा येथील नवाबाच्या अखत्यारीतील हे जंगल खास त्याच्यासाठी आणि त्याच्याकडे येणाऱ्या शाही पाहुण्यांसाठी शिकारीला राखून ठेवलेले होते. त्यामुळे यात शिकारीसाठीची मोकळी मैदाने आणि गवताळ कुरणे आपल्याला जागोजागी दिसतात.

वृक्ष नसतील, वनस्पती नसतील, तर तिथे वन्यजीवांचे अस्तित्वदेखील आपल्याला आढळणार नाही. हे खुळखुळ्याचे झुडूप, ही घाणेरी फुलपाखरांना फार आकर्षित करतात. हे बघितलेत गौरीचे फूल यालाच 'कळलावी' असेही म्हणतात. या ठिकाणी तीन वेगवेगळ्या अवस्थांतील गौरीची फुले आपल्याला एकाच वेळी दिसतात.

रस्त्याच्या या कडेच्या वृक्षापासून त्या कडेच्या वृक्षापर्यंत जाळे विणून शिकारीची वाट बघत असलेला हा 'जायन्ट स्पायडर' आणि ओली-सुकी पाने एकाला एक चिकटवीत बोगद्याच्या आकाराचे पांढऱ्या रंगाचे कोळिष्टक जमिनीवरच करणारा हा इवलासा 'टनेल स्पायडर'. त्याला लपून बसण्यासाठी बोगदा आणि शिकारीला अडकवण्यासाठी जाळे! वडाच्या जातीतील हा 'गरुड वड'. याची पिवळी, गोल आकाराची फळे माकडे, वटवाघळे आदी खातात. या फळांच्या आतमध्ये घुसून एक कीड आपली अंडीदेखील घालते. गारंबीची शेंग जेवढी मोठी, तेवढेच तिचे बीदेखील आकाराने मोठे, वजनाने भारी, स्पर्शाला टणक आणि रुजायला अवघड असते. प्रचंड आकाराची शेकरू खार तर या जंगलाचे वैशिष्ट्यच आहे.

जगभरातल्या अनेक अभयारण्यांतून हिंडून वाघ, सिंह, हरीण, सांबर हे प्राणी बघण्याची आणि त्यांचे आवाज ऐकण्याची सवय झालेल्या ज्येष्ठांच्या डोळ्यांना आणि कानांना ही वनस्पतींबद्दलची माहिती बरीच नवीन होती. रेंजर हिंगोले, फॉरेस्टर हरिश्चंद्र नाईक, प्रा. मंगला बोरकर, प्रा. डॉ. माधुरी पेजावर, नंदन कलबाग यांच्याकडून ही सगळी माहिती ऐकत असताना

आपण आपल्या पायांना किती थकवले हेदेखील ज्येष्ठ मंडळींच्या लक्षात आले नाही! अरण्यवाचनाचा खरा अर्थ त्यांना आज कळला. वृक्षांची पाने एकमेकांना चिकटवून 'पॅगोडा' करणाऱ्या आणि कण-कण माती लिंपून वारूळ तयार करणाऱ्यादेखील वेगवेगळ्या जातीच्या मुंग्याच असतात हे केवढे मजेशीर आहे, नाही? मधूनच एखादा साप आणि कुठे धामण जातीच्या सापाची लांबलचक कात बघून "अय्या", "बाप रे, शाल्मली!" असे उद्‌गार बाहेर पडले.

सदा नाईक आणि त्याच्या सहकाऱ्यांनी लाकडाच्या चुलीवर केलेला तीन वेळचा स्वयंपाक, एक वेळचा नाश्ता आणि वेळोवेळी मिळालेला किटलीतील चहा ज्येष्ठांना तृप्त करून गेला. संध्याकाळी ७ ते ११ या वेळात आपल्या निवासाच्या मोकळ्या प्रांगणात, अंधारातच बसून आपण एकमेकांशी माहितीची देवाण-घेवाण करत होतो, हे शेकोटी पेटवल्यावरच लोकांच्या लक्षात आले. लाकडाच्या चुलीवरल्या चवदार जेवणाने तृप्त झाल्यानंतरही ओंडक्यांच्या धगीवर भाजलेली तेवढीच चवदार कणसे केव्हा आपल्या दातांना चकवून उदरग्रस्त झाली ते ज्येष्ठांना कळलेच नाही. 'लोडशेडिंग' असलेल्या निवासाची व्यवस्था असल्यामुळे ज्येष्ठांची काही गैरसोय तर होत नाही ना, अशा विचाराने अस्वस्थ होणाऱ्या उपवन संरक्षक गुजर साहेबांचा (आयएफएस) फोन त्यांचे साहाय्यक वनसंरक्षक पाटील यांना अनेक वेळा येऊन गेला. 'अरण्यवाचन करायला आलेले आपल्या जंगलाचे खास पाहुणे आहेत ते. त्यांची कुठलीही गैरसोय होणार नाही याची काळजी घ्या. वीज नसेल, तर इतर दिव्यांची व्यवस्था करा आणि कोणालाही एकेकट्याने अथवा नागव्या पायांनी बाहेर पडू देऊ नका', असे त्यांनी सांगितले. या अभयारण्यात काम करत असलेले दक्ष कर्मचारी आणि 'हरियाली'च्या स्वयंसेवकांचा अनुभव आधी घेतलेले दुसरे साहाय्यक वनसंरक्षक सतीश फाले यांनी गुजर साहेबांना आश्वस्त केले आणि त्यांना कळवले, 'सारे काही व्यवस्थित होईल, काळजी करू नका.'

ठाण्यातील कोंकणीपाडा परिसरातील संजय गांधी राष्ट्रीय उद्यानात वेगवेगळ्या दिवशी झालेल्या सात शाळांच्या हरितसेनांना 'हरियाली'चे तरुण कार्यकर्ते सौरभदादा, आशुतोष, चैतन्य, अश्विनीताई आदींनी मार्गदर्शन केले. पक्षी, प्राणी, वनस्पती आदी एकमेकांवर अवलंबून

असल्याची माहिती त्यांनी दाट वृक्षराईतून हिंडत दिल्यानंतर त्या हरितसेनांमधले शालेय विद्यार्थी चकितच झाले. सामाजिक वनीकरणाचे उपवन संरक्षक असलेल्या पावसकर साहेबांनी त्या चिमुकल्यांच्या दिमतीसाठी देशपांडे या खास अधिकाऱ्याची नेमणूक केली होती. श्री. देशपांडे आणि 'हरियाली'चे हे सर्व मार्गदर्शक त्या चिमुकल्यांचे काका झाले आणि त्यांच्या डब्यातील खास घरगुती पदार्थांचे वाटेकरीही झाले. वन्यजीवांचे रक्षण करायचे असेल, मानवी जीवनातील त्यांचे महत्त्व घरोघर पोहोचवायचे असेल, तर त्यासाठी कर्त्या पिढीवर दडपण आणणे आवश्यक आहे. त्यासाठी एका बाजूला ज्येष्ठ नागरिक आणि दुसऱ्या बाजूला छोटी मुले यांना त्याविषयी अधिक साक्षर आणि सक्षम केले, तर हा संदेश अधिक प्रभावीपणे पोहोचू शकेल, असा एक धडा या वन्यजीव सप्ताहातून 'हरियाली'चे कार्यकर्ते आणि संबंधित वनाधिकारी यांनी घेतला. अशा प्रकारे केलेले अरण्यवाचन म्हणजे अरण्यरुदन ठरणार नाही याची त्यांना खातरी वाटली.

लोकसत्ता : २७-१०-२००८



# फणसाडचे गोड अभयारण्य

''आमच्या या अभयारण्यात ७१८ प्रकारचे वृक्ष, १६४ प्रकारचे पक्षी, ९० प्रकारची फुलपाखरे आणि २७ प्रकारचे सर्प आढळून येतात.'' – रेंजर श्री. हिंगोले माहिती देतात. ५३ चौरस किलोमीटरवर पसरलेल्या या अभयारण्यात बरेच बारमाही पाणवठे आहेत. त्यांना इकडचे अरण्यवासी 'गाण' असे म्हणतात. उदाहरणार्थ चिखलगाण, फणसाडगाण इत्यादी. फॉरेस्टर हरिश्चंद्र नाईक सांगतात, ''मुरूड–जंजिरा येथील नबाबाच्या अखत्यारीतील हे जंगल खास त्याच्यासांक्ष आणि त्याच्याकडे येणाऱ्या शाही पाहुण्यांसाठी शिकारीला राखून ठेवलेले होते. त्यामुळे यात शिकारीसाठी असलेली मोकळी मैदाने आणि गवताळ कुरणे आपल्याला जागोजागी दिसतील'',– इति साहाय्यक वनसंरक्षक श्री. आर. आर. पाटील.

ठाणे वनविभागाच्या अखत्यारीतील आणि रायगड जिल्ह्यात असलेल्या फणसाड अभयारण्यात 'हरियाली'च्या माध्यमातून अरण्यवाचन करायला आलेल्या ज्येष्ठ नागरिकांचे समुपदेशन अभयारण्यातील अधिकारी करत असतात. अशा प्रकारची छापील आणि पाठांतरित माहिती जवळपास प्रत्येक अभयारण्यात गेल्यावर आपल्याला मिळते. मात्र एक–दोन दिवसांच्या धावत्या भेटीवर येऊन हरिण, वाघ, अजगर, सांबर, तरस आदी बघायची अपेक्षा ठेवून येणाऱ्या  हौशी पर्यटकांना यांपैकी पाच टक्केदेखील प्राणी बघायला मिळत नाहीत आणि मग ते अपेक्षाभंग झाल्याचे दुःख घेऊन परत जातात.

मात्र या वेळी वन्यजीव सप्ताहात खास अरण्यवाचन करण्यासाठी आलेल्या ज्येष्ठ नागरिकांचे असे नव्हते. त्यांच्याबरोबर आलेले वनाधिकारी त्यांना पक्षी–प्राणी न दाखवता आपल्या जंगलाचे एकेक पापुद्रे त्यांच्यासमोर उघडे करत होते. पावलागणिक वेगवेगळ्या प्रकारच्या कोळ्यांनी विणलेली वैशिष्ट्यपूर्ण जाळी, शिकार पकडण्याच्या त्यांच्या तरकिबी, वेगवेगळ्या प्रकारच्या मुंग्यांनी तयार केलेली वारुळे, पॅगोडा आदी प्रकारची शिल्पे, माती उकरून बिळे करणारे खेकडे, वृक्षांप्रमाणेच पर्णिकांखाली आणि जमिनीवर

घरटी/बिळे करून राहणारे पक्षी आदींविषयीच्या माहितीचा स्रोत प्रा. डॉ. माधुरी पेजावरांच्या मुखातून धो-धो वाहत होता. गौरी म्हणजेच कळलावीची फुले, वेगवेगळ्या औषधी वनस्पती, गरुड-वड आणि त्याची फळे, गारंबीची प्रचंड शेंग आणि मजबूत बिया यांविषयी, प्रत्यक्ष पुराव्यासकट माहिती प्रा. मीरा बोरकर, वनरक्षक हरिश्चंद्र नाईक, श्री. नंदन कलबाग आदी जाणकार आलटूनपालटून देत होते. देणाऱ्यांकडे माहिती आणि ज्ञानाचा प्रचंड खजिना होता. घेणारे आपापल्या ओंजळीतून घेता येईल तेवढे घेत होते. उन्हाळ्यातदेखील संपूर्ण कोरडे न पडणारे अनेक पाणवठे या जंगलात आहेत. त्यांना इकडे 'गाण' म्हणतात. येथे प्रचंड कुरणे, तसेच १९४७च्या आधी असलेल्या वेगवेगळ्या शासकांना शिकार करायला मिळावी म्हणून ठेवलेली, शिकारीची मैदाने आहेत. आता उरल्यासुरल्या वन्य श्वापदांना लपूनछपून होत राहणाऱ्या शिकारीला बळी पडावे लागते. त्यातून जे वाचतात, त्यांचे दर्शन अशा रीतीने अरण्यवाचन करायला येणाऱ्या लोकांना केव्हातरी होते. मात्र त्यासाठी योग्य काळात (जानेवारी ते मे) आणि छोट्या-छोट्या गटांनी येऊन भरपूर पायपीट करण्याची तयारी ठेवावी लागते.

उंच वृक्षांच्या शेंड्यांवर घरटी करून राहणारे सर्पगरुड, प्रचंड आकाराची केसाळ शेकरू खार, हाताच्या तळव्याएवढा जायंट कोळी इत्यादी प्राणी या जंगलाची खास वैशिष्ट्ये आहेत. तसेच नोव्हेंबर ते जानेवारी-फेब्रुवारीपर्यंत निळ्या-जांभळ्या गुच्छेदार फुलांनी बहरणारा अंजनी वृक्ष, केशरी-भरजरी-जिलेबी रंगांच्या तजेलदार तुर्रेबाज फुलांनी बहरणारी, वाघेरी/वाघेटी/राया/घोमाडी इत्यादी नावांनी ओळखली जाणारी काटेरी वेल इत्यादी करतील आपले मन आकर्षित न करेल तरच नवल!

मात्र याच नव्हे, तर कुठल्याही जंगलातील जैविक विविधतेचे दर्शन आपल्याला केवळ एखाद्याच ऋतूतील एखाद्याच भेटीत होत राहणे अशक्य असते. त्यामुळेच आपल्या परिसरातील वन्य जीव, पशू-पक्षी-वनस्पती यांचे बऱ्यापैकी ज्ञान करून घ्यायचे असेल आणि त्यांचे एकमेकांतील नाते समजून घेऊन स्वर्गीय आनंद मिळवायचा असेल, तर त्यासाठी आपल्याला वरचेवर जायला सोयीचे होईल अशा एखाद्या अभयारण्याशी अथवा वनाशी जवळीक साधायला हवी. वेगवेगळ्या ऋतूंमध्ये तिथे जात निःस्तब्ध अवस्थेत त्या सगळ्यांचे निरीक्षण करत राहायला हवे.

आपण वर्षभरातून किमान चार वेळा असे केलेत ना, तर त्यांतील वृक्षवेली, वनस्पती, फुलपाखरे, पक्षी, प्राणी आदी सगळे आपल्याशी कसे भडभडून बोलू लागतात, बघा! या सगळ्यांची भाषा वेगळी असली, तरी आपली पंचेंद्रिये मात्र तीच असतात. एरवी बधिर झालेल्या आपल्या सगळ्याच संवेदना सचेतन होऊन जातात की नाही, याचा अनुभव घ्याच!

गर्दीपासून लांब राहिलेले फणसाड अभयारण्य अशा मैत्रीसाठी छानच आहे!

पूर्वप्रसिद्धी : १५-१०-२००८

# आदर्शवनातील गणेशसागर



संजय गांधी राष्ट्रीय उद्यान आपल्या शहराचाच एक भाग असल्याचे ठाण्यातील रहिवाशांना अगदी परवा-परवापर्यंत ठाऊक नव्हते. मात्र गेली तीन वर्षे 'हरियाली', तसेच उद्यानाच्या येऊर विभागाचे वनाधिकारी आणि इतर कर्मचारी यांच्या अथक प्रयत्नांमुळे या उद्यानातील झाकली माणके ठाण्यातील नागरिकांच्या नजरेसमोर यायला लागली आहेत.

सोबतच्या छायाचित्रात दिसणारा तलाव अशाच माणकांपैकी एक. ठाण्याच्या मानपाडा-कोकणीपाडा विभागात उद्यान आणि 'हरियाली' यांच्याच प्रयत्नांनी असे तलाव आकार घेत आहेत. या 'आदर्शवन प्रकल्पांतर्गत' आदर्शवनात आत्तापर्यंत पाच तलावांची निर्मिती झाली असून, अजून दोन तलावही लवकरच होतील. त्या पाच तलावांपैकी पहिलाच, टिकूजीनी वाडीजवळ असलेला, हा 'गणेश सागर'. एके काळी दगड काढून झालेल्या या खाणीचे रूपांतर आता एका सुंदर तलावात झाले आहे. बारा महिने पाणी राखणारा हा तलाव पावसाळ्यात तुडुंब भरून त्याच्या सांडव्यातून पाणी वाहू लागते. त्या वेळी येथील दृष्य केवळ अप्रतिम असते. त्याच्या सभोवताली सर्व बाजूंनी जाणीवपूर्वक लावलेल्या वृक्षांचे दाट जंगलच तयार झाले आहे. त्याच्या उजव्या हाताला वरच्या बाजूला वनखात्याची 'देखरेख चौकी' असून त्याच्या शेजारी नवीन उभी राहिलेली, संपूर्णपणे बांबू आणि कारवी यांचा उपयोग करून बांधलेली आणि शेणामातीने सारवलेली 'हरियाली कुटी' आहे. शेजारीच खास पक्षिनिरीक्षणासाठी उभी केलेली दुसरी एक छोटीशी कुटी आहे. कोतवाल, किंग फिशर, दयाळ, मैना, बुलबुल, पोपट या पक्ष्यांचे इथे बऱ्यापैकी वास्तव्य असून, इतरही सुमारे साठ प्रकारच्या विविध पक्ष्यांचे अस्तित्व जाणवते.

वनविभागाने लावलेल्या वृक्षांमध्ये आकेशिया, शिसव, हिरडा, बेहडा, खैर इत्यादी वृक्षांचा प्रामुख्याने भरणा आहे. तसेच 'हरियाली'च्या माध्यमातून

अनेक शाळांतील आणि कॉलेजांतील विद्यार्थ्यांनी येथे गेल्या तीन वर्षांत आंबा, जांभूळ, बोर, विलायती चिंच या वृक्षांच्या बियांची पेरणी मोठ्या प्रमाणावर केलेली आहे. त्यामुळे पूर्वी उघडा-बोडका पडलेला हा परिसर आता बारमाही हिरवाईने गच्च भरलेला दिसतो. डोंगरावर आणि अवतीभोवती या हिरवाईतून हिंडण्यासाठी जांभूळमार्ग, बोरमार्ग, बांबूमार्ग, उंबरमार्ग अशा जंगलवाटा मुद्दाम तयार केलेल्या आहेत.

जांभूळमार्ग आणि उंबरमार्गाने आपल्याला हरियाली डोंगराच्या वरपर्यंत जाता येते. या मार्गांची लांबी प्रत्येकी सुमारे एक किलोमीटर एवढी आहे. या मार्गांनी डोंगरावर जाताना ठिकठिकाणी विश्रामपठार आणि दर्शनिकांचा विकास करण्याचे काम चालू आहे. त्या ठिकाणांवरून ठाणे शहर आणि खाडी परिसराचे थेट नव्या मुंबईपर्यंतचे विहंगम दृष्य दिसते. या डोंगराची उंची जवळजवळ पारसीक डोंगराएवढीच असून (समुद्रसपाटीपासून जवळजवळ १००० फूट) डोंगरावरून पारसीकचे दृष्य छान दिसते.

येथील बांबूमार्ग आणि बोरमार्ग आपल्याला घनदाट वृक्षराईतून हरियाली तलाव आणि पक्षी सरोवराकडे घेऊन जातात. गर्द हिरवळीतून सर्व बाजूंनी सुरेखसा धबधबा कोसळत असताना पावसाळ्यात दिसणारे हरियाली तलावाचे दृष्य आपल्या मनःपटलावर कायमचे कोरले जाते आणि मग या सर्व परिसरातून फिरत असताना आपण ठाण्यातच आहोत यावर विश्वास ठेवणे कठीण जाते.

हरियाली तलावाच्या वरच्या बाजूने कोकणीपाड्याकडे जाणाऱ्या रस्त्याचे नाव आहे 'गुहामार्ग'. कारण याच मार्गावर आहे बिबळ्याची एक गुहा आणि आपण योग्य पद्धतीने वनखात्याच्या मार्गदर्शनाखाली जाणीवपूर्वक विहार केला, तर आपल्याला बिबळ्याचे दर्शन होणे अशक्य नाही. खरे म्हणजे उन्हाळ्याच्या दिवसात गणेशसागर आणि हरियालीसागर येथे पाणी पिण्यासाठी बिबळ्याचे रोजचे येणे असते. त्याच्या पाऊलखुणांचे घेतलेले ठसे निसर्गप्रेमींना बघण्यासाठी चौकीवर ठेवलेले आहेत.

गेल्या एका वर्षापासून येथे माकडांचे आणि हरिणांचेदेखील वास्तव्य जाणवू लागले आहे. भारतीय नाग, धामण इत्यादी मधूनच दृष्टीस पडतात. याच परिसरात आता आकार घेताहेत निसर्ग जिज्ञासा केंद्र आणि आकाश दर्शन केंद्र. मात्र त्यांची माहिती मिळवायला आपल्याला प्रत्यक्ष या

प्रकल्पासच भेट द्यायला हवी. काय विचारलेत ? तिथे जायचे कसे ? अगदी सोपे आहे. बसने जायचे असेल, तर आपल्या घरापासून जवळ असेल त्या बस थांब्यापासून कोकणीपाडा अथवा टिकूजीनी वाडीच्या बसने शेवटच्या थांब्यापर्यंत जायचे. तिथे उतरल्यावर त्या रस्त्याच्या टोकापर्यंत सुमारे शंभर यार्ड चालले की समोरचा गणेशसागर आपले स्वागत करतो. आपल्या स्वतःच्या वाहनाने जाणार असलात, तर घोडबंदर रोडने मानपाड्यापर्यंत येऊन डावीकडे टिकूजीनी वाडीकडच्या रस्त्याला वळून रस्त्याच्या टोकापर्यंत जाऊन आपले वाहन व्यवस्थित रस्त्याच्या कडेला लावायचे आणि तलावाकडे जायचे. इथे जाण्यासाठी जून ते डिसेंबर हा सगळ्यांत उत्तम काळ. सकाळची सहा ते दहा वाजेपर्यंतची वेळ छानच. विविध पक्ष्यांचे आवाज, डोंगरवाटा आणि पावसाळ्यात अर्ध्या डोंगरावर उतरून आलेले ढग आपल्या स्वागतासाठी सज्ज असतात. मात्र तिथे जायच्या आधी आणि तिथे भ्रमंती करत असताना काही पथ्ये पाळणे आवश्यक आहे. हा परिसर संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या अखत्यारीत असल्यामुळे शक्यतोवर वनाधिकाऱ्यांना आधी कळवून गेलेले बरे. वनाचा रखवालदार, 'हरियाली'चे कार्यकर्ते यांपैकी कोणीतरी आपल्याला जागेवर भेटतातच. फिरताना कधीही एकट्याने फिरू नका, कुठल्याही प्रकारची घाण किंवा गोंगाट करू नका. प्लॅस्टीकच्या पिशव्यांचा कचरा करू नका. आपल्याला कचरा दिसल्यास तो उचलून जवळच्या खड्ड्यात टाका.

तलावाच्या सान्निध्यात फिरायचे असेल, तर साधारणतः दोन तास आणि डोंगरमाथ्यावर जाऊन यायचे असेल, तर तीन तास येथील निसर्गसुखाचा आस्वाद घ्यायला पुरेसे आहेत. जाताना डोक्यावर टोपी, गळ्यात कॅमेरा, दुर्बीण आणि काखेतल्या पिशवीत पाण्याची बाटली न्यायला विसरू नका. थोडा वेळ तिथे सतत चालू असलेल्या वृक्षलागवड, नाल्यांमध्ये बांध घालणे अशा श्रमदानी कामासाठीदेखील द्या.

अधिक वेळ भ्रमंती आणि वनविहाराचा आनंद घेणाऱ्यांनी डोंगरमाथ्यावर जावे. तेथून एक वाट वनीपाड्यावरून येऊरकडे (डाव्या बाजूला) आणि दुसरी डोंगराला उजव्या हाताने वळसा घालून ओवळ्याकडे जाते. ओवळ्याचाही डोंगर पार करून पलीकडे गेले, तर चेन्यावरून बोरिवलीकडे जाता येते. मात्र त्यासाठी सबंध दिवस काढायला

हवा. वटपौर्णिमेच्या आदल्या दिवशी सकाळी या परिसरात वड, पिंपळ, उंबर इत्यादी वृक्षांची लागवड मोठ्या प्रमाणावर होत असते. त्यात आपण अवश्य सहभागी व्हावे. निसर्गानंद मिळवायचा असला, तर आपण या परिसरात अवश्य भटकंती करावी.

आपल्याला अत्यंत थोड्या वेळात, कमीतकमी खर्चात, जास्तीतजास्त निसर्गसहवास हवा असला, तर एवढ्या जवळ एवढे सुरेख ठिकाण माझ्या बघण्यात अजूनतरी आलेले नाही.

लोकसत्ता : १०-६-१९९९



# भेंडी-कामजाई-चेना परिक्रमा

नर्मदा परिक्रमेविषयी मी माझ्या बालपणापासून वाचत-ऐकत आलो आहे. तेव्हापासूनच नदी परिक्रमा या प्रकारच्या साहसी भ्रमंतीविषयी माझ्या मनात खूप उत्सुकताही आहे. अशी परिक्रमा करणाऱ्यांमध्ये निसर्गप्रेम, साहस, जिद्द, जिज्ञासा, आत्मविश्वास असे गुण आपोआपच वाढीस लागतात, पण त्याहीपेक्षा महत्त्वाचे म्हणजे संशोधक वृत्तीने अशी परिक्रमा केल्यास निसर्ग, वृक्ष, वनस्पती, प्रस्तर, पक्षी, कीटक यांच्याबद्दल जाण येऊन भ्रमंती खूपच फलदायी होते.

अशा मोहिमांमध्ये सहभागी होणे सर्वसामान्य माणसास शक्य होत नाही, कारण त्यासाठी बराच वेळ काढावा लागतो. खर्चाचादेखील विचार करावा लागतो. पण अशी परिक्रमा ही काय चीज असते आणि त्यातून काय साध्य होते, याची झलक अनुभवायची असेल, तर आपण आपल्याच परिसरात असलेल्या एखाद्या छोट्या नदीची अथवा नाल्याचीदेखील अशी परिक्रमा करण्यास काय हरकत आहे?

संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या डोंगरात उगम पावून उद्यानातील तानसा-विहार-पवई यांपैकी एखाद्या तलावास अथवा जवळच्याच खाडीस जाऊन मिळणाऱ्या अनेक नद्या-नाले- ओढ्यांच्या कडेकडेने गेल्यास निसर्गाची किती विविध रूपे बघायला मिळतात, हे एकदा अनुभवायलाच हवे. जेमतेम २० किलोमीटर लांबीचे हे मार्ग, पण जागोजागी कोसळणारे सुंदर धबधबे, अकराळ-विकराळ खडक, धोकेबाज डोह, भुरळ पाडणारे उंच डोंगर, धडकी भरवणाऱ्या खोल दऱ्या, आपल्याला ठाऊक असलेले-नसलेले अनेक वृक्ष, वनस्पती, पक्षी, फुलपाखरे, कीटक, सर्प, वन्य आणि रानफुले यांपैकी बहुतेक सगळेच आपल्या नजरेस पडते.

एखाद्या ठिकाणाच्या गुणविशेषावरून त्याची विचित्र नावे पडल्याचेदेखील आपल्याला जाणवते. उदाहरणार्थ, चिखलाचे पाणी, आंब्याचे पाणी इत्यादी. असाच एक ओढा ठाण्यातील येऊर विभागातून सुरू होऊन वाटेत

ठिकठिकाणी आपले नाव बदलत जातो. तो 'कामजाई नाला' नावाचा होय. येऊर म्हणजे तेच, तुम्हा-आम्हांला ठाऊक असणारे, वर्तमानपत्रातून गाजणारे! ठाणे-पाटोणापाडा-येऊर बसने निघून शेवटच्या थांब्यावर उतरायचे. आजमितीस बांधून असलेले बंगले तिथे संपतात. तिथे डावीकडे वळल्यास एक छोटासा नाला लागतो. त्यातून येऊरचे सारे सांडपाणी वाहत जाते. तिकडे दुर्लक्ष करून त्या नाल्याच्या कडेकडेने पुढे प्रवाहाच्या दिशेने चालत जायचे. (तसा हा प्रवाह जवळच्याच एअर फोर्सच्या डोंगरातून सुरू होतो. प्रवाहाच्या उलट दिशेने एखादा किलोमीटर चालत गेलो, तर आपल्याला त्याच्या उगमाचा शोध लागू शकेल.)

सुमारे फर्लांगभर चालत गेल्यावर सांडपाण्याची दुर्गंधी कमी होत जाऊन नाल्याला ओढ्याचे रूप येत असल्याचे जाणवायला लागते. ओढ्याच्या पात्रात दलदलीच्या ऐवजी खडक, वाळू, साठून राहिलेले पाणी, ओढ्यातील वनस्पती दिसू लागतात. ओढ्याच्या दोन्ही बाजूंनी वृक्ष दाट आणि मोठमोठे होत गेले असल्याचे जाणवू लागते. ओढ्याचे पात्र अधिकाधिक रुंद आणि खोल होत जाते. शक्य असेल तिथे ओढ्यातून आणि एरवी डाव्या-उजव्या किनाऱ्यावरून प्रवाहाच्या दिशेने चालत राहिल्यास दोन्ही बाजूंना आणि ओढ्याच्या मध्येदेखील करंज, कांडोळ, पायर, पिंपरी, दांडोशी (पिवळा शिशिर), महू, जांभूळ असे अनेक प्रकारचे वृक्ष आपल्या आगमनाने उल्लासित झालेले दिसू लागतात. नुकताच पावसाचा शिडकावा झालेला असल्याने करकुम्याचे गुलाबी तुरे, हिरवी पाने आणि पिवळ्या फुलांसहित आपल्या अस्तित्वाची जाणीव करून देतात. असेच एक किलोमीटर चालत गेल्यावर आपल्या डावीकडून भेंडी नाला वाहत येतो आणि या दोन्ही नाल्यांचा संगम होतो. संगमाच्या या स्थानाचे नाव 'मजबोडन' असे असून हे स्थळ अतिशय प्रेक्षणीय आहे. इथे थोडा वेळ थांबून जवळचे पाणी पीत पुढील भ्रमंतीत दिसणारी फुलपाखरे, वनस्पती, पक्षी यांची माहिती लिहिण्याची तयारी करायला हरकत नाही. नुसताच भ्रमंतीचा आनंद लुटण्यासाठी आलेल्यांनी या भानगडीत न पडता नेत्रसुखाचा आस्वाद घेत राहणे अधिक फायद्याचे.

इथून पुढचा प्रवास अधिक रोमांचक होत जाणारा. आता पात्रातील खडक अकराळ-विकराळ रूप धारण करताना दिसतात. वस्तीजवळील मानवनिर्मित

घाणींचे साम्राज्य संपून खरेखुरे जंगलराज सुरू झालेले असते. ओढ्यात ठिकठिकाणी धोकादायक डोह निर्माण झालेले दिसतात. ओढ्याच्या पात्रातच अनेक छोटेमोठे धबधबे असतात. ओढ्यातून एका काठावरून दुसऱ्या काठाकडे जाणे पावसाळ्यात धोक्याचे असते, कारण पाण्याला चांगलाच वेग असतो आणि साठलेल्या पाण्याच्या खोलीचा आणि खडकातील घळींचा अंदाजच येऊ शकत नाही.

एव्हाना आपण मजबोडनपासून सुमारे एक किलोमीटर चालत येऊन खामडोह या रोमांचक ठिकाणी येऊन पोहोचतो. नदीच्या पात्रातील खडकांमधील घळी उन्हाळ्यात उघड्या पडतात, तेव्हा उरात धडकी भरवतात. पावसाळ्यात त्यांचे खरे स्वरूप लक्षात येत नाही. या सबंध परिसरात वृक्षराई दाट असून, विविध प्रकारचे पक्षी आणि फुलपाखरे नजरेस पडतात. वृक्ष आणि वनस्पतींमध्ये घडत जाणारा बदल लक्षणीय असतो.

तिथून घागरफोडीवरून चालत-चालत आपण नाकरुंड या स्थळापर्यंत येऊन पोहोचतो. इथे जंगलातील कच्चा रस्ता नाल्याला पार करून दोन्ही बाजूंना जाताना दिसतो. उजवीकडचा रस्ता पुन्हा येऊर गावाकडे (सुमारे तीन किलोमीटर) जातो, तर डावीकडचा पुढे जंगलात जातो. जंगलाकडच्या रस्त्याने सुमारे दोनशे यार्ड चालून आत गेलो, तर तिथेच आहे येऊरचा सुंदर, पण कुप्रसिद्ध, धबधबा. कुप्रसिद्ध एवढ्यासाठी की, इथे आजवर अनेक तरुणांनी आपल्या निष्काळजी वागण्याने स्वतःच्या शरीराला आणि प्रसंगी जिवालाही इजा करून घेतली आहे. भर पावसाळ्यात रस्ता पार करून धबधब्याकडे गेलेले हौशी प्रवासी ओढ्याला आलेल्या पुरामुळे पलीकडेच अडकून पडल्याची उदाहरणे आहेत. या ठिकाणी एखादा संरक्षक साकव उभारून या स्थळाचा पर्यटकांच्या दृष्टीने चांगला विकास करता येण्यासारखा आहे. अर्थात ते राष्ट्रीय रक्षित उद्यानाच्या संकल्पनेत बसत नसल्यामुळे वनविभाग तसे करण्यास नाखूश आहे.

इथून पुढे ओढ्याचे रूपांतर नदीत होते आणि नदीतूनच सुमारे पाच किलोमीटर पुढे चालून गेल्यानंतर ही नदी चायना ब्रीजजवळ खाडीस मिळते. तिथे तिचे पात्र बरेच रुंद झालेले असते. या पुढच्या पाच किलोमीटरच्या भ्रमंतीतही आपल्याला नवनवीन वृक्ष, वनस्पती आणि पशुपक्ष्यांची ओळख होत जाते. दोन्ही बाजूंस बांबू, पांढरा कुडा, काळा कुडा, कारवी यांचे जंगल

आहेच. याच परिसरात डिकेमालीसारखे औषधी झुडूप आणि वेलीचा पळस मी पहिल्यांदा बघितला. गेली दोन वर्षे ठाणे कॉलेजातील विद्यार्थी आणि 'हरियाली' या ओढ्यावर ठिकठिकाणी बांध घालून पाणी अडविण्याचे प्रयत्न करत आहेत. 'हरियाली'चे कार्यकर्ते आणि ठाणे कॉलेजातील एन. एस. एस.चे प्रमुख प्रा. यशवंतराव भिडे या नदीवर मोठा बांध घालून पाण्याचा चांगला साठा करून पाणपक्ष्यांसाठी अभय निर्माण करण्याचे वेड डोक्यात घेऊन आहेत. प्रा. डॉ. माधुरी पेजावर इथल्या वनस्पती, वृक्ष, फुलपाखरे, पक्षी यांच्यामागे भ्रमरासारख्या धावत राहून बरोबरच्या लोकांना त्यांची माहिती देत असतात. श्रीहर्ष नित्सुरे तर कीटकवेडेच. ते शंभर फूट लांबून बघूनही फुलपाखराची जात अचूक सांगतात.

तर अशा वेड्या लोकांना बरोबर घेऊन ही परिक्रमा करण्यात खूपच आनंद असतो. परिक्रमेसाठी हवा असलेला वेळ कमीत कमी चार तास. सबंध दिवस काढू शकलात, तर परिक्रमेचा खरा आनंद मिळून अनुभव आणि माहितीत बऱ्यापैकी भर पडते. आपल्या मुलांनी मोठे झाल्यानंतर अंटार्क्टिकासारख्या मोहिमा गाजवाव्यात असे वाटत असेल, तर त्याची सुरुवात त्यांना या परिक्रमेपासून करून द्या.

लेखात सांगितलेल्या स्थळांची नावे स्थानिक माहितीवर आधारित आहेत. नावांच्या तशा पाट्या कुठेही लावलेल्या नाहीत, मात्र विद्यार्थ्यांच्या गटांनी आणि निसर्गप्रेमींनी अशा पाट्या तयार करून वनखात्याच्या सहकार्याने आणि मार्गदर्शनाखाली त्या जागोजागी लावल्यास ती निसर्गसेवाच ठरेल.

लोकसत्ता : १७-६-१९९९



# उपेक्षित विंडी आणि भूतकापरी

ओवळा! विस्तारित ठाणे महानगरपालिकेचे एक उपनगर. कापूरबावडी नाक्यापासून ठाणे घोडबंदर रोडवर बरोबर आठ कि. मी. अंतरावर. विस्तारलेला नवीन रस्ता, दोन्ही बाजूला कारखाने आणि नित्य नव्यानी उभी राहणारी गृहसंकुले. अगदी अलीकडेपर्यंत, म्हणजे सुमारे दहा वर्षे पूर्वीपर्यंत, हे गाव ठाणे महानगरपालिकेच्या हद्दीबाहेर असून इथे अगदी कमी वर्दळ असायची.

येथील आमरायांमधील पायरी आंब्यांचा सुगंध क्रॉफर्ड मार्केटमध्ये दरवळत असे. रत्नागिरी- देवगड हापूसप्रमाणेच ओवळा-कोलशेतपर्यंतचा पायरी आंबा त्या स्थानाच्या नावावर विकला जात असे. आता त्यांपैकी मोजक्याच आमराया शिल्लक राहिल्या असून इतर जागांवर विटांच्या भट्ट्या आल्या आहेत. येथील फुलोरा नर्सरीच्या परिसरात १९९७चे महाराष्ट्र राज्य पक्षिमित्र संमेलन भरले होते. त्या वेळी ठाण्यातून अनेक निसर्गप्रेमी आणि पक्षिमित्र या भागात पहिल्यांदाच आले होते. रस्त्यालगतच महानगरपालिकेची पाण्याची उंच नजरेत भरण्यासारखी टाकी आहे. त्यालगतच बस स्टॉप. मग हॉटेल. नेहमीच्या जंगलातून काटेसावर, कुडा, विविध वेली यांच्यातून आपली वाट येते ती धरणाच्या टेपवर. टेप म्हणजे पठार. 'धरणाचा टेप' म्हणण्याचे कारण, एके काळी आरोरा बागेच्या मालकांनी इथे छोटासा बांध घालून डोंगरातून येणारे पाणी अडवून एक जलाशय तयार केला होता. आता धरण जाऊन केवळ त्याचे नावच लोकांच्या स्मरणात राहिले आहे. आसपास टाकरडा, पानखिंड असे आदिवासी पाडे आहेत.

इथून आपण जातो ते काठीचे पाणी आणि काजू खांड यांतून वाकड्या आंब्याकडे. आसपास काजू, कुंभा, करवेल इत्यादी वृक्ष आहेत. बाजूच्या डोंगरघळीतून पाणी खळाळत खाली जात असते. दाट होत जाणाऱ्या जंगलातून आपण कोकंबीच्या घोलात येऊन पोहोचतो. शनिवारी, १९ जून रोजी, इथे आलो असताना एक रोमांचक प्रसंग अनुभवायला मिळाला. या

ठिकाणी आल्याबरोबर सोबत असणाऱ्या सगळ्यांचे डोळे, नाक आणि कान नकळत विस्फारले गेले, पाय थबकले आणि सावध नजरांनी सारे जण एकमेकांकडे बघायला लागले. आजूबाजूच्या वृक्षांमध्ये बदल होऊन आम्ही बांबू आणि रानकेळींनी घेरले गेलो होतो. नाकात उग्र दर्प शिरला. माधुरी पेजावर नुकत्याच उन्हाळ्यात वाघाच्या खानेसुमारीत सामील झाल्या होत्या. त्यांच्या कानांनी विमानाच्या घरघरीसारखा आवाज टिपला. पण तो विमानाचा नसून खानेसुमारीच्या काळात ऐकलेलाच आवाज आहे, हे त्यांच्या लक्षात आले. वाटाड्या सुनील बांबूच्या जाळ्यांकडे बघू लागला. होय! बिबळ्या जवळपासच असावा किंवा आमच्या चाहुलीमुळे नुकताच तिथून दुसरीकडे गेला असावा.

धो-धो कोसळणाऱ्या पावसामुळे आणि दगडाळ जमिनीमुळे पावलांचे ठसे दिसणे शक्य नव्हते, पण एकमेकांशी बोलून खातरजमा केली. विलक्षण अनुभूती होती ती. डोंगर भ्रमंतीमध्ये असे अनेकदा घडले आहे. अस्तित्व जाणवते, पण नजरेला पडत नाही आणि म्हणूनच आम्ही घाबरलो नाही. बिबळ्याचा शोध घ्यायच्या फंदात पडलो नाही, कारण त्याला बघणे हे आमचे उद्दिष्ट नव्हते. तो आपल्या वाट्याला जात नाही, मग आपणही कारण नसताना त्याच्या वाटेला जाऊ नये. आपण त्याच्या मागावर आहोत हे कळले की तो अधिक सावध होऊन (एरवीदेखील सावधचित्त असतोच असतो!) त्याच्या मार्गातून आपल्याला दूर करण्यासाठी जिवाची बाजी लावतो. भारतात क्षात्रधर्माचा ऱ्हास होत चाललेला असला, तरी बिबळ्याने मात्र आपला क्षात्रधर्म अजून सोडलेला नाही.

कोकंबीच्या घोलातून आपण जातो 'विंडी' कडे, म्हणजे शिखराकडे. हे शिखर म्हणजे एक प्रचंड कातळ आणि दगडाधोड्यांचा पसारा! वरून दिसणारे चौफेरचे दृष्य बघायलाच हवे. एव्हाना ढग खाली आणि आपण वर अशी परिस्थिती निर्माण झालेली असते. खाडी अगदी जवळ असली, तरी धुक्यामुळे ती केवळ पुसटशी दिसते. चौफेर हिरवाई! आता इथून खाली उतरताना ढगांमधून तरंगत असल्यासारखे वाटते. म्हणजे आपण फार वर चढलेले नसतो, पण ढगच आपल्या भेटीसाठी कौतुकाच्या भावाने खाली उतरलेले असतात! आणि म्हणूनच मग आपणही स्वतःला धन्य समजून विनम्र भावाने खाली उतरू लागतो!

या रानात आपल्याला रानचिकू, रानकेळी, बांबू भरपूर प्रमाणात दिसतात. रानचिकू आपल्या नेहमीच्या चिकूपेक्षादेखील गोड, म्हणजे सॅक्रीनसारखे, लागतात अशी माहिती मिळाली. बांबूचे कोवळे कोंब आणि रानकेळीच्या दांड्यातील गराची भाजी चांगली लागते म्हणून त्याची मोठ्या प्रमाणावर तोड होत असते.

खाली उतरताना जरा वेगळ्या, म्हणजे टाकरडा गावाकडील रस्त्याने आलो, तर आपल्याला 'भूतकापरी' धबधब्याचे दर्शन होते. गर्द झाडीतून एका घळीमधून या धबधब्याचे पाणी मोठ्या कातळावरून फेसाळत खाली कोसळते. डोंगरातून पाणी वर्षभर झिरपत असले, तरी हा धबधबा बघण्याची खरी मजा जुलै ते ऑक्टोबरपर्यंतच. उगाचच एकसारखी येऊरच्या धबधब्यावर किंवा खंडाळ्याला गर्दी करण्यापेक्षा कधीतरी इकडे डोकावून पाहणे नक्कीच आनंद देणारे ठरते. पण जवळच्या सौंदर्यापेक्षा लांबचे डोंगर जास्त भुरळ घालतात हेच खरे!

लोकसत्ता : २४-६-१९९९



# डोंगर आणि काकडी

गेल्या आठवड्यातील भ्रमंतीत मी आपल्याला ओवळ्याच्या विडी डोंगरावर आणि भूतकापरी धबधब्याकडे नेले होते. आज तसाच थोडा पुढे जाऊन 'गौळदेवा'चा परिचय करून देणार आहे.

गेल्या वेळेसारखेच बसने अथवा उपलब्ध असेल त्या वाहनाने घोडबंदर रोडवरील ओवळ्यास जायचे आणि डाव्या हाताला वळून डोंगराच्या दिशेने चालू लागायचे. इथे धरणाच्या टेपावर आल्यानंतर विडी डोंगराकडे न वळता उजव्या हाताला चांभारकुंडाच्या दिशेने चालायला लागायचे. दोन डोंगरांच्या घळींमधून खळखळत येणारे पाणी एका मोठ्या कातळावरून खाली कोसळते, हेच ते चांभारकुंड!

थोड्या प्रयत्नांनी आणि अल्पशा खर्चानी छोटासा बांध घालून इथे सुरेख जलाशय तयार करता येण्यासारखा आहे. या साठलेल्या पाण्यामुळे जागेचे सौंदर्य तर वाढेलच वाढेल, पण पावसाळ्यानंतर शुष्क होत असलेली जमीन आणि वातावरण आर्द्र होऊन जवळच्या पानखंडा, टाकरडा, भायंदरपाडा, काजूपाडा या आदिवासी पाड्यांवरील आणि ओवळा गावातील लोकांना पिण्याचे पाणी उपलब्ध करून देता येईल. उन्हाळी पीक घ्यायची सोय करून वृक्षतोडीत गुंतलेल्या आदिवासींना उत्पन्नाच्या वैध मार्गाकडे वळविता येईल. पण हे करायचे कोणी? जमीन वनखात्याकडे असल्यामुळे इतर सरकारी खात्यांनी तिकडे लक्ष द्यायचे नाही आणि जंगलातील श्वापदांना लागणारे पाणी डोंगरातच कुठेतरी उपलब्ध होत असल्यामुळे हे पाणी अडविण्याची आवश्यकता वनखात्याला वाटत नाही. त्यामुळे ही अनमोल आणि जीवनदायी राष्ट्रीय नैसर्गिक संपत्ती जवळच्याच खाडीतून आसपासची नागरी घाण ओढत नेत समुद्रात लुप्त होते. मेरा भारत महान! सेवाभावी संस्थांना काम करण्यासाठी इथे भरपूर वाव आहे, पण योजक हवाच!

या परिसरातील डोंगरउतारावर या दिवसांत आदिवासी लोक भरपूर काकडी लावतात. उन्हाळ्यात काकडी लावण्यासाठी आळी केली जाऊन ती

भाजली जातात. पाऊस पडायच्या थोडे आधीच या आळ्यांमध्ये बी रुजवून चांभारकुंडाच्या पाण्याच्या आधारावर ते बी एखादा आठवडा जिवंत ठेवतात, तोवर पावसास सुरुवात होतेच आणि मग काकडीचे हे ताणे जमिनीच्या उताराच्या दिशेने धावू लागतात. मध्येच आड येणाऱ्या तणाची उपटणी करून त्यांची निर्वेध वाढ होण्यास बाया-माणसे मदत करतात. हे ताणे आता फुलांवर आले असून अजून साधारणतः पंधरा दिवसांच्या आत ही काकडी बाजारात यायला लागेल. अशा वेळी शेतात जाऊन या काकड्या तिथेच खाण्यात मजा असते. आपण काश्मीरच्या डोंगरउतारावरील केशराच्या मळ्यातील सुंगधी सौंदर्याचे वर्णन करतो. हुरडा खाण्यासाठी सोलापूर, नगर, मराठवाड्याकडे जातो. पोळ खायला सुरतेला जातो. भुईमुगाच्या शेंगा खायला खानदेशात जातो, पण डोंगरउतारावरील सुमधुर, पाणीदार, रानाळ काकडी खायला ठाणे महानगरपालिकेच्या हद्दीतील ओवळा आणि जवळपासच्या आदिवासी पाड्यांवर मात्र कधीच जात नाही! कोणाचे आणि किती कौतुक करायचे? निसर्गप्रेमी आणि नागरी जीवनाला कंटाळलेले त्रस्त नागरिक इकडे येऊ लागले तर या काकड्यांना चांगला भाव मिळू शकेल. काकडी खायला येणारी व्यक्ती हळूहळू नाचणीची भाकरी आणि पिठले, सोबत वांग्याचे भरीत, मागू लागेल आणि मग अशा रीतीने आपल्याला आदिवासी घरांतील पुढच्या पिढ्यांना जंगलतोड करणे आणि दारू गाळीत राहणे यांपेक्षा काहीतरी वेगळा मार्ग दाखविता येईल. विकासाचा मार्ग केवळ शाळा आणि महाविद्यालयांतून जातो, असे समजणे सर्वथैव चूक आहे. जिज्ञासू डोळे आणि संवेदनशील मन घेऊन, निसर्गसंरक्षण आणि संवर्धनाची कास ठेवून आपण वाटचाल करू लागलो, तर एकाच ठिकाणी पोहोचण्याचे अनेक पर्यायी मार्ग आपल्याला दिसू लागतात! डोंगरउतारावरील काकड्यांचे सौंदर्य निरखित आपण नागेरे, चिंचोटीचे पाणी, आंब्याचे पाणी आदी ठिकाणांवरून शेवखिंडीत केव्हा येऊन पोहोचतो, ते आपल्यालाच कळत नाही. ओवळ्याच्या बाराखंडा (विंडी) डोंगराला वळसा घालून शेवखिंड आपल्याला डोंगराच्या मध्यावर आणून सोडते. इथे खालच्या दरीत माकडांचे अस्तित्व बऱ्यापैकी जाणवते. या परिसरात आल्याआल्याच जंगलाच्या राजाचे अस्तित्व ठायीठायी जाणवू लागते, मात्र पावसाळ्यात ते लक्षात येत नाही. जंगल-जाळ्यांवरून मात्र ते लक्षात येऊ शकते.

वाटेत जंगली द्राक्षवेलींवर द्राक्षांचे घडच्या घड लागलेले दिसतात. ते खायचे नाहीत, फक्त बघायचे. चिकणीचे झाड दिसले, तर त्यावरील फळे खाण्यास हरकत नाही. गुंजेच्या आकाराची आणि पिकल्यानंतर जांभळी-काळी पडणारी आंबट-गोड चवीची ही फळे आपली तृष्णा भागवण्यास मदत करतात.

आता वाटेत येणाऱ्या जांभळीच्या माळावर थोडे विसावून वृक्षवेलींची माहिती करून घेण्यासाठी थोडा वेळा घालवायला हरकत नाही. बरोबर कोणी जाणकार असले, तर ते आपल्याला कुकवेर, पेजरी, घनसोर अशा इथल्या वैशिष्ट्यपूर्ण वृक्षांची माहिती करून देतात. प्रत्येक वृक्षवेलीचा अनेकदा परिचय करून घेऊन- देखील त्यांची नावे आणि गुणवैशिष्ट्यांची सांगड घालणे मला अजून जमलेले नाही, पण त्यामुळे आपले काही अडून राहत नाही! नवख्यांनी आणि वयस्कांनी इथेच थांबून चौफेरचे सौंदर्य न्याहाळावे, अवखळ पोरांनी व अनुभवी तरुणांनी वाटाड्याच्या साहाय्याने कड्याकडे जायला हरकत नाही.

इथून पुढे कडा फार उंच नाही की चढण्यास फारसा अवघडही नाही; पण एकावर एक असलेले असंख्य कातळ, त्यांतील घळी, शेवाळाची निसरण यांमुळे थोडा धोकादायक मात्र आहे. पण म्हणून घाबरायचे कारण नाही. पुढे जायचे! कारण कडा चढून गेल्यानंतरचे सौंदर्य काय वर्णावे? आकाश निरभ्र असले, तर संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाचा संपूर्ण एकशे तीन कि.मी. चा परिसर चढून गेल्यावर आपल्या दृष्टीच्या आवाक्यात येतो. जागेवरच गोल फिरलो, तर काय दिसते? कांदिवली-भाईंदरच्या काँक्रीटच्या जंगलापासून घनदाट वृक्षराईच्या नैसर्गिक अरण्याकडे बघताना आपल्या नजरेस पडते, ती एक लांबच्यालांब खाडी, ती ओलांडून जाणारा पश्चिम द्रुतगती महामार्ग व त्यावरील चिमुकली वाहने, येथून एवढासा दिसणारा प्रचंड मोठा पूल, घोडबंदर रस्ता व त्यावरील वाहने, बाराखंडा डोंगर, येऊरच्या एअर फोर्सचा दिमाखदार कम्युनिकेशन टॉवर, हिरव्या रंगाच्या आकृतीच्या आत असलेला राष्ट्रीय उद्यानाचा सगळा भाग! त्या भागाचे महत्त्व लोकांच्या लक्षात आणून देण्यासाठी उद्यानाच्या अधिकाऱ्यांनी उद्यानातील त्या 'कारगील'चे महत्त्व जाणून त्यावर लक्ष केंद्रित करणे आवश्यक आहे.

येथील एका प्रचंड मोठ्या कातळाखालील गुहेत आदिवासी देवदेवतांच्या छिन्न-विच्छिन्न झालेल्या दगडी मूर्ती दिसतात. हेच ते गौळदेवाचे स्थान! आसपासच्या परिसरातील आदिवासींशिवाय इथे कधी कोणाचा पाय लागत नाही, असे बरोबरच्या मार्गदर्शकांकडून कळले. पुराणवस्तू संशोधनवाले कधी इकडे फिरकून बघतील काय? काय सांगावे, इथे शिलाहारांचा कसला इतिहास दडलेला असेल ते?

मन हे असे भरकटत असताना आपण जलधारांनी केव्हा आणि किती न्हाऊन निघतो ते कळतच नाही. निरभ्र आकाशच नव्हे, तर सगळा आसमंत ढगांनी व्यापला जाऊन आपण आकाशात तरंगू लागतो.

पण आता भरकटणाऱ्या मनास स्थिर करून स्थित झालेल्या पायांना चावी देणे आवश्यक असते. चढण्यापेक्षाही खाली उतरतांना अधिक काळजी घेणे आवश्यक असते. वाटाड्या चांगला असला, तर आलात त्या मार्गाने परत ओवळ्याला पोहोचाल. अधिक माहीतगार असला, तर तो कदाचित वेगळ्या मार्गाने आपल्याला चेनाला आणून सोडेल. आणि आपली भ्रमंतीची हौस अजून भागली नसली अन् संध्याकाळपर्यंत वेळ काढायची तयारी असली, तर आपल्या सांगण्यावरून वनीच्या पाड्यावरून हरियाली डोंगराशी अथवा येऊरच्या पायथ्याशीही आणून सोडेल आणि आपल्या अनुभवात आणि थकव्यात अधिक भर घालेल. कशात किती आनंद घ्यायचा ते बरोबर असलेल्या सगळ्यांच्या डोळस सहमतीने आपणच ठरवायला हवे! मात्र इथे येण्याचा अनुभव ऐन पावसाळ्यात केव्हातरी एकदा घ्यायला हवाच. डोंगरउतारावर काकड्या आहेत, तोवरच या! आपल्या मदतीसाठी राजू, विजू, संजू हे वाटाडे 'हरियाली'च्या मार्गदर्शनाखाली तयार होताहेत!

लोकसत्ता : १-७-१९९९



# महाराष्ट्राचे सुंदरबन नागला जंगल!

''अल्याड डोंगर, पल्याड डोंगर, कुण्या काळी सुंदर बंदर; गच्च तिवरे, दाट झाडी, मधून वाहते सुंदर खाडी – असे ते काय?'' काय म्हणालात? नाही ओळखायला येत, काही 'क्ल्यू' द्या! बरे तर, घ्या क्ल्यू! संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील एक वनविभाग, क्षेत्र सुमारे ४० चौ. कि. मी. आता तरी ओळखा पाहू.

अजून नाही लक्षात येत? बरे, सुंदरबन कुठे आहे, ते आहे ठाऊक? हो, पश्चिम बंगालमध्ये कलकत्त्याजवळ! व्वा! केवढा पक्का आहे भूगोल! मग आता सांगा, महाराष्ट्राचे सुंदरबन कुठे आहे ते?

अं हं! नाही सांगता येत? शाब्बास! आता तुम्ही माझ्यासारखेच खरे ठाणेकर म्हणून शोभता. हेच तर आमचे खरे वैशिष्ट्य! आम्हांला सगळ्या जगाचा भूगोल आणि इतिहास ठाऊक असतो, सौंदर्यस्थळांची माहिती असते. आमच्या परिसराविषयी मात्र आम्ही जबरदस्त अज्ञानी असतो.

असो. अगदी कल्याणपासून वसईपर्यंतच्या टापूत अनेक छोट्या– मोठ्या नद्या खाडीला येऊन मिळतात. वसईकडे जाताना विस्तारित होऊन खाडी समुद्राला मिळते. उल्हास, काशेळी, चेना, मिठी अशा अनेक नद्या आणि असंख्य पावसाळी ओढ्यांचा तिच्यात समावेश होतो. औद्योगिक वसाहती आणि नागरी वस्त्यांजवळून येणाऱ्या या नद्या वाहत येताना प्रचंड प्रमाणात प्रदूषित झालेले पाणी, पत्र्याचे डबे, प्लॅस्टिकच्या पिशव्या, सडका–कुजका भाजीपाला, बिअरच्या रिकाम्या बाटल्या, पालापाचोळा, मलमूत्र अशी सर्व प्रकारची घाण, मानवाने निसर्गाला जणू देणगी म्हणून दिल्याप्रमाणे घेऊन येतात. पण म्हणून विशालहृदयी समुद्राची प्रतिनिधी असलेली खाडी, मानवाचा दुःस्वास नाही करत. ती सारे काही आनंदाने स्वीकारते. तिच्या दुतर्फा असलेली समुद्री वृक्षसंपदा (तिवरे, म्हणजेच 'मॅनग्रोव्हज') त्यातील पचवता येण्यासारखी घाण आणि विषारी द्रव्ये शोषून घेते आणि उरलेली शुद्ध हवेच्या स्वरूपात आपल्याला पुन्हा द्यायचा प्रयत्न करते. तिच्या या प्रयत्नांना

न जुमानता पुरून उरणारी, प्लॅस्टिकच्या बाटल्या- पिशव्या आणि दारूच्या बाटल्या यांची घाण मग समुद्रात फेकली जाते अथवा पुन्हा किनाऱ्याकडे ढकलली जाऊन निसर्गवृद्धीत अडथळा होऊन बसते. म्हणूनच मग प्रश्न पडतो की, एवढी प्रचंड घाण वाहून नेणाऱ्या खाडीला सुंदर का म्हणायचे ? तर, ती खाडी घाणीची आणि प्रदूषणाची तीव्रता तर कमी करतेच, पण तिच्यामुळे तिच्या दोन्ही तीरांवर सुंदर अशी समुद्री वृक्षसंपदा जिवंत राहिलेली आहे. तिच्याचमुळे असंख्य मासे, खेकडे आणि इतर लहानमोठे जलचर प्राणी टिकून आहेत आणि या जलचरांमुळेच नाना तऱ्हांचे सुंदर-सुंदर पाणपक्षीदेखील या परिसरात आपल्याला दिसताहेत, म्हणून.

शिवाय या खाडीला सुंदर म्हणायचे ते आणखी एका कारणासाठी- तिच्या दोन्ही बाजूला उंच उंच डोंगर आणि घनदाट जंगले आहेत. या खाडीच्या काठी नैसर्गिक भूजंगल आणि समुद्री जंगलाचे असे बेमालूम मिश्रण झालेले दिसते की, जाणकारांशिवाय इतरांना या भूवनस्पती आणि समुद्री वनस्पती यांमधील फरक कळणे कठीणच. तिवरे आणि करवंदाच्या जाळ्या इथे चक्क एकमेकांशेजारी दिसतात. तिवरे खाऱ्या पाण्यात वाढतात; तर करवंद, जांभूळ, बांबू ही गोड्या पाण्यावर वाढणारी झुडपे आणि झाडे. हा ढोबळ फरक आपण लक्षात घेतला, तर मी सांगतो आहे त्यातील नवलाई लक्षात यावी.

याच खाडीत भायंदरपाडा, नागला, गायमुख अशी रेतीबंदरेपण आहेत. मला आपले लक्ष वेधायचे आहे ते खाडीच्या पलीकडील, म्हणजे ठाणे शहराविरुद्ध दिशेला असलेल्या बाजूकडे.

ठाणे-घोडबंदर रोडने कापूरबावडी-मानपाडा-वडवली-ओवळा-नागला-गायमुख असे करत अहमदाबाद मार्गापर्यंत जायचे.

खाडीवरचा पूल अहमदाबादच्या दिशेला पार करून गेल्यावर ताबडतोब ससूनवपाडा हे छोटेखानी गाव (पाडा) येते. तिथे उजव्या हातालाच वनविभागाची, संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या नागला विभागाची, चौकी आहे. येऊरच्या वनविभागाकडून घेतलेला प्रवेश परवाना दाखवून चौकीदाराच्या मार्गदर्शनाखाली आपण पुढे गेलात की चक्क दाट जंगलातच शिरता! प्रामुख्याने बांबूच्या जाळ्या असलेल्या या वनात परात, कुंभ, कुसुम, जांभूळ, रानउंबर, चावळी, आपटा, कांचन असे वृक्षदेखील भरपूर

प्रमाणात दिसतात. साधारणतः दोनेक कि. मी. आत गेल्यावर उजव्या हाताला खाडीच्या तोंडात शिरलेला एक प्रचंड मोठा खडक लागतो. हा 'सलीम अली' पॉइंट! सुप्रसिद्ध पक्षितज्ज्ञ सलीम अली या खडकावर बसून तासन् तास पक्षिनिरीक्षण करत असत. एके काळी याच ठिकाणी समुद्रमार्गे येणारा चोरीचा मालदेखील मोठ्या प्रमाणात उतरवला जात असे. इथून खाडीच्या समोरच्या बाजूला रेतीचे पडाव भरले जात असल्याचे दृष्य दिसते, तसेच मोकळा डोंगर, गौळकडा इत्यादी डोंगरांची हिरवाईदेखील इथून दिसते.

इथून पुढे आपण करवेलीच्या पाण्यावरून 'कोरलाई' पर्यंत सुमारे सहा किलोमीटर घनदाट वृक्षराईतून चालत येतो. या दिवसांत झालेल्या सुरेख पहिल्या पावसामुळे पाण्याला चटावलेले नाले ओढाळ होण्यासाठी आसुसलेले आपल्याला जाणवतात. अर्धवट कुजलेला पालापाचोळा खाडीत समर्पित व्हायच्या आधीच्या घटका मोजत असतो. त्याच्यामुळे निर्माण झालेला रक्तपिपासू डासोळा आपल्याला आलेले बघून खूप आनंदित होऊन गूं-गूं असे संगीत ऐकवत आपल्याला सर्वांगाने भेटतो! त्याला प्रेमाने आंजारत-गोंजारत, नव्याने दिसणाऱ्या झाडोऱ्याची माहिती करून घेत 'टॉवर पॉइंट'जवळ येऊन पोहोचायचे. नकळत पायांखाली येणाऱ्या खेकड्यांना न घाबरता चक्क खाडीच्या तोंडात शिरलेल्या कातळापर्यंत पोहोचायचे.

इथून दिसणाऱ्या सौंदर्याला शब्दांत पकडण्याचा प्रयत्न न करता ते प्रत्यक्षात बघण्याचेच आवाहन मी आपणांस करतो. भरतीची वेळ असली, तर पाणी चक्क पायांशी खेळत असते. दाट वृक्षराईतील तिवरे कोणते आणि करवंदीची जाळी कुठली हे लक्षातच येत नाही. समोर दिसतो तो मोकळा डोंगर. त्याच्या डोक्यावर टक्कल पडल्यासारखा दिसणारा उघडा पडलेला कातळ आहे म्हणूनच तो मोकळा डोंगर. पाठीमागे नवरानवरीचा डोंगर. डाव्या हाताला दिसतो तो परताण्याचा डोंगर. डोंगरच डोंगर अन् वृक्षच वृक्ष! वेलींनी लगडलेले, पानांनी बहरलेले! सकाळी लवकर गेलात, तर पक्ष्यांची किलबिल, एरवी खेकड्यांची बिलबिल अन् डासांची मस्ती!

का बरे हा सुंदर निसर्ग आमच्यापासून एवढा लपून राहतो? त्याला आमची भीती का वाटते? वनाच्या संरक्षकांना न जुमानता अव्याहत होणारी लाकूडचोरी, गस्तीनौकांना दाद न देता बिनधास्त आणि चोरट्या मालाची ने-आण हे पााहून त्याला आपल्यासमोर येण्याचे भय वाटते का?

अनेक शाळा आणि सहा महाविद्यालये असलेल्या ठाणे शहरातील विद्यार्थ्यांच्या सहली येथे कधी निसर्गशिक्षणासाठी आल्याची माहिती दुर्दैवाने मिळू शकली नाही. का बरे असे व्हावे?

त्यातल्या त्यात आनंदाची गोष्ट म्हणजे, संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातर्फे समुद्री वनस्पतींचे संशोधन, संवर्धन आणि लोकशिक्षण यांसाठीचा एक महत्त्वाचा प्रकल्प उभारण्यासाठी या ठिकाणाची निवड झाली आहे. त्याविषयी अधिक माहिती पुन्हा केव्हातरी.

लोकसत्ता : ८-७-१९९९



# ठाणे ते मुलुंड निसर्गप्रवास

ठाणे ते मुलुंड रस्त्याने जेमतेम चार कि. मी. चे अंतर. चेक नाक्यावरची वर्दळ आणि आक्रमणे सोडली तर सुंदर रस्ता. दुतर्फा कॅडबरी ते केळकर असे सुगंध पसरविणारे कारखाने, तसेच इतर महत्त्वाचे औद्योगिक प्रकल्प. गर्दीतही रस्त्याच्या दुतर्फा वाढलेले आणि आपले अस्तित्व टिकवून ठेवलेले सुंदर वृक्ष. पश्चिम बाजूला अस्तित्व जाणवेल एवढ्या उंचीचा आणि पावसाळ्यात हिरवागार दिसणारा डोंगर, नव्हे डोंगरांची एक छोटीशी रांगच. डोंगराच्या जवळजवळ अर्ध्या-अधिक उंचीपर्यंत मानवाने व्याघ्रकुटुंबीय बिबळ्याच्या राज्यावर केलेले कुत्सित आक्रमण !

मी त्या डोंगराच्या अलीकडे-पलीकडे, तसेच त्याला छेद देऊन तारामाता खिंडीतून अथवा जंगलेश्वर महादेवाच्या घळीतून खूप हिंडलो होतो, पण एकदा सरळ डोंगरमाथ्यावरून ठाणे ते मुलुंड चालत जायची खूप इच्छा होती. रस्त्यावरून डोंगराकडे बघितले असता ते सहज शक्य वाटते, पण मला आक्रमणखोर मानवी हद्दीकडून वर चढून जाण्यापेक्षा 'लाइन ऑफ कंट्रोल'च्या पलीकडील दाट जंगलातून जायची उत्सुकता जास्त होती. मग काय ? केले काही निसर्गवेडे एकत्र. संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या येऊर येथील वनाधिकाऱ्यांची परवानगी आणि मार्गदर्शन घेतले आणि येऊरच्या पाटोदापाडा बस स्टॉपवर (मागील एका लेखात उल्लेख केल्याप्रमाणे हा येऊर येथील शेवटचा बस स्टॉप) उतरलो.

तेथून सद्गुरू सेवा आश्रमाच्या दिशेने जाऊन आश्रमाच्या अलीकडच्याच उजव्या हाताच्या पायवाटेने जंगलात शिरायला सुरुवात केली. या वाटेने थोडे पुढे आलात की, तुम्ही हायेस्ट पॉइंटकडे जाणाऱ्या डांबरी रस्त्यावर येता. रस्त्यानेच उजव्या हाताला वळून थोडे चालत गेलात, तर डाव्या हाताला एक पायवाट लागते. ही वाट सरळ हुमायून श्रावण जलाशयाकडे जाते. भटकंती करणाऱ्या फारच थोड्या लोकांना हा जलाशय आणि त्याच्या बाहेरील धबधब्याची माहिती असते. कोल्हापूर पद्धतीचा बांध असलेला हा जलाशय

पूर्ण भरून उंच कातळावरून त्यातील पाणी खाली ओसंडू लागले की धबधब्याचे सौंदर्य मनाला खूप भुरळ पाडते आणि मग त्याच्याखाली जाऊन पांढऱ्याशुभ्र सौंदर्यात न्हाऊन निघायची अनिवार इच्छा होते. पण हा मोह टाळायचाच! सौंदर्याचा आस्वाद त्याच्या मोहात न पडता केवळ दृष्टीनेच घ्यायचा असतो, अन्यथा ते फारच दाहक ठरू शकते!

ऑक्टोबरनंतरच्या काळात या जलाशयावर पाणी प्यायला येणारी श्वापदे नजरेस पडतात. त्यांचे निरीक्षण करण्यासाठी वनविभागाने एक मचाण बांधून ठेवले आहे. आपण मचाणावर चढताना ते कुचकुच करत असले, तरी आपला भार सांभाळते! हा जलाशय भेंडी नाल्यावरच बांधलेला आहे. जलाशयाच्या वरच्या दिशेला कधी ओढ्याच्या डाव्या अंगाने, तर कधी उजव्या अंगाने असे करीत चाललो की, ही जंगलवाट आपल्याला पिंपळाच्या टेपावर आणून सोडते. या टेपावर आल्यानंतर मागे वळून बघितले, तर आपल्याला मोरकिना डोंगराचे सुरेख दृष्य दिसते. ते नजरेने पिऊन, जमिनीपासून एक वीत ते हातभर वर आलेल्या हिरव्या पानांतील गुलाबी कणसे आणि पिवळसर फुले असलेल्या करकुम्याचे अगणित तुरे, बांबूच्या जाळ्या, जंगली हळद अशा ठाऊक असलेल्या–नसलेल्या अनेक औषधी वनस्पतींमधून मार्ग काढत आपण मामा–भाच्याच्या डोंगरावर येऊन पोहोचतो.

उंचीत थोडा–फारच फरक असलेले, पण एकमेकांना लागून असलेले हे दोन कडे. यांच्या नावांविषयी अनेक आख्यायिका ऐकायला मिळतात. त्या आख्यायिकांच्या खरे–खोटेपणाविषयीची शहानिशा करता येणे शक्य नसल्यामुळे मी आपल्याला त्यात गुंतवत नाही. या ठिकाणी असलेल्या कुटीत नेहमी फकिरी वेषातील दोन–चार लोकांचे अस्तित्व जाणवते. थकून–भागून आलेल्या भटक्यांना हवा असला, तर दुधाशिवायचा चहा मिळतो. कुटीजवळ असलेल्या पठारावरील चार–पाच फणसांच्या झाडांमधून अलीकडे–पलीकडे बघितले, तर एअर फोर्सचा टॉवर असलेला हायेस्ट पॉइंट लक्ष वेधून घेतो आणि 'क्या बात है' असे उद्गार तोंडी येतात. त्याच्या सगळ्या बाजूंनी उंचसखल डोंगर आणि दऱ्या, समोर कान्हेरी गुंफा, पूर्वेला ठाणे–मुलुंडचा औद्योगिक परिसर आणि दाटीवाटीने उभी राहिलेली निवासी संकुले, गलिच्छ वस्त्या, त्याच्या पलीकडून वाहणारी सुंदर, पण प्रदूषित

खाडी, तिच्यावर असलेले जुने-नवे पूल हे सारे नजरेच्या आवाक्यात येते. त्यातील आक्रस्ताळ्या, आक्रमक मानवी भूभागाकडे पाठ करून आपण वाघोबाच्या साम्राज्याकडे बघायचे. त्या डोळ्यांना सुखद अशा हिरव्या गहिराईत, नैसर्गिक सीमा असलेल्या आपल्या उर्वरित साम्राज्याचे रक्षण कसे करायचे याची चिंता करत, तो अस्वस्थपणे येरझारा घालत असणार अथवा सकाळच्या नाश्त्यानंतर अंमळसा पहुडला असणार. प्रचंड वृक्षतोड करत, वणवे लावत मानवाने त्याची 'लाइन ऑफ कंट्रोल' आपल्या दिशेने केव्हा आणि कशी पुढे सरकवलेली असते, ते वाघाच्या लक्षातच आलेले नसते. आता त्याची जाणीव झाल्यानंतर मात्र हे आक्रमण थांबवून परतवून कसे लावायचे याचा मार्ग तो शोधत असतो.

वनजमिनींवर आक्रमण करणाऱ्या या माणसांचेदेखील वेगवेगळे रंग असतात. मामा-भाच्याच्या डोंगरावर हिरवा आणि त्यापुढील जंगलेश्वर महादेवाच्या डोंगरावर भगवा, तर खाली कुठे निळा असे वेगवेगळ्या रंगांचे झेंडे लागलेले दिसतात. सगळेच प्रवेश अवैध पद्धतीने झालेले असले, तरी त्या झेंड्यांचे रंग वनरक्षकांना भीती घालीत असतात. ते झेंडेदेखील आपल्या भारतीय नियमावली आणि संस्कार यांत तयार झालेले असतात. आक्रमकांना हुसकावून लावण्याऐवजी न्यायालयासारख्या तिसऱ्या पक्षाची मदत घेण्याचा प्रकार होत राहतो आणि मग त्यातून निरनिराळे गुंते निर्माण होत राहतात. जंगलात गेल्यानंतर आपापल्या रंगांचे झेंडे कसले लावतात? त्या झेंडेवाल्यांना हुसकावून लावण्याचे बळ वनरक्षकांच्या अंगी यावे एवढे नैतिक बळ समाजाला त्यांच्या पाठी का नाही उभे करता येत? अशाच आक्रस्ताळ्या आक्रमकांपासून कारगीलचे रक्षण करण्यासाठी लढणाऱ्या जवानांच्या पाठी नाही आपण आपले नैतिक बळ उभे करत? कारगील आपल्या समाजात एक नवी जाणीव आणि आत्मविश्वास निर्माण करेल, अशी आशा बाळगू या!


कारगीलसारख्याच, पण कमी उंचीच्या, टेकड्यांची दुलई धरतीमातेच्या अंगावर आळसावून विसकटलेल्या अवस्थेत पडलेली दिसते. कारगीलच्या टेकड्यांवर आच्छादन बर्फाचे, तर इथे पावसाळी हिरवाई आणि गर्द वनराईचे! एका डोंगरावरून दुसऱ्या डोंगरावर सहज जाता येईल असे वाटले, तरी ते तसे शक्य नसते. बऱ्याच ठिकाणी डोंगर अर्ध्या उंचीवर खाली उतरून

दुसऱ्या डोंगरावर जाण्यासाठी परत वर जावे लागते. कुठे तुटलेला मार्ग सांधावा लागतो.

मामा-भाच्याच्या डोंगरावरून आपण शंकरपिंड अथवा जंगलेश्वर महादेवाच्या डोंगराच्या रस्त्याने दुसऱ्या एका डोंगरावर येऊन पोहोचता. इथल्या उघड्या पडलेल्या कातळावर ठिकठिकाणी जंगली लिली फुललेली दिसते. खाली तुळशी आणि विहार जलाशय आपले लक्ष वेधून घेतात. आम्ही तिथे गेल्यावर आलेल्या जोराच्या सरींनी आणि टपोऱ्या थेंबांनी आमची पावसात न्हाऊन निघायची हौस चांगलाच भागवली. सगळ्यांच्या तब्येती खूश! बरोबर असलेल्या देशपांड्यांनी ताबडतोब 'दिलखुश डोंगर' म्हणून त्या डोंगराचे नामकरण करून टाकले! तिथून तारामाता खिंडीतून पुढे गेलो की आपण चक्क मुलुंडच्या सर्वोच्च डोंगरावर येऊन पोहोचतो. आता इथून तुळशी, विहार यांबरोबरच पवई तलावपण दृष्टीस पडतो. पूर्वोत्तर वाहणारी खाडी दिसते ती वेगळीच! सगळीकडे पाणीच पाणी! वरूनदेखील पावसाचे कोसळणे चालूच असते. आकाशातून ढग खाली उतरताना आपण नेहमीच बघतो. पण खाली दरीत उतरलेले ढग दोन डोंगरांच्या खिंडीमधून बिगीबिगी जात असलेले बघायचे असतील, तर डोंगररांगांच्या माथ्यावरच जाऊन बसायला हवे! मुलुंडच्या डोंगरावरून पाण्याच्या प्रवाहासोबत खाली उतरत आपण इनर व्हील पार्क आणि तेथे नव्याने होऊ घातलेल्या निसर्ग विहार यांजवळ येऊन पोहोचतो. तिथून खाली गेल्यावर रिक्षाचा किंवा बसचा स्टॅन्ड जवळच आहे. थोड्या सोप्या मार्गाने उतरायचे असेल, तर भांडूप कॉलेजतर्फे लावलेल्या ग्लॅरीसीडिया वृक्षांच्या दाट जंगलातून उतरता येते नि बघून समाधान वाटते.

तर असा हा दिवसभराचा ठाणे-मुलुंड निसर्गप्रवास. वाटेवर कारगीलचा थोडा फेरफटका होणे नैसर्गिकच होते असे नाही आपल्याला वाटत?

लोकसत्ता : १५-७-१९९९



# एक आव्हान : मुंडा डोंगराचे

ठाण्याहून ठाणे-घोडबंदर रोडने जाताना जकात नाक्याच्या थोडे पुढे गेले की, काजूपाडा वस्ती लागते. या पाड्याच्या मागे उभा असलेला एक डोंगर आपले लक्ष वेधून घेतो, ते त्याच्या वैशिष्ट्यपूर्ण भौगौलिक अस्तित्वामुळे.

या डोंगराच्या अलीकडच्या बाजूला ठाणे-घोडबंदर रोड, तर पलीकडे ठाणे खाडी आहे. खालपासून जवळजवळ तीन चतुर्थांश उंचीपर्यंत दाट वृक्षरायांनी नटलेला हा डोंगर माथ्याजवळ उघडा पडलेला असला, तरी वरच्या कातळावर ठिकठिकाणी मातीचा बारीक थर आहे; पण या डोंगरावर वरच्या बाजूला एकही झाड अथवा झुडूप वाढू शकत नाही; असा या परिसरात राहणाऱ्या लोकांचा गाढ समज आहे. झाड-झुडूप लावण्याचे तसे प्रयत्न झाल्याचेही कोणी सांगत नाही. पण त्याच्या वरच्या भागात काही उगवून टिकूच शकत नाही अशी ठाम अंधश्रद्धा मात्र आहे. झाड टिकू शकत नाही याचे प्रमुख कारण असे संभवते की, या डोंगराचा वरचा भाग जवळपासच्या इतर डोंगरापासून वेगळा पडलेला असून, तीन बाजूंनी खोलगट दऱ्या आणि एका बाजूने खाडी आहे. त्यामुळे वाऱ्याची दिशा कुठलीही असली, तरी वर सदैव भन्नाट वारा असतो. त्यामुळे तेथे एकेकट्याने उगवलेले कोणतेच झुडूप पुरेशा संरक्षणाअभावी वाढू शकत नसावे. तेथे काही उगवले, तरी त्याच्या मुळांना जमिनीतून पाणी शोषून घेऊ शकण्याच्या मर्यादेपर्यंत पाणी मिळत नसावे. पण या भागात प्रयत्न करून कण्हेर, जास्वंद, बोगनवेली अशा प्रकारची फुलझाडे; करवंदे, बोरे, जांभूळ इत्यादी प्रकारची फळझाडे आणि काटेरी वृक्ष किंवा ग्लिरिसिडियासारखी झाडे लावली, तर ती नक्कीच वाढतील आणि डोंगराचे स्वरूप बदलू शकतील.

याखेरीज एक अंधश्रद्धाही दूर होऊ शकेल. मात्र हे कोणीतरी मनावर घ्यायला हवे. हा डोंगर संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या अखत्यारीत येतो. रस्त्यावर दोन अभियांत्रिकी महाविद्यालये, एक तंत्रनिकेतन आणि बऱ्याच शाळा आहेत. आदिवासींच्या हिताचे रक्षण करण्यासाठी अस्तित्वात

आलेल्या काही सेवाभावी संस्था आहेत. सामाजिक वनीकरणाच्या अनेक योजना आहेत, मात्र या योजना लोकांपर्यंत पोहोचलेल्या नसतात. सेवाभावी संस्थांची सेवा कुठे नजरेत भरत नाही, पण भाव खाणारे कार्यकर्ते मात्र गावोगावी आढळतात. विद्यार्थिवर्गाने पुस्तकाच्या बाहेर डोकावू नये असा शिक्षकांचा सर्वसाधारणपणे समज असावा. विद्यार्थीदेखील आपल्यामधील निर्मितिक्षमतेविषयी अनभिज्ञ असतात. सरकारी खात्यांची दृष्टी नकारात्मक असते. म्हणजे सर्वच परिस्थिती प्रतिकूल !

पण म्हणून काय घाबरायचे की हात-पाय गाळून बसायचे ? हेच तर खरे आव्हान असते आणि असे आव्हान स्वीकारण्यातच पुरुषार्थही असतो. आपल्या सभोवताली दारिद्र्य नसावे, घाण नसावी, अज्ञानाचे साम्राज्य नसावे, तसेच सभोवतालचे डोंगर उघडे-बोडके नसावेत आणि जमीन पडीक नसावी यासाठी प्रत्येकाने जाणीवपूर्वक प्रयत्न करत राहायलाच हवेत, नाही का ? ज्याला जे भावेल, जसे जमेल, तसे ते त्याने करत राहावे; जिथे असे काम चालू असेल, प्रयत्न होत असतील, तिथे त्यांत सहभागी व्हावे, आपल्याकडून होईल तसे योगदान द्यावे. पावसाळी भ्रमंतीसाठी बाहेर पडताना प्रत्येक व्यक्तीने स्वतः तयार केलेले अथवा स्वतःच्या प्रयत्नांनी मिळविलेले किमान एकेक रोप बरोबर नेऊन, दिसेल त्या मोकळ्या जागेत, येणाऱ्या-जाणाऱ्याला अडचणीचे होणार नाही, अशा प्रकारे लावले; तर पर्यावरणरक्षणासाठी वेगळी सभा-संमेलने घ्यायला लागणार नाहीत की वृक्षदिंड्या काढायला लागणार नाहीत. पर्यावरण रक्षणाचे काम विकास योजनांना विरोध करून अथवा 'होऊ देणार नाही' स्वरूपाच्या नकारात्मक चळवळी उभारून नव्हे; तर 'होत कसे नाही ? करूनच दाखवीन' अशा जिद्दीने होणार आहे. मुंडा डोंगराचे हेच आव्हान आणि आवाहनही आहे. स्वीकारणार आहोत का आपण ते ?

खाडीवरून डोंगरावर जाताना दलदल लागते. त्यातील प्रदूषित घटक शोषून हवा शुद्ध करण्याचे काम दलदलीतच वाढलेली तिवरे करत असतात. सर्व अडचणींना तोंड देत ती वाढत असतात आणि आपले काम चोख रीतीने बजावत असतात. त्यांतच कधीतरी त्यातील काही कारगीलचे रक्षण करणाऱ्या जवानांसारखी धारातीर्थीदेखील पडतात. ते जवान आणि ती तिवरे

यांपासून आपण एवढेदेखील शिकलो नाही, तर आपण जीवन जगलो असे आपल्याला कसे म्हणता येईल ?

खाडीच्या बाजूने येणाऱ्या वाऱ्याबरोबर कधी-कधी नवसागराचा वास येतो. हवेतील प्रदूषणाबरोबरच या सामाजिक प्रदूषणाचेदेखील अस्तित्व समजून घेऊन ते दूर करण्याचे प्रयत्न करायला हवेत. त्याची भीती न बाळगता आपण डोंगराच्या दिशेने वर जात राहिलो, तर तेथील जंगली श्वापदांचीपण भीती वाटेनाशी होते. प्राणी अगदी समोर नाही आले, तरी कंद खाण्यासाठी त्यांनी पोखरलेली जमीन आणि त्यांनी ओरखाडलेली, तुडवलेली झुडुपे बघितली की भेकर, रानडुक्कर, ससे इत्यादींचे अस्तित्व सहज जाणवते. कासऱ्यासारख्या जाड वाढलेल्या आणि अनेक वृक्षांना जोडून एकत्र ठेवण्याचे काम करणाऱ्या वेली आपल्याला 'टारझनगिरी' करण्याच्या मोहात पाडतात, पण जंगलातून फिरताना अशा मोहाला नेहमीच लांब ठेवायचे.

'मोहा'च्या फुलांच्या संगतीतदेखील जास्त वेळ नाही राहायचे. नाहीतर हा वास आपल्या नाकातून डोक्यात केव्हा शिरतो ते आपल्याला कळतच नाही (असे म्हणतात)!

असल्या मोहाच्या क्षणांतून वाट काढत आणि अर्धवट कुजलेल्या पाचोळ्यावर थैमान घालणाऱ्या डासांपासून आपले रक्षण करून घेत, आपण झाडे-झुडूपे न उगवणाऱ्या मुंडा (म्हणजे मोकळा) डोंगराच्या माथ्यावर येऊन पोहोचतो आणि मग बघता बघता 'मोगॅम्बो खूश' होतो.

डोळ्यांत येणाऱ्या पाण्याचे कारण भन्नाट वारा असतो की तेथील निसर्गदृष्य बघितल्यामुळे झालेला अवर्णनीय आनंद असतो ? फारशी उंची नसलेला एखादा छोटासा डोंगरदेखील आपल्याला बरेच दृष्टिसुख देत खूप काही शिकवून जातो. वळणा-वळणाचा घोडबंदर रस्ता, डोंगरामुळे मध्येच तुटक दिसणारी खाडी आणि खाडीच्या वळणांमुळे बेटांप्रमाणे भासणारे, पण प्रत्यक्षात खाडीच्या एकाच बाजूला असलेले डोंगर, पलीकडील कारलाईचा डोंगर, अलीकडील गौळकडा, रस्त्यावरील वाहने, खाडीतील मचवे हे सारे डोळ्यांनी पिऊन डोक्यात आणि मनात जागा मिळेल तिथे साठवून ठेवायचे. सरीवर सरी अंगावर घेत नव्या डोंगराची ओळख करून घेण्यासाठी खाली उतरायचे. असे हे मुंडा डोंगराचे आव्हान तुम्ही स्वीकारणार ?

लोकसत्ता : २२-७-१९९९



# धबधब्यापलीकडचे येऊर

एव्हाना येऊर आपल्या खूपच परिचयाचे झाले आहे, नाही? पावसाळ्याच्या या ऐन मध्यात तर सुट्टीच्या दिवशी आणि रविवारीही हौशी पर्यटक येऊरच्या धबधब्यावर एकच गर्दी करतात. 'खाली उतरू नका, जवळ जाऊ नका, धोका आहे' असे वनरक्षकांनी कितीही सांगितले, तरी उच्छृंखल पर्यटक ऐकत नाहीत आणि मग कधीतरी गंभीर परिस्थिती निर्माण होते; कोणाच्यातरी जिवावर बेतते, कोणीतरी नाठाळ ओढ्याच्या पलीकडे अडकून बसतात. त्यांची सुरक्षित सुटका करता करता वनरक्षक, पोलीस आणि स्थानिक रहिवाशांच्या नाकी नऊ येतात.

तरुण, सुशिक्षित पर्यटक असे नाठाळासारखे का वागतात? धबधब्याच्या पलीकडेदेखील मनाला भावणारा, आनंद देणारा असा खूप मोठा निसर्गाचा खजिना असतो, हे यांच्या कधी लक्षातच कसे येत नाही? धबधब्याच्या पाण्यात झिंग झिंग झिंगणारे मित्र त्यातून बाहेर पडल्यानंतर कोसळणाऱ्या पावसात आपल्या छत्र्या उघडून त्यात स्वतःला कोंबायचा प्रयत्न करतात, तेव्हा माझ्या नकळतच मला खदखदून हसू यायला लागते! मानीच्या नाल्यावरील या फेसाळणाऱ्या धबधब्याच्या वरच्या अंगाने चौफेर दृष्टी टाकली, तर एका बाजूला गौळकडा, त्याच्या बाजूलाच वनीच्या पाड्यापलीकडे मुंडा डोंगर, तर समोरच्या बाजूला ठाकूरपाड्याचा डोंगर दिसतो. धबधब्याच्या मोहात पडलेले पर्यटक तिथेच रेंगाळतात, फेसाळणाऱ्या पाण्याशी झुंज घेतात. त्यामुळे धबधब्यापलीकडचे जंगल आपल्यापर्यंत कोणी पोहचवलेलेच नसते. पण धबधबा असलेल्या मानीच्या नाल्यावरून आपण वरच्या बाजूला असलेल्या ठाकूरपाड्याच्या दिशेने जाऊ लागलो, तर निसर्गाच्या एकेक करामती आपल्यासमोर उलगडू लागतात.

रुंद रस्ता हळूहळू रानवाटेचे रूप धारण करतो आणि मधूनच चकवा देत राहतो. आपण मोकळ्या पठारावरून दाट जंगलात केव्हा शिरतो ते आपल्यालाच कळत नाही. उजव्या हाताची दरी खोल-खोल होऊ लागते,

म्हणून आपण डोंगरावर जात असल्याचे लक्षात येते. एरवी हा चढ तसा लक्षात येत नाही. झाडाझुडपांच्या ठिकाणी किनई, हेद, कुंभ, पारंगा असे वृक्ष दिसायला लागतात. पन्नास-पन्नास फूट उंचीचा सरळसोट वाढलेला वृक्ष बघितला की इथे जंगलतोड कमी झाली असावी हे लक्षात येते.

आता या वृक्षांना लपेटून एकेका वेळी दहा-दहा वृक्षांना आपल्या कवेत घेणाऱ्या जाडजूड वेली बघितल्या की, आपले नातू-पणतू, सख्खे-चुलत सर्व नातेवाईक यांनी एकत्र घेऊन संसार करणाऱ्या कोकणाऊ खोतीणबाई अथवा वैदर्भीय इनामदारांची आठवण होते. केवढा मोठा त्यांचा पसारा! कुक्सी, तोरणीचा वेल, करंजीचा वेल, पळसवेल, गुळवेल या एरवी सुतळीसारख्या अथवा नारळाच्या दोरीसारख्या दिसणाऱ्या वेली येथे चक्क जाडजूड वृक्षासारख्या दिसू लागतात. आपल्या पसाऱ्यामुळे त्या कधी इतर झाडाझुडपांना आधार देतात, तर कधी त्यांची गळचेपी करतात! एकत्र कुटुंबपद्धतीतील फायदे-तोटे शास्त्रीय पद्धतीने मुलांना शिकवायचे असतील, तर त्यांना असल्या रानात आणावे. त्याच वेलींच्या आधारे कधी बांडगुळे वाढताना दिसतात, तर कधी मुंग्यांनी पॅगोडासारखी संरक्षके तयार केलेली असतात. कुठे मधमाश्यांची पोळी, तर कुठे वरती साचलेल्या मातीच्या थरातून गवत अथवा इतर झाडांची तयार होणारी रोपटी. या वेली कुठे जमिनीवर पसरलेल्या, तर कुठे झाडांच्या शेंड्यांपर्यंत पोहोचलेल्या दिसतात. कुठे वृक्षांच्या साहाय्याने या वाढतात, तर कुठे पडायला आलेल्या वृक्षांचा आधार होऊन बसतात! बऱ्याचदा त्या कुठे सुरू होतात आणि कुठपर्यंत वाढलेल्या आहेत, ते कळतच नाही.

एव्हाना आपण येऊर वनविभागातून चेना वनविभागात आलेले असतो, पण त्याने आपल्याला काही फरक पडत नाही. मध्येच एक शेवग्याचे, एक बोरीचे झाड असलेला एक माळ लागतो. हा ठाकूरपाडा. आता इथे ठाकूरही नाहीत की पाडाही नाही. वनविभागाने येथून उचलबांगडी करून येऊरला त्यांचे पुनर्वसन केलेले असते.

आता जमिनीलगत असलेल्या करकुम्याच्या कणसांबरोबरच पेवदेखील फुललेले दिसू लागते. पेवच ते! बघता बघता सगळीकडे पसरलेले आणि फुललेले दिसू लागते. लाल देठ असलेली आणि शंखासारखी उलगडत जाणारी पांढऱ्या शुभ्र रंगांची ही फुले फार मोहक असतात. इंग्रजीत यांना

कोस्टा म्हणतात. अजूनही काही नावे असावीत. यांचे कंद विषारी असल्याची माहिती निसर्गलेखिका वनिता देशमुख आणि वनस्पतिशास्त्राचे प्राध्यापक परातकर यांच्याकडून मिळाली. त्यामुळेच कदाचित ससे, रानडुक्कर, भेकर यांना बळी न पडता ते जमिनीखाली निर्वेध वाढत असावेत.

मधूनच लंगुराचा 'हूप हूप' असा आवाज येतो.

तांबट, सुतार या पक्ष्यांची ठाक-ठोक चालू असते. जर नीट निरखून बघितले, तर साग अथवा बेहेड्याच्या एखाद्या पानाची वळकुटी करून त्यात शिंपी पक्ष्याने आपले घरटे केलेले दिसून येते. अलीकडे हे पक्षीदेखील पानांची शिवण करण्याच्या ऐवजी कोळ्याच्या जाळ्याचा डिंकासारखा उपयोग करून पानांच्या बाजवा चिकटवून आपली घरटी करत असावेत, असे वाटते. पक्षिनिरीक्षकांनी इकडे लक्ष देऊन थोडे संशोधन केले, तर काही उद्‌बोधक माहिती प्रकाशात येऊ शकेल.

अवतीभवतीचे असे निरीक्षण करत तीन-चार चढ-उतार करत आपण गौळकुड्याच्या मागच्या बाजूला येऊन पोहोचलेले असतो. हातात पिशव्या घेऊन खेकडे पकडायला निघालेली आदिवासी जोडपी कधी एकेकट्याने, तर कधी मुला-बाळांसहित आपल्या दिशेने येताना दिसतात. याचाच अर्थ आपण लवकरच जंगलाच्या दुसऱ्या टोकाशी आलेलो असून, बाहेर पडणार असा होतो. नवसागराचा वास आणि चिखलाचे अस्तित्व जाणवू लागते, म्हणजे आपण बहुतेक चेना नदीच्या मुखाजवळच कुठेतरी आलेलो असणार.

एका मोठ्या उतारावरून आपण चक्क विस्तीर्ण आमराईत येऊन पोहोचलेलो असतो. ती पार केली, तर समोर दुथडी भरून वाहत असलेली चेना नदी दिसते. जंगलात शिरतानाच आपण पार केलेला भेंडी नाला, धबधबेवाला मानीचा नाला, इतर अगणित नाले आणि डोंगरवाट नाला हे सारे या छोट्याशा प्रवासात मुख्य प्रवाहाला येऊन मिळतात. चेना गावाजवळ आल्यानंतर या प्रवाहाला 'चेना' हे नाव प्राप्त होते, लवकरच हा प्रवाह खाडीत लुप्त होणार असतो. इथे नदी पार करण्यासाठी एक छोटा पूल आणि घोडबंदर रोडवर एक मोठा पूल आहे. नदीला पूर आलेला नसला, तर छोट्या पुलावरून कंबरभर पाण्यातून नदी पार करून आपण चेना गावातच शिरतो. अन्यथा प्रवाहाच्या दिशेने थोडे खाली जाऊन रस्त्यावरील पूल पार करून घोडबंदर रोडला लागतो. आता आली का पंचाईत! घरून निघताना

बरोबर आणलेल्या गाड्या येऊरला सोडलेल्या असतात आणि आपण तर चक्क घोडबंदर रोडला चेनाजवळ येऊन पोहोचलेलो असतो. निसर्ग सुंदर असला, तरी थकवादेखील विसरता येत नाही. त्यामुळे आल्या वाटेने जंगलातून परत जाण्यापेक्षा ठाण्याकडे जाणाऱ्या मिळेल त्या बसमध्ये शिरून ठाण्यात उतरता येईल तिथे उतरावे आणि खिशाची परवानगी असेल त्याप्रमाणे येऊरला जाऊन आपापल्या गाड्यांचा ताबा घ्यावा हे उत्तम!

लोकसत्ता : २९-७-१९९९



# फुललेली 'कारवी' आणि सरोवर

कारवी फुलली!
कारवी फुलली,
कारवी फुलली!
येऊरच्या जंगलात,
हरियाली डोंगरात,
कारवी फुलली,
कारवी फुलली।।१।।
फुले उमलती,
भुंगे पिंगाळती!
पाखरे ती येती,
साद किती देती!
कारवी फुलली,
कारवी फुलली।।२।।
सळाळत्या तृणाची पाती,
वाऱ्यासंगे ती लहरती!
लहरत्या तृणावरती,
श्रान्त शरीरे विसावती!
कारवी फुलली,
कारवी फुलली।।३।।
तरुणाई उसळली,
हिरवाई पसरली
तलाव ओसंडती,
प्रपाते फेसाळती,
कारवी फुलली,
कारवी फुलली।।४।।

आमच्या हाती सौंदर्याची एक खाण लागली आहे, सौंदर्याची खाण! गेल्या तीन वर्षांत आमच्या विद्यार्थी मित्रांनी दगडांच्या खाणींचे रूपांतर सुंदर जलाशयात केले. हजारो हातांनी वृक्ष लावून वसुंधरेवर हिरवा साज चढवला. वृक्ष तोडणाऱ्या हातांची, वणव्यांची क्षिती न बाळगता वृक्ष-वेली लावत राहिले; लावतच राहिले. संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या अधिकाऱ्यांनी उत्तेजन दिले, निसर्गप्रेमींनी साथ दिली. थोरांनी आशीर्वाद दिले; लहानग्यांनी आपल्या खाऊचे पैसेदेखील दिले आणि 'हरियाली' बहरू लागली.

हे सारे बघितल्यानंतर, श्रम आणि निष्ठा पारखून त्याविषयी खातरी झाल्यानंतर, निसर्गदेवता तरी प्रसन्न झाल्याशिवाय कशी राहील ? प्रसन्न मुद्रेने तिने (डोंगर-) माथ्यावर हात ठेवला आणि त्या डोंगरमाथ्याचे रूपांतर चक्क रत्नांच्या खाणीत झाले! मी नवरत्ने बघितलेली नाहीत; खरे म्हणजे मला त्या सगळ्यांची नावे- देखील ठाऊक नाहीत! निसर्गातून हिंडताना त्यांची अनुभूती मात्र वेळोवेळी घेतलेली असते. सुरूच्या पानुकल्या आणि तृणाग्रांवर विसावलेले जलबिंदू बघितल्यावर मोत्यांची अनुभूती होते, तर त्यांच्यावर सूर्यकिरणे पडून ती चमकू लागली की आपण हिऱ्यांच्या खाणीतून फिरत असल्याचा भास होतो. या वर्षीच्या पावसाबरोबर अशीच काही अनामिक परंतु सुंदर, रत्ने हरियालीच्या डोंगरमाथ्यावर वसुंधरेला सजवण्यासाठी येऊन विसावली आहेत.

होय! यंदा सुमारे एक कि.मी.च्या पट्ट्यावर गच्च पसरलेली कारवी भरभरून फुलते आहे. ही बहुगुणी कारवी म्हणजे सह्याद्रीचे वैभव आहे. निर्वेध वाढू दिली, तर सुमारे दहा फुटांपर्यंत सहजगत्या सरळ वाढत जाणाऱ्या कारवीचा उपयोग जंगलात राहणारे आदिवासी आपली घरे आणि गोठे बांधण्यासाठी करतात. उमलायच्या आधी गुलाबकळ्यांसारखी भासणारी कारवीची फुले उमलल्यानंतर त्यात निळ्यागुलाबी छटा येतात. निळ्या-जांभळ्या गुलाबी रंगांच्या मिश्रणातून फुलणारी ही फुले मादक सुगंध घेऊन येतात, त्यामुळे मधमाश्यांना ती खूप आकृष्ट करतात.

कारवीचा मध हा सर्वश्रेष्ठ आणि औषधी मध मानला जातो, त्यामुळे ह्या मधाला चांगलीच मागणी असते; त्यातून ही फुले सात वर्षांतून एकदाच फुलतात अशी माहिती शास्त्रीय पुस्तकातून मिळते. स्थानिक आदिवासींपैकी काहींकडून हाच काळ पाच वर्षांचा, तर काहींकडून तीन वर्षांचा असल्याचे

कळते. म्हणूनच मग त्यांतही अजून काही प्रकार असावेत असे वाटते. म्हणजे बघा, या डोंगरावर करकुमा आधीच फुलला आहे, पेव फुलले आहेत; आणि आता त्यात कारवीचीदेखील भर पडते आहे. पण हे सगळे एकाच ठिकाणी नाही. डोंगराच्या खालच्या भागावर करकुमा विसावतो आहे, तर मध्यावरील पाण्याच्या प्रवाहाजवळ पेवाचे साम्राज्य पसरलेले आहे. माथ्यावर कारवी फुलायला लागली आहे. 'येऊर-चेना-मामा-भाच्या'कडे करकुमा जास्त दिसतो, तर ठाकुरपाडा- चेनाकडे पेव फुटले आहे. हरियालीवर कारवी फुलायला लागली आहे, तर पुढे वणीच्या पाड्याकडील कारवी मात्र पुढच्या किंवा त्याच्या पुढच्या वर्षी फुलायची वाट बघते आहे.

रत्नांच्या या खाणीकडे जाताना आपल्याला डोंगरमाथ्यावरून खाली उतारावर तलावांची एक साखळीच तयार झालेली दिसते. मागे एका लेखात ओळख करून दिल्याप्रमाणे डोंगराच्या पायथ्यापाशीच दर्शनी असलेला गणेशसागर आहे, तर त्याच्या उजव्या अंगाला खाली नव्याने तयार झालेल्या जंगलात आहे पक्षिसरोवर. पक्षिसरोवर वरच्या बाजूला कालव्याने ज्या तलावाशी जोडले गेले आहे, तो आहे अप्रतिम असा हरियाली तलाव. त्याच्या डोक्यावर असलेल्या एका तलावाचे नामकरणच झालेले नव्हते. हा तलाव डोंगराच्या मध्यावर अशा संपन्न निसर्गात विसावतो आहे की, तिथे गेलेली व्यक्ती एकदम भारावली जाते; प्रफुल्लित, पण निःशब्द, होते.

जंगलातून जाताना सहकारी भटक्यांसमोर वृक्ष- वनस्पती- पक्षी-फुलपाखरे यांवर सारखी 'रनिंग कॉमेंट्री' करणाऱ्या डॉ. माधुरी पेजावरांसारख्या प्राध्यापिकादेखील थोडा वेळ का होईना, पण एकदम निःशब्द होऊन त्या शांततेचे 'निरव' या एकाच शब्दात वर्णन करतात, तेव्हा त्या तलावाचे नामकरण 'निरव सरोवर' असे आपोआप होऊन जाते. जिथे वातावरणातील प्रत्येक घटक- म्हणजे वृक्ष, वेली, पक्षी, प्राणी, कीटक, मानव, हवा- कुठल्याही प्रकारचा आवाज न करतादेखील एकमेकाला खूप काही सांगून जातो, तिथे असते ती 'निरव शांतता!' स्तब्धता असली, तरी वातावरणात एक प्रकारचा जिवंतपणा असतो, चैतन्य असते, हर्ष असतो, उल्लास असतो. बोलावेसे वाटले, तरी त्या शांततेचा भंग करू नये असे वाटते. अशी निरव शांतता आपल्याला केवळ निसर्गाच्या सान्निध्यातच

अनुभवायला मिळते, नाही का ? या तलावाच्या परिसरात असलेल्या अशा शांततेचा भंग होऊ नये, अशा दृष्टीनेच 'हरियाली'चे प्रयत्न चालू आहेत

तिथे कसे जायचे आणि कोणाची परवानगी घ्यायची, ते मी आजच आपल्याला सांगणार नाही. त्यासाठी आपण यायचे आहे मानपाडा परिसरातील हरियाली कुटीजवळ रविवार, १५ ऑगस्ट १९९९ रोजी सकाळी ७.३० वाजता या वर्षाचा स्वातंत्र्यदिन आपण वेगळ्या पद्धतीने साजरा करू या. आपापल्या परिसरात शक्य असेल तसे, शक्य असेल तिथे, शक्य असेल त्या वृक्षाचे रोपटे लावू या. जमलेच तर हरियालीवर या. तिथल्या शांततेचा भंग न करता, निसर्गाचा नाश न करता गटागटांनी या. कार्यकर्त्यांच्या मार्गदर्शनाखाली सौंदर्याची ही खाण बघा.

वाचकहो, सुमारे गेले दोन महिने मी या लेखमालिकेतून आपल्या परिसरातील निसर्ग आपल्यासमोर आणण्याचा प्रयत्न करत आहे. त्या निसर्गाचा आस्वाद घ्या, त्याला ओरबाडू नका. अजून एक लेख लिहून ही मालिका मी पुरी करणार आहे. अजून आपल्यासमोर खूप सौंदर्यस्थळे आणायची आहेत, अजून बरेच काही लिहायचे आहे, पण थोडा विश्राम घ्यायला हवाच ना ?

या मालिकेतील लेखांनी आपल्याला काही आनंद दिला आहे, असे आपल्याला वाटत असेल; या निसर्गाचे रक्षण करण्याच्या 'हरियाली'च्या प्रयत्नांत आपला अंशतः का होईना, सहभाग असावा, असे वाटत असेल, तर आपण खालील पत्त्यावर संपर्क साधावा – हरियाली, ५/७०२, फ्लॉवर व्हॅली, ईस्टर्न एक्स्प्रेस हायवे, ठाणे ४००६०१.

लोकसत्ता : ५–८–१९९९

# नाठाळ मानव अन् अनमोल निसर्गठेवा!



खरे म्हणजे मी बसलेला असतो ‘शीलोत्तर’च्या भ्रमंतीवर लिहायला, पण तेवढ्यात ‘ठाणे समाचार’च्या श्रीराम भिड्यांचा फोन येतो. ‘‘सर, वनाधिकारी समीर देशपांडेंचा टेलिफोन नंबर हाताशी उपलब्ध आहे का? ईडनवुड्सच्या परिसरात वाघानं धुमाकूळ घातला आहे. त्यांच्याशी थोडं बोलायचं आहे.’’ तोंडपाठ असलेला टेलिफोन क्रमांक त्यांना सांगून झाल्यावर मी पुन्हा लिखाणाकडे लक्ष द्यायचा प्रयत्न करतो, तोच त्यांचा पुन्हा फोन येतो. ‘‘सर, येऊरला धबधब्याजवळ बारा मुलं अडकली आहेत, त्यामुळे देशपांडेसाहेब त्यांची सुटका करण्यासाठी तिकडे गेले आहेत. तुम्ही काही माहिती देऊ शकता का?’’ मी त्यांना आवश्यक ती माहिती देऊन पुन्हा लिखाणाकडे वळतो. परंतु माझ्या लिखाणाची गाडी ‘शीलोत्तर’च्या उमद्या जंगलात शिरूच शकत नाही.

कानात शब्द घुमतात, ‘वाघाने धुमाकूळ घातला आहे.’ मात्र आतून प्रतिध्वनी येतो, ‘माणसाने उच्छाद मांडला आहे.’ पुन्हा एकदा कानात घुमतात काळीज फाडणारे शब्द, ‘धबधब्याच्या विळख्यात बारा मुले अडकली आहेत.’ पुन्हा आतून प्रतिध्वनी येतो, ‘उच्छृंखल तरुणांच्या गराड्यात धबधबा अडकून पडला आहे.’ टाहो ऐकायला येतो, ‘वाचवा हो, वाचवा. सोडवा हो, सोडवा. कुणी आहे का तिकडे?’ पुन्हा प्रतिध्वनी ऐकू येतो, ‘इकडे –इकडे. आम्ही इथे आहोत.’

कुणाचा आवाज हा? कुणा एकाचा की अनेकांचा? चुकून माणसांच्या वस्तीत शिरलेल्या वाघाचा की वाघाच्या हद्दीत जाणीवपूर्वक अतिक्रमण केल्यामुळे प्रतिहल्ल्यास तोंड द्यायला लागणाऱ्या मानवाचा? धबधब्यासमोरच्या डोहात किंवा पलीकडे ओढ्यात अडकून पडलेल्या तरुणांचा की त्याच तरुणांच्या बेशिस्त, बीभत्स आणि गलिच्छ वागण्यामुळे कुंद झालेल्या वातावरणात गुदमरणाऱ्या धबधब्याचा? पोटाचा खळगा भरण्यासाठी वृक्ष तोडणाऱ्या मानवाचा की कुऱ्हाडीचे घावांवर घाव झेलत राहून रक्तबंबाळ

होणाऱ्या जीवनदायी वृक्षाचा ? स्वतःच्या हावेसाठी डोंगरात आगी लावणाऱ्या लोभी मानवाचा की त्या वणव्यांनी होरपळून निघणाऱ्या वसुंधरेचा ? फुटाफुटाने हजारो एकर वनजमिनींवर अतिक्रमण करून त्यांवर बांधलेल्या झोपड्या बुलडोझरखाली येताना बघणाऱ्या मानवाचा की अशा अतिक्रमणांमुळे दुर्गंधित आणि गलिच्छ झालेल्या आपल्या शरीराच्या भागाकडे बघणाऱ्या अरण्याचा ? वाघाची दमछाक करून शेवटी मानवाच्या बंदुकीच्या गोळीला बळी पडणाऱ्या ससे आणि हरीण यांचा की आपल्या तोंडची शिकार आणि अन्न लुटले जात असताना हताशपणे बघणाऱ्या वाघाचा ? कोण कोणावर अन्याय करतो आहे ? कोणाचे खरे आणि कोणाचे खोटे ? कोण चोर आणि कोण अन्यायाची शिकार ? कोण गुन्हेगार आणि कोण फिर्यादी ?

काय चालले आहे हे माझे ? मला 'शीलोत्तरा'ची वाट का सापडत नाही ? घरून निघताना तर बरोबर निघालो होतो ? ठाण्याहून घोडबंदर रोडने निघून अहमदाबाद हायवेवर येऊन पोहोचलो. तिथून अहमदाबादच्या दिशेने जाऊन पूल पार करून, चिंचोटी फाट्यापर्यंत येऊन, चिंचोटी-भिवंडी रोडने कामणपर्यंत आलो आणि बरोबर तिथे उजवीकडे वळलो होतो. तिथून पुढे सार्जामोरी-डोंगरी करत डोंगरीला उजवीकडे वळून बरोबर 'शीलोत्तर'लादेखील आलो होतो. तेथील वनखात्याचे कर्मचारी निवास, मोडकेतोडके का असेना, मला भावले होते. तिथून पुढे एक किलोमीटर अंतरावर असलेल्या कोलांड्यास मी माझ्या सवंगड्यांसह बरोबर जंगलात शिरलो होतो. तिथून कुंडीची खिंड ओलांडत तीन खंडापर्यंतदेखील मी बरोबर आलो होतो.

मग मी आता पुन्हा ईडनवुडस्‌च्या परिसरातच का रेंगाळतो आहे ? इथे फ्लॅट्स घेताना लोकांना किती आनंद झाला असेल नाही ? डोंगराच्या कुशीत हिरवळीला पाठीशी घेऊन वाऱ्यासंगे खेळण्याची स्वप्ने बघत असताना आपल्यालादेखील कधीतरी वाघाचा उपद्रव होण्याची शक्यता आहे, असा विचार त्यांच्या मनात आला नसेल ? बिल्डरने त्यांना याची जाणीव करून दिली नसेल ? की स्वप्ने विकताना आणि बघताना वास्तवाचे भान सोडायचेच असते ? 'डोंगर दुरून साजरे दिसतात' या म्हणीचा त्यांना त्या वेळी विसर पडला असेल का ?

जंगलाच्या वेशीवर राहणाऱ्या आदिवासीला याचे भान असते. म्हणूनच तो कधी 'वाघाने माझे मेंढरू नेले' असे म्हणून तक्रार नाही करीत. त्याने तिथे

राहताना या वास्तवाचा स्वीकार केलेला असतो. मग आम्ही तरी आमचे कुत्रे वाघाने नेले म्हणून का तक्रार करतो? चोराच्या उलट्या बोंबा म्हणतात त्या याच की काय? 'तुमचे काय जाते असे म्हणायला, ज्यांना तिथे राहावे लागते त्यांनाच ते कळते', 'मुंबई-ठाण्याजवळ असे जंगल हवेच कशाला? लोकांना राहायला मिळत नाही आणि तुम्ही पक्षी आणि वाघांची काळजी करत आहात. आम्हांला नकोत ते वृक्ष आणि नकोत ते प्राणी! आम्हाला चार भिंती आणि एक छप्पर असेल तर तेही पुरे!', वृक्ष नकोत, वेली नकोत, मग तुम्हाला प्राणवायू कसा मिळणार? साप नसतील तर उंदरांचे आणि वाघ नसेल तर डुकरांचे साम्राज्य नाही का सर्वत्र पसरणार? पण याचा विचार करायला वेळ आहे कुणाला?

कोण मला हे प्रश्न विचारतो आहे? काय आहेत त्यांची उत्तरे? मला माझी वाट का सापडत नाही? करकुम्याची नेहमीची परिचित फुले का दिसत नाहीत? पाय तर जंगलाच्याच दिशेने जात आहेत, मग जंगलवाटेने जाणारे हे पाणी कधी माझ्या दिशेने, तर कधी विरुद्ध दिशेने वाहताना का दिसत आहे? तेदेखील माझ्यासारखे भान हरवून बसले आहे की काय? की माझा मार्ग हा चढ-उतारांनीच भरलेला आहे? आणि मग मध्येच हेदीचा एखादा प्रचंड वृक्ष आडवा पडलेला का दिसत आहे? त्याच्या पोटातील ओंडकाच तेवढा कुठे गायब झाला? जवळपास लाकडाच्या चिपा अशा पडलेल्या का दिसत आहेत? कुणी होडी करण्यासाठी ते लाकूड चोरून नेले आहे की काय? 'सर, हा पांढरा कुडा की काळा कुडा?' कोण बरे हे विचारतो आहे? हा तर नावाप्रमाणेच मनानेदेखील सरळ असणाऱ्या सरलकुँवर राजपुतांचाच आवाज! पण मग मला आज त्यांना उत्तर का देता येत नाही? जंगलात गेल्यावर माझा मठ्ठपणा एवढा कसा उघडा पडतो?


कालच तर आमच्या हरहुन्नरी सुनीलने आणि बरोबर असलेल्या इतर जाणकार मित्रांनी मला पांढरा व काळा कुडा यांतील फरक समजावून सांगितलेला असतो. चार्टर्ड अकाउंटंट म्हणून गेली तीस वर्षे व्यवसाय करताना एखाद्या व्यक्तीच्या चेहऱ्याकडे बघूनच त्याच्या खिशातील पैशांचा रंग काळा की पांढरा हे ओळखणारा मी, काळा कुडा आणि पांढरा कुडा यांतील फरक कसा ओळखू शकत नाही? घरातून निघताना सुरू झालेला झोडप्या पाऊस अजून का पडतो आहे? म्हणूनच आज माझा कॅमेरा बाहेर

पडत नाही की काय? जंगलातील अरुंद निसरड्या वाटा शोधताना आणि त्यांवरून चालताना जेवढे अवघड वाटले नाही, तेवढी या प्रश्नांची उत्तरे मला अवघड का वाटत आहेत?

मधूनच डोळ्यांसमोर सत्तरीच्या जवळपास आलेले, पण सागवानासारखे कणखर असलेले अप्पा जमदाडे, साठीत आलेले आठवले दाम्पत्य, विशीत प्रवेश करता झालेला संदीप बोरकर, समवयस्क काळे, भास्कर भोईर, मार्गदर्शक रतन, वनाधिकारी समीर देशपांडे हे सारे येतात. यांच्याकडे आहेत का या प्रश्नांची उत्तरे? हे तर धुवाँधार पावसाचा सामना करत एकमेकांच्या मदतीने डोकरीचा सरळसोट नाला उतरताना दिसत आहेत. म्हणजे मी अजून 'शीलोत्तर'च्याच डोंगरातून नागलाच्या दिशेने खाली उतरतो आहे तर! एका भ्रमिष्ट अवस्थेत मला मधूनच वास्तवाचे भान कसे येत आहे? छोटी-छोटी पांढुरकी फुले आणि आंबट चवीची पाने असलेली खडकअंबाडी आज माझ्या कॅमेऱ्यात का येत नाही? जंगलातून हिंडताना आम्ही कोणीच छत्र्या, रेनकोट कधीच बरोबर घेत नाही. मग ठिकठिकाणी झाडाझाडाखाली या छोटुकल्या छत्र्या कोणी उघडून ठेवल्या आहेत? की आपण भिजू नये म्हणून त्या छत्र्याच स्वतःला वृक्षांच्या कवेत झाकून घ्यायचा प्रयत्न करत आहेत? आणि हे एवढे प्रचंड, सुंदर वृक्ष मधूनच असे लवंडलेले का दिसत आहेत? ही काय लवंडायची वेळ झाली की वामकुक्षीची? छे! यांना तर कोणीतरी साफ भुईसपाट केलेले दिसते आहे! वृक्ष हे तोडण्यासाठी आणि कायदे हे मोडण्यासाठी केलेले असतात, असा समज आपल्या समाजात नक्की केव्हापासून पसरला असणार बरे? स्वातंत्र्यापूर्वी ब्रिटिशांना इथून घालवून लावण्यासाठी महात्माजींनी आम्हांला सविनय कायदेभंग करण्याचा मंत्र दिला. काळातील त्यांच्यापुढील दोन पिढ्या त्यांची इतर शिकवण विसरल्या असल्या, तरी सविनय कायदेभंगाला उद्धट कायदामोडीचे स्वरूप देण्याचे काम इमानेइतबारे करत राहिल्याच ना? ते संस्कार बदलण्यासाठी पुढच्या किती पिढ्या खर्ची घालायला लागतील, कोणास ठाऊक! आणि पुन्हा माझ्या मनात प्रश्न उभा राहतो की, नाठाळ मानवाच्या विळख्यात सापडलेला, पण मानवाला ज्याचे महत्त्व कळले नाही अशा, निसर्गाचा हा खजिना लोकांपुढे आणण्याचा अट्टाहास करत राहायलाच हवे का? की 'शीलोत्तर'च्या जंगलात वाट हरवून बसलेल्याला स्वतःचा मार्ग स्वतःच शोधायला हवा?

लोकसत्ता : १२-८-१९९९

# चक्रावणाऱ्या अरण्यवासिनी



गेल्या काही वर्षांतील माझ्या भटकंतीमध्ये मला लता-वेलींची विविध रूपे बघायला मिळाली. खरे सांगायचे तर मी त्यांच्यावर खूपच भाळलो. शहरातील बागा आणि बंगल्यांमधून विविध फुलांची पखरण करणाऱ्या जाई, जुई, चमेली इत्यादी वेलींची माहिती फळा-फुलांच्या सहवासात रमणाऱ्या सर्वच निसर्गप्रेमींना थोड्याफार प्रमाणात असते. शेतांमधून उपयुक्त पालेभाज्या, फळे देणाऱ्या शिराळी, दुधी, काकडी, तोंडली, चवळी, मायाळू आणि नागवेल, यांची माहिती शेतीत रमणाऱ्या शेतकऱ्यांना असते. सर्वच प्रकारच्या या वेली आपल्याला स्थल-कालमानाप्रमाणे बघायला मिळतात.

पण याच्याही पलीकडे रानावनातून निर्विघ्नपणे वाढणाऱ्या, विविध प्रकारची रूपे, रंग आणि आकारांची फुले धारण करणाऱ्या, वेगवगळ्या चवींची फळे देणाऱ्या, विविध औषधी गुणधर्म असलेल्या, कधी पुनरुज्जीवन प्राप्त करणाऱ्या, तर कधी जिवाला हानिकारक ठरणाऱ्या अशा लता-वेलींचे एक वेगळेच विश्व असते. त्यांतील काही अगदी अल्पायुषी, तर काही दीर्घायुषी. काही वटवृक्षांप्रमाणे अमरत्व धारण करून आलेल्या, यांना नैसर्गिक मरण नाहीच. नतद्रष्ट मानवाकडून कळत-नकळत होणाऱ्या विध्वंसात वरकरणी यांचा बळी गेलाच, तरी जमिनीत त्यांचे कंद शाबूतच राहतात. पावसाचा एखाद-दुसरा शिडकावा झाला की, ते कंद पुन्हा नव्याने उभारी घेतात. त्या वेली सरासरा-सरासरा वाढतच जातात. सुरुवातीला छोटी-छोटी झुडुपे आणि लहान-मोठ्या वृक्षांच्या आधाराने वाढत जाणाऱ्या या अरण्यवासिका केव्हा त्याच वृक्षांचा आधार होऊन बसतात, हे लक्षातच येत नाही.

खरे म्हणजे निसर्गातील असे बरेच काही मन थक्क करून टाकणारे असते. वेगवेगळ्या प्रकारचे आणि गुणधर्मांचे विशालकाय वृक्ष, त्यांची वेगवेगळ्या चवींची फळे, विविध रंगांची आणि गंधांची फुले, दऱ्या-खोऱ्यांतून कधी

रोरावत, तर कधी खळखळत-झुळझुळत जाणारे पाणी, विविध रंगांची फुलपाखरे, पक्षी, सारेच कसे मन मोहून टाकतात. नाठाळ मानवाला विनम्र व्हायला शिकवतात. निसर्गासारखा दुसरा गुरू मिळणे खरोखरीच अशक्य; मात्र त्याच्याशी सुसंवाद साधण्याचा, विनम्रता आणि मैत्रीच्या भावनेने त्याच्याशी वागण्याचा थोडासा प्रयत्न करायला हवा. एखाद्या साधकाच्या भावनेतून जेव्हा आपण हे करतो, तेव्हा मिळणारा आनंद अवर्णनीय असतो. मात्र हा आनंद मिळवायचा असतो, अनुभवायचा असतो; ओरबाडायचा किंवा लुटायचा नसतो. आपल्याला मिळणाऱ्या अशा आनंदात इतर कोणाला सहभागी केले, अथवा इतरांपर्यंत तो आनंद पोहोचवायचा प्रयत्न केला, तर तो अनेक पटींनी वाढतच जातो. वेगवेगळ्या वृक्षांची वेगवेगळ्या ऋतूंत पानगळ होते. अश्या वेळी त्यांच्या सभोवताली अश्या अरण्यवासिका असल्या, तर त्या आपल्या पाना-फुलांनी त्या वृक्षांची लाज अशी बेमालूमपणे झाकून टाकतात की, ती पाने आणि फुले त्या वृक्षाचीच आहेत, असे अगदी जाणकारांनादेखील वाटायला लागते.

गुळवेल, पळसवेल, करंजवेल, अक्षी, धावडा, धावशी, एकोटा, गारबी, दयाळू, कारिंदा, कासट-कोंबळी, धायवेल, वनजाई, सागरगोटा, राक्षसीवेल, चकवा, गुंजवेल, तरटी, पहाडवेल... बापरे-बाप! किती नावे घ्यावीत? यांतील अनेक एकीसारख्या एक दिसणाऱ्या, जुळ्या बहिणी वाटाव्यात अशा. बरे, एका रानात दिसणाऱ्या या अरण्यवासिका दुसऱ्या रानात दिसतीलच असे नाही. दिसल्याच, तरी तिथे त्या त्याच नावाने ओळखल्या जात असतील, असेही नाही. एखादी ओळखीची वाटली आणि आनंदाने नाव पुकारून आपण तिला स्पर्श करायला गेलो, तर बरोबरचा अरण्यवासी म्हणतो, 'अहो, ही ती नव्हे!'

प्रत्येक रानातून हिंडताना अशा अरण्यवासिनी नजरेला पडतातच असेही नाही. काही काही रानांमध्ये नुसतेच छोटे-मोठे वृक्ष असतात, तर काही राने झुडुपांनी भरलेली असतात. मी ज्या रानांमधून भटकतो, त्या रानांत मला अनेक अरण्यवासिकांचे दर्शन होते. त्यांतील काहींशी माझी चांगलीच जवळीक झाली आहे. त्यांना भेटून, त्यांचे निर्व्याज लावण्य नजरेला पडले की, मन सुखावते. त्यांच्या एकेका गुणाचा परिचय झाला की, त्यांच्याविषयीच्या कौतुकाचे रूपांतर आदरात होते.

आपल्या या आनंदात आपल्या वाचकांनादेखील सहभागी करून घ्यावे, असा विचार मनात आला म्हणून हा लेखनप्रपंच मांडला. ज्ञान आणि आनंद दिल्यानेच वाढत जातात. नाहीतरी सगळ्यांकडे अरण्यभ्रमण करण्यास मोकळा वेळ थोडाच असतो? मी वनस्पतिशास्त्रातील फार मोठा जाणकार नसलो, म्हणून काय झाले? मी वाचकांना देत असलेली माहिती चुकीची नाही ना, याची मी जाणकारांकडून निश्चित खातरी करून घेतो. मी छायाचित्रकार नसलो म्हणून काय झाले? पान-फूल-फळ ओळखता येईल, त्यांचे रंग लक्षात राहतील इतपत छायाचित्रण मी अवश्य करू शकतो.

या एकाच भावनेतून 'चक्रावणाऱ्या अरण्यवासिनी' ही लेखमाला सुरू करीत आहे. निसर्ग आणि त्यातील सौंदर्यस्थळे वाचकांना माहिती करून देत असताना मनात एक भीती आहेच. या निसर्गाशी सुसंवाद साधण्याऐवजी त्याला ओरबाडण्याचा प्रयत्न कुणा वाचकाने केला तर... अनेक वेळा तसे घडतेही. भीती अधिक बळावते ती त्यामुळे; पण मग त्या भीतीतून ज्ञान आणि सौंदर्याचा आस्वादक परिचय काही लोकांपुरताच मर्यादित राहण्याची आणि काळाच्या ओघात नष्ट होण्याची धास्ती असते. त्याची जबाबदारी अखेर कोणावर? त्या जबाबदारीतून मुक्त होण्यासाठीच हा आटापिटा.

लोकसत्ता : ९-८-२००२



**फोटो क्र. १**
हॅवलॉक बेटावरील
सूर्योदयापूर्वीचा सुरेख नजारा.
(लेख : अंदमान निकोबार बेटांचा
देखणा निसर्गाविष्कार)



**फोटो क्र. २**
अंदमानच्या समुद्र किनाऱ्यालगतच्या
समृद्ध जैविक सृष्टीतील प्रवाळाची
एक झलक.
(लेख : अंदमान निकोबार बेटांचा
देखणा निसर्गाविष्कार)



**फोटो क्र. ३**
बोंडारलेल्या बांबूचा सुंदर आविष्कार.
(लेख : रानात फुलला बांबू)



**फोटो क्र. ४**
येऊरच्या जंगलातील वृक्षराईचे एक दृश्य.
(लेख : फॉल सीझन – भारतातला!)



**फोटो क्र. ५**
शिवथर नदीच्या उगम परिसरातील जलानंद अनुभवणारे पर्यटक.
(लेख : जलसंगीताची अनुभूती)



**फोटो क्र. ६**
कासच्या पठारावरील फुलांचा गालिचा.
(लेख : मज लागे ध्यास 'कास'चा)



**फोटो क्र. ७**
फणसाडच्या जंगलातील वृक्षसंपत्तीची माहिती करून घेण्यात गुंगलेले ज्येष्ठ नागरिक.
(लेख : वन्यजीव रक्षणासाठी अरण्यवाचन)



**फोटो क्र. ८**
दगडाच्या ओसाड खाणीचे रूपांतर करून तयार केलेला एक तलाव.
(लेख : आदर्शवनातील गणेशसागर)



**फोटो क्र. ९**
नदी परिक्रमेत आढळलेली महाकाय सर्पाची कात.
(लेख : भेंडी-कामजाई-चेना परिक्रमा)

**फोटो क्र. १०**
घनदाट वृक्षराई असूनदेखील पर्यटकांकडून उपेक्षित राहिलेला ओवळ्याचा विंडी डोंगर.
(लेख : उपेक्षित विंडी आणि भूतकापरी)





**फोटो क्र. ११**
अल्याड डोंगर, पल्याड डोंगर, मधून वाहते सुंदर खाडी!
(लेख : महाराष्ट्राचे सुंदरबन नागला जंगल!)

**फोटो क्र. १२**
निसर्गाच्या सान्निध्यात पर्यटक होती सारे प्रफुल्लित!
(लेख : ठाणे ते मुलुंड निसर्गप्रवास!)





**फोटो क्र. १३**
मुंडा डोंगरावरील निर्वृक्ष पठार.
(लेख : एक आव्हान :
मुंडा डोंगराचे!)

**फोटो क्र. १४**
येऊरच्या घनदाट जंगलातील
सदाहरित वृक्षसंपदा.
(लेख : धबधब्यापलीकडचे येऊर)





**फोटो क्र. १५**
मन उल्लसित करणारी,
मंद दरवळ पसरवणारी आणि
सात वर्षांत
एकदाच फुलणारी कारवी.
(लेख : फुललेली ‘कारवी’
आणि नीरव सरोवर)



**फोटो क्र. १६**
भातसा नदीच्या 'तुंब्या'चे
एक सुरेख निसर्गदृश्य.
(लेख : नाठाळ मानव
अन् अनमोल निसर्गठेवा!)



**फोटो क्र. १७**
आपल्या पर्णिकांनी सबंध वृक्षराईला
झाकोळून टाकणाऱ्या विविध वेली.
(लेख : चक्रावणाऱ्या
अरण्यवासिनी)



**फोटो क्र. १८**
खरी समजून खायला जाल,
तर घसा खवखवलाच म्हणून समजा!
(लेख : मोहमयी द्राक्षवेल)



**फोटो क्र. १९**
कुठला वेल किती, कसा आणि
कुठवर पसरला आहे
याचे सूक्ष्म संशोधन!
(लेख : घोटाळ्यात
घोटाळा, वेलींचा भेंडोळा)

**फोटो क्र. २०**
कोकणीपाड्याच्या वृक्षराईत दडलेला
सुरेख 'हरियाली' तलाव.
(लेख : झाकलं माणिक)





**फोटो क्र. २१**
एकमेका साहाय्य करू,
अवघे धरू सुपंथ
(लेख : सृष्टीचे मूलाधार)



**फोटो क्र. २२**
मुंड्याच्या निर्वृक्ष पठारावर
वृक्षराई निर्माण करण्यात
गुंग झालेली तरुणाई.
(लेख : नवसंजीवनी देणारा
मुंडा डोंगर)



**फोटो क्र. २३**
ओसाड डोंगराच्या शिखरावर
विराजमान झालेले
दिंडेश्वर महादेवाचे आकर्षक देवालय.
(लेख : दिंडेश्वर महादेव
अन् वृक्षपंढरी)



**फोटो क्र. २४**
टीचभर पोट भरण्यासाठी
रानावनांत लावल्या जाणाऱ्या
आगींमुळे
भस्म होणारी वनसंपत्ती!
(लेख : रानवणवे(?)
आणि वृक्षलागवड)



# बहुगुणी गुडूची अर्थात गुळवेल

संस्कृतमध्ये 'गुडची' म्हणून उल्लेख असलेल्या बहुगुणी वेलीस मराठीत सर्वसाधारणपणे 'गुळवेल' म्हणून ओळखले जाते. हिच्या ताण्यास लांब धाग्यासारखी मुळे फुटून ती लोंबत असतात. ती कधीकधी जमिनीपर्यंत असतात आणि कधीकधी जमिनीपर्यंत पोहोचून जमिनीतही जातात. मात्र या वेलीचे अस्तित्व जमिनीवर न राहता इतर वृक्षांवर असते, म्हणजेच ती परधारिणी असते. आंबा, जांभूळ, करंज इत्यादी मोठ्या झाडांवर ती येते आणि बांडगुळासारखी सर्व बाजूंनी ताणे पसरवत आपला विस्तार करीत जाते. त्यामुळे; ज्याप्रमाणे मधामधे अनेक झाडांचे गुणधर्म उतरलेले असतात, त्याप्रमाणे गुळवेलीतही तिच्या अंगभूत गुणांबरोबर त्या-त्या झाडांचे गुणधर्मदेखील उतरलेले दिसतात. आंब्याच्या झाडावर वाढणारी गुळवेल अधिक उपयुक्त आणि प्रभावशाली असल्याचे सांगण्यात येते.

या वेलीची पाने कशी? तर नागिणीच्या मोठ्या पानांसारखी दिसणारी, पण गुळगुळीत, हृदयाकृती आणि एकांतराने वाढत जाणारी. पानांचे देठही लांब असते. फुले पिवळ्या रंगाची, बारीक आणि झुपक्याने येणारी असतात. फळेदेखील झुपक्याने येणारी, पण लाल रंगाची असतात. वेलीचा ताणा ताजा असताना साल हिरवे व मांसल असते आणि त्याच्यावर पातळ उदी रंगाची बाह्य त्वचा असते. तिचे पापुद्रे निघतात. ताण्यावर लहान-लहान गाठी असतात. मुळांचा गठ्ठा मोठा, नरम व भुसभुशीत असतो. हा दगडाच्या आश्रयाने असतो. म्हणून गठ्ठा असलेल्या गुळवेलीस मराठीत 'खडकी गरुडवेल' व संस्कृतात 'पिण्डगुडूचिका' म्हणून ओळखले जाते.

हा ताणा कुठेही आडवा कापला असता आतील भाग चक्राकार दिसतो. अगदी अशोक चक्रासारखा! त्याची सगळी रचना आणि वाढच अशी चक्राकार होत जाते.

गुळवेलीस वास नसतो, परंतु ती चवीस मात्र सर्वांगांनी कडू असते. तिचे जुनावलेले, पण ताजे आणि ओले ताणे औषधात वापरतात. तिची साल

खरडून टाकून उर्वरित भागांचे तुकडे करून कुटले जातात. तिचा काढा अथवा तिची भुकटी वेगवेगळ्या दुखण्यांवर औषध, तसेच शक्तिवर्धक टॉनिक म्हणून वापरली जाते. उन्हाळ्याच्या शेवटास, पाऊस पडण्यापूर्वी गुळवेल जमवावी. कारण पावसापूर्वी तिच्यात पिठाळ, कडू द्रव्य आणि रंग यांचा भरपूर साठा असतो.

अमेह, श्वसनदोष, काश, अर्श, मूत्रकच्छ, हृद्रोग, वात इत्यादी प्रकारच्या अनेक दुखण्यांवर गुळवेल अत्यंत परिणामकारक समजली जाते. तिच्या कडवटपणामुळे ती दूध अथवा मधाबरोबर घ्यायला सांगितले जाते. तसे न केल्यास हा अतिकडवटपणा शरीराला अपायकारकदेखील ठरू शकतो.

गुळवेलीचे सत्त्व करताना आधी तिची साल खरडून, बारीक तुकडे करून ती कुटली जाते. हे कुटण १२ ते २४ तास पाण्यात भिजवून, कुस्करून नंतर रवीने नीट घुसळले जाते. चोथा वेगळा ठेवून पाणी मिसळून वस्त्रगाळ केले जाते. अशी प्रक्रिया दोन-तीन वेळा केल्यानंतर उर्वरित पाणी उकळून त्याचा काढा केला जातो. आधीचा बाजूला काढून ठेवलेला वस्त्रगाळ या काढ्यात पुन्हा एकत्र करून तो उन्हात सुकवला जातो. अशा रितीने केलेले गुळवेलीचे सत्त्व मळकट पांढऱ्या पिठीसारखे दिसते आणि चवीला अतिशय कडवट असते.

मात्र असे कुठलेही औषध आयुर्वेदिक वैद्यांचा सल्ला आणि मार्गदर्शन यांनुसारच घ्यायला हवे. बाजारात गुळवेलीवर आधारित अनेक औषधे आरिष्ट आणि भुकटी यांच्या रूपात उपलब्ध असतात. अशी ही बहुगुणी गुळवेल भारतात सर्वत्र-विशेषतः रानावनांतून-उपलब्ध असून, वेगवेगळ्या नावांनी ओळखली जाते. कोकणात गरुडवेल, गोव्यात अमृतवेल, कर्नाटक आणि तामिळनाडूमध्ये अमृतवल्ली, आंध्रात तिषतिगे, गुजराथमध्ये गळो, बंगालमध्ये गुलच, हिंदीभाषक राज्यांमध्ये गिलोय आणि गुरच या विविध नावांनी ओळखली जाणारी ही अरण्यवासिनी वनस्पतिशास्त्रात Tinospora Cordifolia हे संबोधन धारण करते.

परकायेवर वाढत असूनही एवढे गुण धारण करणारी आणि आपले स्वतःचे वेगळे सत्त्व धारण करणारी, सर्वत्र अस्तित्व असलेली, चक्राकार अंतर्काया असणारी ही अरण्यावासिनी मन चक्रावून टाकणारी नाही असे कोण म्हणेल ?

लोकसत्ता : १६-८-२००२



# मोहमयी द्राक्षवेल!

सोबतच्या छायाचित्रातील वेलीवर लगडलेल्या घोसातील फळे ओळखायला येणार नाही, अशी व्यक्ती लहान मुलांपासून वयस्कांपर्यंत अगदी विरळाच. अगदी बरोब्बर! द्राक्षेच ती... पण 'ही' 'ती' मात्र नव्हेत हं! आपण नेहमी खातो त्यांपैकी नव्हेत. म्हणजे मूळ कूळ तेच, पण फळ थोडे व्रात्य झालेले. माणसांनी खायच्या थोडे पलीकडे गेलेले, जंगली झालेले. अगदीच खायचे नाही, असे नाही. कुतूहल म्हणून एखाद-दुसरे फळ चाखून बघायला हरकत नाही. चव गोडूस, बोळकट व तुरट असल्याचे चाखल्यावर आपल्या लक्षात येईल. मात्र जास्त खायचा प्रयत्न केला, तर घसा खवखवून त्रास सुरू झालाच म्हणून समजा. म्हणून त्या वाटेने नकोच जायला. सुरुवातीला अगदी राईच्या आकाराएवढी असलेली ही फळे करड्या, विटकरी रंगाची असतात. त्यानंतर हिरव्या रंगाच्या वेगवेगळ्या छटांतून प्रवास करीत पूर्ण पिकलेल्या अवस्थेत जाईस्तोवर ती जांभळी-जांभळसर काळपट अशी होत जातात. पोपटांना ती खायला आवडतात. त्यामुळे पोपटांचे थवेच्या थवे अशा वेलींच्या परिसरात दिसतात. माकडेदेखील ही फळे खात असावीत.

रानद्राक्षांचे घोसांवर घोस लटकत असलेली, रानातील झाडाझुडपांवर ऐसपैस पसरून आपले बस्तान बसविणारी जंगली द्राक्षवेल फार मोहमयी दिसते. तिची पाने-फळे अगदी हुबेहूब आपल्या नित्याच्या खाण्यातल्या द्राक्षवेलीसारखी दिसतात. मात्र तिच्यापेक्षा ही वेल मोठी असते. पानेदेखील आकाराने थोडी मोठी वाटतात. ती कंदमय असून, मध्यमूळ धारण करणारा तिचा कंद हातभर लांब, दोन्ही टोकांस निमुळता होत जाणारा, साधारणतः मनगटाएवढा जाड असतो. उदी रंगाचे आणि हातभर लांबीचे ह्याचे ताणे दिवसागणिक भराभरा वाढत जातात. भराभरा वाढणारी म्हणजे कशी? तर चक्क दिवसांतून दोन-दोन, तीन-तीन फुटांनी वाढत जाणारी. बहुवर्षायू असलेला कंद जमिनीत ठाण मांडून असतो. पहिल्या, अगदी बारीकशा का

होईना, पावसाची चाहूल लागताच तो ‘शूट’ होतो आणि मग काय, इतर वेलींनी हातपाय पसरायला सुरुवात करायच्या आधीच बेभान होऊन ही वेल आपल्या आसपासचा परिसर व्यापून टाकते. उन्हाळ्यात निष्पर्ण झालेल्या जवळपासच्या वृक्षांना आपल्या मोहजालात अडकवून ठेवते. ती वृक्षांवर पसरते, तशीच जमिनीवरपण धावते आणि मिळेल तेवढी जागा व्यापून टाकते. फांदी कसली, ताणाच तो ! कुठेही तोडला, तरी त्यातून पुष्कळ रस वाहतो. ती जेवढी भराभरा वाढते, तेवढीच भराभरा तुटून; अथवा वाळून तिचे तुकडे होऊन ती नष्टदेखील होऊ शकते. पावसाळा संपल्यानंतर, नोव्हेंबर–डिसेंबरनंतर, तिचे बाह्य अस्तित्व जाणवेनासे होते.

"Vitis Indica' हे शास्त्रीय नाव धारण करणारी ही वेल हिंदीत ‘आमधुक’, बंगालीत ‘अमोलूक’, तेलगूत ‘कोलेजान’, मल्याळम् आणि कोकणीत ‘चेंपरवल्ली’ म्हणून ओळखली जाते. औषध तयार करण्यात तिच्या मुळाचा वापर केला जातो. रक्तशुद्धी होण्यासाठी मुळाचा काढा करून किंवा मूळ नारळाच्या रसात वाटून दिले जाते.

ताजेपणी मूळ दाहजनक असते. त्यात जवरवार व चुना फार असतो. मेदन, मूत्रजनन, शोधन हे तिचे गुणधर्म आहेत.

रानावनातून हिंडताना तहानभूक लागलेल्या अरण्ययात्रींना तिची फळे खाण्याचा नितांत मोह होत असला, तरी त्यांना तो आवरावाच लागतो. कांडवेल, गोलिंद, खाजगोळी, आंबटवेल, घोरपडवेल, घोडवेल, नादेन, शामराज, भोजराज इत्यादी वेली द्राक्षवेलीच्याच कुळातील असल्या, तरी त्यातील प्रत्येक अरण्यवासिनी आपापले वेगळे अस्तित्व, रंगरूप आणि गुणधर्म टिकवून आहे.

आधार : डॉ. वामन गणेश देसाईकृत ‘औषधी संग्रह’. आभार : डॉ. रमाकांत बर्डे आणि सुनील चौधरी.

लोकसत्ता : २३–८–२००२



# जंगलातील आजीबाई ‘धावशी’

‘धावस’ अथवा ‘धावशी’ची वेल कुठल्याही अरण्याचे वैभव ठरावी अशीच असते. दीर्घायुषी असलेली धावस चक्क वृक्षासारखी दहा ते बारा फूट वाढत जातेच; परंतु सर्व दिशांनी फांद्या पसरवीत चक्क सगळ्या जंगलालाच आपल्या मायेच्या आवरणाखाली घ्यायची महत्त्वाकांक्षा ठेवते.

ही वेल भारतात सर्वसाधारणपणे सर्वच जंगलांतून आढळून येत असल्याची माहिती मिळत असली, तरी सह्याद्रीतील संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील तिचे अस्तित्व मन विस्फारित करून जाते. अहो, केवढा तो तिचा पसारा ! आणि कसले ते जाड आणि मजबूत होत जाणारे खोड ! सरसर वर चढत जाणारी ही वेल अवतीभोवतीदेखील तेवढ्याच वेगाने आणि प्रभावीपणे पसरत जाते. तिच्या फांद्यांतून जागोजागी ताणे निघत जाऊन, जवळपासच्या सर्व झाडा-झुडपांना आलिंगन देत जातात. तिची ही विस्तारण्याची प्रक्रिया बघितली, तर सहज तोंडातून शब्द बाहेर पडतात, ‘अगं, अगं धावसे, किती तू धावशी ?’ तिला उपमाच द्यायची झाली, तर जुन्या एकत्र हिंदू कुटुंब पद्धतीतल्या आजीबाईचीच द्यायला हवी ! जवळच्या, लांबच्या सर्वच नातेवाइकांवर आपल्या प्रेमाचा वर्षाव करीत त्यांना एकत्र बांधून ठेवण्याचा प्रयत्न ती करीत असते. जंगलात लावल्या जाणाऱ्या अघोरी आगीच्या भक्ष्यस्थानी पडणारे, बुंध्यापासून जळणारे अनेक वृक्ष केवळ अशा वेलींच्या आधाराने तग धरून जिंवत राहिलेले आपल्या दृष्टीस पडतात आणि मग सृष्टीतील त्या वेलींचे महत्त्व आपल्या लक्षात येते.

हिची पाने कशी ? उक्षीच्या पानांसारखी, पण त्याहून थोडी मोठी आणि पुढे निमुळती होत जाणारी. तिला लवंगेसारख्या, तांबड्या रंगाच्या फुलांचे कळे येतात. त्यातून लाल फुलांचे तुरे मोठे होत जातात. ही फुले औषधात वापरतात. आसवांत फुले घातल्याने त्याला चांगला रंग येतो. त्याच्यात २०.५ टक्क्यांपर्यंत टॅनिन असते.

धावस संग्राहक असते. अतिसार आणि जुन्या आवेवर या फुलांचा अवरोह देतात. मुख्य म्हणजे धावशीच्या पाल्याचा रस मण्यारी जातीच्या सापाच्या विषावर चांगला उतारा समजला जातो आणि कोकणात त्याचा फार आधीपासून उपयोग केला जातो. तिच्या पाल्याचा रस पोटात देतात, नाकात पिळतात आणि सर्वांगास चोळतात. पित्ताने डोके चढले असल्यास हा रस डोक्यावर चोळतात व तो चोळताना तोंडात तेलाचा गुळणा धरण्यास देतात. धावस संस्कृतात 'धातकी', तर हिंदीत 'धाई' अथवा 'धुव' या नावाने ओळखली जाते. वनस्पतिशास्त्रात ती 'वुडफोर्डिआ फ्लोरिबर्डा' (Woodfordia Floriburda) या नावाने ओळखली जाते. ठाणे-मुंबई संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील येऊर, चेना, मुलुंड, नागला इत्यादी वनांमधून एक छोटासा फेरफटका मारला, तरी धावशीचे रानातील अस्तित्व आणि वैभव आपल्या नजरेत भरते. होय, नजरेत भरावी अशीच मजबूत आहे ही चक्रावणारी अरण्यवासिनी !

**आधार :- वासुदेव गणेश देसाईकृत, 'औषधी संग्रह'**

**आभार :- डॉ. रमाकांत बर्डे, सुनील चौधरी.**

लोकसत्ता : ७-६-२००२



# घोटाळ्यात घोटाळा, वेलींचा भेंडोळा

संजय गाधी राष्ट्रीय उद्यान म्हणजे असंख्य प्रकारच्या रानवेलींचे आगरच! विशेषतः त्यातील चेना विभागाचा मुद्दाम उल्लेख करावा लागेल. अनेक ठिकाणी प्रचंड वृक्षांच्या खोडाप्रमाणे जाडजूड झालेल्या या महाकाय वेलींकडे बघून आपण अमेझॉन नदीच्या खोऱ्यात आलो आहोत की काय असे वाटायला लागते. त्यांतील धावशी, करंजवेल, पळसेवल आदी वेलींना जर मनुष्यप्राण्यांकडून होणाऱ्या विध्वंसापासून स्वतःचा बचाव करत निर्वेधपणे वाढायला मिळाले, तर त्यांची वाढ अशी झपाट्याने होत जाते की, विचारता सोय नाही. एकेका वेळी पंचवीस-तीस वृक्षांना आपल्या कवेत घेणाऱ्या या वेलींचे मूळ कुठे आहे हेच शोधता-शोधता नाकी नऊ येतात!

शेजारच्या छायाचित्रातील हा धावशीचा वेलच बघा ना! जाडसर दोरखंडाप्रमाणे एकमेकांना पीळ देत वाढलेल्या वेलीचे ताणे बघून कोणाला बरे टारझनगिरी करावीशी वाटणार नाही? अशा ठिकाणी माकडिणी आपल्या पिल्लांना या वेलींना धरून, एका वृक्षावरून दुसऱ्या वृक्षावर, तसेच नदीच्या एका तीरावरून दुसऱ्या तीराकडे जाण्याचे धडे देतानाही दिसतात. मात्र त्यासाठी आपल्याला येऊर परिसरातील धबधब्याशी न रेंगाळता वरच्या बाजूला असलेल्या मानीच्या ओढ्यात तयार झालेल्या बेटावर जाण्याची तयारी ठेवायला हवी!

यांतील प्रत्येक वेलीचे गुणधर्म तरी किती आणि कसे सांगावेत? काही वेलीची पाने-फुले आणि मूळ हे सारेच औषधी गुणधर्म असलेले. तर काहींची पाने आणि कंद यांची भाजी केली जाते. काहींची फुले आकर्षक, तर काहींचा पर्णसंभार वृक्षांना झाकोळून टाकणारा! द्राक्षवेलीसारख्या काही वेलींना आपल्या खाण्यातल्या जांभळ्या रंगाच्या द्राक्षांप्रमाणे रानद्राक्षांचे घडच्या घड लागतात. ती खाल्ल्यास घशात प्रचंड प्रमाणात खवखवत असल्यामुळे ही द्राक्षे आपल्याला खाण्यासारखी नसली, तरी माकडे मात्र ती आवडीने खातात.

पळसवेलीला पळसासारखीच एकेका ठिकाणी तीन-तीन पाने येतात, तर करंजवेलीवर करंजवृक्षासारखीच पांढऱ्या रंगाची लहान-लहान फुले येतात. पावसाळा सुरू व्हायच्या सुमारे एक महिना आधीपासून द्राक्षवेली जमिनीखाली दडलेल्या आपल्या कंदांमधून ताणे पसरवायला सुरुवात करतात. त्याच्यावरून त्या-त्या परिसरात पावसाला सुरुवात केव्हा होणार याचा अंदाज बांधता येतो. पावसाला सुरुवात झाल्या झाल्या कंटोल्याचा वेल वाढत आपल्या पिवळ्या रंगाच्या फुलांनी आपले अस्तित्व जाणवून देतो. गुळवेल महाऔषधी, तर गुंजवेलीची मधुर पाने थकल्याभागल्या पांथस्थांची तहान भागवण्यास मदत करतात. यांचे गुणधर्म लक्षात घेऊन ठेवलेली यांची आदिवासी भाषेतली नावेच किती अर्थपूर्ण असतात! चकवा, एकोटा, गारवी, दयाळू, धायवेल, पहाडवेल, कारिंदा, कासट-कोंबळी आणिक काय काय! मला तर या वेलींचे आपल्या भाषेतील व्याकरणही कळत नाही. एकच वेल असेल, तर त्याचा उल्लेख पुल्लिंगी केला जातो. जसे जाईचा वेल, सागरगोट्याचा वेल आदी. मात्र अनेकवचनात आल्यावर 'ते वेल' असे न म्हणता 'त्या वेली' असा स्त्रीलिंगी उल्लेख केला जातो!

यांतील अनेक वेली लवचीक पण मजबूत असल्यामुळे रानावनात लाकूडफाट्यासाठी, तसेच गवतासाठी, जाणारे लोक या वेलींचा उपयोग लाकडाच्या मोळ्या, तसेच गवताचे भारे, बांधण्यासाठी करतात. एकाच प्रकारच्या वेलीस वेगवेगळ्या रानांतून वेगवेगळ्या नावांनी ओळखले जाते. त्यामुळे माझ्यासारख्या सामान्य माणसाचा अनेकदा गोंधळ होतो.

जून-जुलै महिन्यांत बोरीसारख्या ज्या वृक्षांची पाने झडतात अशा वृक्षांना बऱ्याचदा त्यांच्या जवळपास वाढलेल्या वेली आपल्या पर्णभाराने अशा बेमालूमपणे झाकून टाकतात की, आपल्याला त्या मूळच्या वृक्षाची ओळखही पटेनाशी होते. अनेक ठिकाणी रस्त्यांच्या कडेला असलेल्या विजेच्या खांबावरदेखील काही वेली अशाच पद्धतीने चढलेल्या आपल्याला दिसतात.

ठरावीक प्रकारच्या वेलींचे ठरावीक प्रकारच्या वृक्षांशी अधिक सख्य असते की काय? आपल्याला आवडणाऱ्या वृक्षांच्या आधाराने स्वतःची वाढ करून घेत, वृद्धापकाळी त्याच वृक्षांचे आधार होत राहणाऱ्या या वेली त्यांच्याच परिवारातील इतर वेलींचा दुःस्वास करतात काय? आपल्याला

आवडणाऱ्या वृक्षांपासून इतरांना लांब ठेवायचा प्रयास करतात काय? या प्रश्नांचा मागोवा घेणे फार उद्बोधक असते. प्राचीन संस्कृत ग्रंथ व साहित्यामधून याविषयी भरपूर माहिती उपलब्ध असल्याचे जाणकार सांगतात. आंब्याच्या झाडावर वाढलेल्या गुळवेलीत अधिक औषधी गुणधर्म असतात. आंब्याच्या झाडावर मिऱ्याचे वेलही चांगले वाढतात. याच रानावनातल्या वेली एकत्र नांदू शकत नाहीत, असं माझ्या निरीक्षणात आलेलं नाही. शेजारच्या छायाचित्रातच बघा ना! कुठला वेल कुठून सुरुवात होत, सूर्यशक्तीचा वेध घेत कुठल्या झाडावर चढत गेला तेच कळत नाही! आणि मग सहज सुचतात त्या ओळी अशा,

घोटाळ्यात घोटाळा, वेलींचा भेंडोळा।
जमेल तर धुंडाळा, नाहीतर गुंडाळा।।

महाराष्ट्र टाइम्स : २९-७-२००६

# झाकलं माणिक



संजय गांधी नॅशनल पार्क त्यांच्या मुख्यालयामुळे मुंबई शहर आणि बोरिवली परिसराशी जोडलं आहे. तरी सुमारे २१० किमी. अंतरावर पसरलेल्या या उद्यानाचा साठ टक्के भाग ठाण्याशी संबंध राखून आहे. ठाण्याच्या घोडबंदर रोडच्या नैर्ऋत्य बाजूने हद्दीपर्यंत नागला बंदर विभागाच्या हद्दीत पार्क आहे. या दोन्ही विभागांत निसर्गसौंदर्य दडलेले आहे. त्यांतील कोकणीपाडा, मानपाडा या विभागांचा उल्लेख मुद्दाम करावयास हवा. कारण या विभागाच्या परिसरातच फेरफटका मारताना सह्याद्री पर्वताचे छोटेखानी दर्शनच होते म्हणा ना!

एक हजार फूट उंचीपर्यंतच्या पर्वतरांगा, त्यांतील दाट वृक्षराई, ठिकठिकाणी असलेले पाण्याचे स्रोत, त्यावरील धबधबे आणि जलाशय, रस्त्यासाठी झालेली काटछाट आणि दगडांच्या खाणी यांमुळे ढासळणारे डोंगर आणि खळाळती चेना नदी या साऱ्यांचेच दर्शन होते.

कोकणीपाडा विभागातील वाडीलगतचे जंगल तर अगदी अलीकडील, म्हणजे गेल्या दहा वर्षांत विकसित झालेले आहे. 'हरियाली'ने या भागात विविध कॉलेज आणि शाळांच्या विद्यार्थ्यांच्या माध्यमातून वृक्षलागवडीस सुरुवात केली. संजय गांधी नॅशनल पार्कच्या प्रशासनाने त्या परिसरात नियोजित वृक्षलागवड करून निसर्ग परिचय केंद्र उभारले.

१९९६-९७ या कालावधीत उद्यान प्रशासनाच्या परवानगीने 'हरियाली'ने या परिसरात असलेल्या पाचपैकी चार दगडी खाणींचे रूपांतर सुंदर जलाशयांत केले. त्यांतील डोंगराच्या मध्यात वसलेला आणि वृक्षराईत लपलेला हरियाली तलाव तर खूपच आकर्षक आहे. अगदी जवळ गेल्याशिवाय या तलावाचे दर्शन होत नाही. पण पावसाळ्यात हा छोटेखानी तलाव भरलेला पाहणे खूपच आनंददायी असते.

चारही बाजूंनी वेगवेगळ्या जातींच्या वृक्षांनी घेरलेल्या या तलावात समोरच्या बाजूने एक सुरेखसा धबधबा कोसळत असतो. तो येतो याच

तलावाच्या वरच्या बाजूला अशाच तऱ्हेने विकसित केलेल्या ‘निरव’ जलाशयातून. यातून अधिकचे पाणी वाहत जाते ते खालच्या पक्षीसरोवरात. पावसाळी पाण्याचे नियोजन करण्यारी अशी सुरेख ‘थ्री टायर’ व्यवस्था इथे निर्माण झालेली आहे. या तलावात पाणी कमीकमी होत गेले, तरी अगदी पुढच्या पावसाळ्यापर्यंत पाणी टिकून असते. हे बिबळ्याचे पाणी पिण्याचे आवडते ठिकाण असावे, असे या परिसरातील त्याच्या पाऊलखुणा आणि विष्ठा यांवरून लक्षात येते. शांत राहून बघितले, तर माकडांची हालचाल दृष्टीस पडते. लक्ष... देऊन ऐकले, तर पक्ष्यांचे सुंदर सुंदर, सुखावणारे आवाज कानांवर पडतात.

पक्षीनिरीक्षकांनी येऊन तळ ठोकावा, असा हा परिसर आहे. लहानथोर, स्त्री-पुरुष आदी सर्वांनाच या तलावापर्यंत येणे शक्य असते. तलावाजवळ बसण्यास फारशी जागा नाही, किंबहुना तिथे गर्दी आणि गोंधळ न करता खालच्या बाजूच्या वृक्षराईत बसणेच अधिक सोइस्कर.

पावसाळ्याच्या दिवसांत ठाणे परिसरातील सर्वच लहानथोरांनी दर्शन घ्यावे, असे हे झाकले माणिक आहे.

महाराष्ट्र टाइम्स : १५-७-२००६

# सृष्टीचे मूलाधार



आत्तापर्यंत आपल्या सूर्यमालेतील सर्व ग्रहांपैकी फक्त पृथ्वी याच ग्रहावर जैविक सृष्टी अस्तित्वात असल्याचे आढळून आले आहे. या जैविक सृष्टीचे मूलाधार आहेत पृथ्वी, आप (पाणी), तेज (ऊर्जा-सूर्य), आकाश आणि वायू ही पंचमहाभूते. या पंचमहाभूतांपैकी कोणाही एकाला वगळले, तर जैविक सृष्टी नष्ट होऊन पृथ्वीची अवस्था, नुसती निर्मनुष्यच नव्हे तर, निर्जीव होईल. त्यामुळेच या पाचही घटकांचे आणि त्यांच्यावर आधारित जैविक सृष्टीच्या इतरही सर्वच घटकांचे अस्तित्व हे एकमेकांवर अवलंबून असते आणि म्हणूनच या सर्व घटकांनी स्वतःच्या अस्तित्वासाठी का होईना, परंतु इतरांचे रक्षण करतच जगायचे असते.

सोबतचे छायाचित्र या दृष्टीने किती बोलके आहे, पाहा! खडकाळ, डोंगराळ भागातून जाणाऱ्या चेना नदीच्या परिसरात घेतलेले हे छायाचित्र आहे. आपला आधार असलेली अवतीभोवतीची सर्व माती वाहून गेल्यानंतर केवळ विशाल शिळेचा आधार घेत तग धरून असलेल्या मोठ्या पायर वृक्षाची मुळे आपल्याला दिसताहेत. वृक्षाचा वरील भाग आपल्याला छायाचित्रात दिसत नसला, तरी त्याच्या मुळांवरून तो एक मोठा वृक्ष असल्याचे आपल्याला जाणवते. या वृक्षाची उंची किमान वीस फूट तरी आहे. ज्या शिळेचा आधार या मुळांनी घेतलेला दिसतो, त्याच शिळेला कवटाळून घेत, तिला आधार देत त्यांनी तिचे रक्षण केलेलं आहे. आजूबाजूच्या सगळ्या परिसराची झीज होत मजबूत खडकांचे एकेक भाग इतस्ततः विखरून जात असताना या वृक्षाच्या मुळांनी आधार दिलेली शिळा मात्र तग धरून आहे.

इवलाले बीज आणि त्यापासून तयार झालेल्या रोपापासून या वृक्षाची सुरुवात झाली असणार. हळूहळू मातीचा आधार घेत इटुकल्या मुळांनी खडकांच्या कपारीतून पसरायला सुरुवात केली असणार. ती मुळे अशी पसरत असतानाच वृक्षांच्या वरच्या भागातील पर्णिकांनी सूर्यशक्ती ग्रहण करत वृक्षवाढीसाठी आपला हातभार लावला असणार. त्याच वृक्षाच्या मुळांनी शोषलेले पाणी,

पानांनी निर्माण केलेले खाद्यान्न, खोडाने साठवलेली ऊर्जा यांचा ऊपयोग करत या वृक्षाने अधिकाधिक ऊर्जा निर्माण करण्याचे कार्य केले असणार. त्या इवल्याशा रोपाचा प्रत्येक घटक सतत असा कार्यरत राहिल्याने त्या रोपाचे वृक्षात रूपांतर झाले. आधी ते रोप इतरांच्या आधाराने वाढत राहणारे होते त्याची मुळे मोठी झाल्यावर इतरांचाच आधार बनून राहिली. याचेच नाव सहअस्तित्व!

मानवी जीवनाचेही असेच असते, नाही का? आईच्या उदरातून जन्म घेत आईवडील, भावंडे, नातेवाईक यांच्या अंगा खांद्यावर खेळत मोठे होणारे मूल बाल्य पार करून तारुण्यावस्थेत आल्यावर त्यांचाच आधार होऊन बसते.

खरे म्हणजे माणसाला या अवनीवरील सर्वात बुद्धिमान प्राणी समजले जाते. आपल्या गरजा भागवण्यासाठी तो सर्वाधिक प्रमाणात इतरांवर अवलंबून असला, तरी केवळ आपल्या बुद्धीच्या जोरावर इतर घटकांवर मात करत तो त्यांचा उपयोग आपल्या स्वार्थासाठी करू शकतो आणि तो तसे करतही असतो. याचमुळे असेल कदाचित, पण त्याचा लोभ वाढीस लागून तो आज खूपच संहारक झालेला आहे. आणि ज्या निसर्गाचे रक्षण करत त्याने आपले मार्गक्रमण करत पुढे जायचे असते, त्याच निसर्गाचा तो सगळ्यात मोठा भक्षक बनला आहे. याचे दुष्परिणाम मात्र त्याच्याच भावी पिढ्यांना अधिकाधिक प्रमाणात भोगायला लागणार आहेत.

हे टाळायचे असेल, तर त्याने छायाचित्रातील पायर वृक्षाची मुळे आणि शिळा यांप्रमाणे इतरांची मदत घेत आणि त्यांना मदत करत आपली वाटचाल करायला हवी. आपल्या अवतीभोवती दिसणाऱ्या अशा अनेक गोष्टींमधून आपल्याला खूप काही शिकता येण्यासारखे असते. नदीच्या पात्रातून अथवा कडेने, प्रचंड प्रमाणात झीज होत राहणाऱ्या डोंगरवाटांनी जाताना आपल्याला अनेक ठिकाणी असे वृक्ष दिसतात. पायर वृक्ष हा वड, पिंपळ, उंबर, औदुंबर यांच्या परिवारातील असून त्याची मुळे अशी लवचीक आणि खोलवर जाणारी, दीर्घायुषी असतात. हे सारे बघून, जाणून घेण्यासाठी आपल्या परिसरातून वेळोवेळी थोडीतरी भटकंती करत राहायलाच हवी. इतरांचा द्वेष आणि संहार करत नव्हे, तर त्यांच्यावर प्रेम करत आणि त्यांचे रक्षण करत जगायला हवे. वृक्षाच्या मुळांप्रमाणे असे सहजीवन नसले, तर व्यक्तीच्या अस्तित्वाला काही अर्थ उरत नाही हे नैसर्गिक सत्य माणसाने जाणून घ्यायला हवे आहे.

महाराष्ट्र टाइम्स : २२-७-२००६

# नवसंजीवनी देणारा मुंडा डोंगर



ठाण्याच्या तत्त्वज्ञान मंदिर चौकापासून घोडबंदर रस्त्याने बोरिवलीकडे निघालो की साधारणतः पंधरा किलोमीटर अंतरावर (जकात नाक्यानंतर) उजव्या हाताकडच्या मुंडा डोंगराकडे जाणारी एक पायवाट दिसते. या पायवाटेने आत शिरल्यानंतर आपण हळूहळू दाट होत जाणाऱ्या जंगलातच शिरतो.

नागमोडी वळणाने जात राहणारी ही वाट सुरुवातीलाच थोडेसे थांबत जायला लावणारा उभा चढ घेते. नंतर येणाऱ्या एका जोडवाटेच्या ठिकाणी डावीकडे वळण घेत चालत राहिलो की आपण एका छोटेखानी मोकळ्या पठारावर केव्हा येऊन पोहोचतो ते आपल्यालाच कळत नाही.

वाटेवर काही परिचित, तर काही नव्याने दृष्टीस पडणारे, छोटे-मोठे वृक्ष, वेली व झुडपे आपले स्वागत करतात. त्यात प्रामुख्याने साग, पळस, रानचिक्कू, आंबा, काळा-पांढरा कुडा, करवंदीच्या जाळ्या, बोरासारखी फळे धारण करणारा घोटी, पावसाळी द्राक्षवेल, रानतुळस आदींचा समावेश असतो. वाटेवरच्या बेहेडा, आंबा आणि पायर जातींच्या एकेका वृक्षाचा प्रामुख्याने उल्लेख करायला हवा. हा पायरवृक्ष तर एका विस्कळीत होत जाणाऱ्या खडकाच्या आधाराने आणि तो खडक या वृक्षाच्या मुळांच्या आधाराने तग धरून आहे.

वर्षानुवर्षे कुऱ्हाडीचे घाव सोसत राहावे लागल्यामुळे, खोड चांगले जाडसर असूनही उंचीला कमी राहिलेले साग आणि पळसवृक्ष इथे बऱ्याच संख्येने दिसतात. हे वृक्ष आणि त्यांच्या आधाराने वाढत आपल्या पानांनी वृक्षांना झाकून टाकणाऱ्या वेली यांमुळे डोंगरमाथ्यावर जाईस्तोवर फारसे सूर्यदर्शन होत नाही. मात्र या वृक्षराईतून बाहेर पडून एका मोकळ्या आणि छोटेखानी पठारावर आल्यावर काय अवस्था होते, हे शब्दांत सांगता येणार नाही. त्यातूनही भन्नाट वारा आणि चिंब भिजणारा पाऊस असला, तर विचारायलाच नको.

पृथ्वी, आप, तेज, वायू आणि आकाश कोणाला म्हणायचे, त्यांचे स्वरूप काय, सर्वच चराचर सृष्टीच्या अस्तित्वासाठी त्यांचे रक्षण करणे आवश्यक का आहे, हे आपल्याला अशा प्रकारच्या डोंगरावर आल्यावर आपोआप कळू लागते. उत्तरेच्या दिशेने खाली बघितले, तर गच्च तिवऱ्यांमधून पूर्व–पश्चिम वाहणारी उल्हास नदीची खाडी लक्ष वेधून घेते. त्यातून एकाच दिशेने होत राहणारी रेतीच्या पडावांची वाहतूक आपले मनोरंजन करते. त्याच दिशेने वर बघितले, तर कोरलाई आणि तुंगारेश्वराच्या डोंगराचे दर्शन होते. अजून थोड्या पूर्वेकडे पारसीक आणि मुंब्राच्या डोंगरांची रांग नजरेला पडते. दक्षिण दिशेला चेन्ना, काशिमीरा आणि गौळदेवाचे डोंगर आपल्या डोळ्यांना सुखावतात. मात्र दृष्टी त्याच दिशेने थोडी खाली वळवली, तर या डोंगरांना घोडबंदर रस्तारुंदीकरणाचे ग्रहण लागलेले जाणवते. विटा पाडण्यासाठी माती काढून जागोजागी झालेल्या खळग्यांमुळे जलसंचय झालेला दिसतो. अशा बऱ्याच ठिकाणांना छोट्या–छोट्या तलावांचे स्वरूप प्राप्त झाले आहे. घोडबंदर रस्त्यावरचा चेन्ना खाडी पूल आणि मुंबई–अहमदाबाद मार्गावरच्या वरसोवा खाडी पुलावरून लगबगीने जात असलेली छोटी–मोठी वाहने बघून आपले लक्ष अभावानेच मनगटावरच्या घड्याळाकडे जाते.

एरवी उजाड झालेल्या या पठारावर जागोजागी आपले अस्तित्व टिकवून ठेवलेले एकोट्याचे वेल आपल्याला त्या वेळी वाहत असलेल्या वाऱ्याची दिशा दर्शवतात. भरपूर पर्णभार लाभलेल्या या वेलींचे ताफे पाहून विपुल केशसंभार असलेल्या तरुणीचा भास होतो. स्वतः निष्पर्ण झाले असले, तरी जवळपास उगवलेल्या वेलींच्या मायेखाली उभे असलेले बोरीचे एकमेव काटेरी झाड आपल्यासोबत आलेल्या चित्रकारांना कुंचला बाहेर काढायला भाग पाडते. छायाचित्रकारांचे कॅमेरे आपोआपच बाहेर पडू लागतात. मात्र पाऊस चालू असला, तर या सगळ्यावर विरजण पडते.

उन्हाळ्यात मात्र सकाळी आठनंतर या डोंगरमाथ्यावर फार काळ उभे राहणे अवघड जाते. सातत्याने होत राहणाऱ्या कुऱ्हाडीच्या घावांमुळे या डोंगरमाथ्यावरचे वृक्ष कमी होत चालले आहेत. ऊन–वारा, पावसाचा मारा सातत्याने झेलत राहिल्यामुळे डोंगरावरच्या मातीची झीज होत जागोजागी काळे खडक उघडे पडू लागले आहेत.

त्याचबरोबर काही आशादायक बदलही घडू लागले आहेत. गेली काही वर्षं ‘हरियाली’चे कार्यकर्ते आणि त्यांच्या साथीने येणाऱ्या वेगवेगळ्या कॉलेजामधल्या राष्ट्रीय समाजसेवा विभागाचे विद्यार्थी या डोंगरमाथ्याला पुन्हा हिरवे करण्याचे प्रयत्न करत आहेत. ‘हरियाली’चे प्रकाश लोथे, रणजित मराठे, जयंत नागावकर, बोंडाळे, बहाळकर, देशपांडे, सुनील चौधरी आदी कार्यकर्ते व काही कॉलेजांमधले विद्यार्थी सातत्याने खास प्रयत्न करत असतात. त्यांची ही निष्ठा आणि प्रेम लक्षात घेऊन हा डोंगरमाथादेखील त्यांना सुरेख प्रतिसाद देऊ लागला आहे. महू, करंज, आपटा, चिंच, आंबा आदी वेगवेगळ्या वृक्षांच्या बिया आणि रोपे मूळ धरायला लागली आहेत. खडकांमधून वाटा काढत पसरणाऱ्या या मुळांमुळे वरच्या दिशेने वाढणारी रोपे आकार घेऊ लागली आहेत.

आपल्या घरापासून जवळच असणाऱ्या अशा डोंगरांकडे आपण कधीतरी आपले पाय वळवायला हवेत. थकणाऱ्या-भागणाऱ्या आणि गंज धरणाऱ्या आपल्या शरीराला नवसंजीवनी देणारे असे डोंगर खूप कमी उरले आहेत.

महाराष्ट्र टाइम्स : २२-९-२००६



# दिंडेश्वर महादेव अन् वृक्षपंढरी

जवळपास समुद्रसपाटीवर असलेल्या ठाणे परिसरात राहूनदेखील आकाशातील ढगांमधून विहार करण्याचा अनुभव आपल्याला घ्यायचा असेल, तर त्यासाठी अनेक सुंदर-सुंदर असे डोंगर आहेत. त्यातही सगळ्यांत निकट असलेला कोकणीपाड्यातील हरियाली डोंगर (दळीचे प्लॉट्स), ओवळ्याचा विंडीचा डोंगर, आपल्या भ्रमंतीत आपण आधी भेट देऊन आलो तो मुंडा डोंगर, गौळदेव, चेना व काशिमीरा इथले डोंगर यांचा खास उल्लेख करायला हवा.

त्याच पठडीतील परंतु ठाणे-नाशिक रस्त्यालगत (हायवे नंबर ३) असलेल्या दिंडेश्वर महादेव डोंगराचाही (चेना नावाचाच दुसरा डोंगर) खास परिचय करून घ्यायला हवा. ठाणे वनविभागाच्या हद्दीत येणारा हा डोंगर ठाण्यापासून सुमारे २० किलोमीटर, कल्याणपासून सुमारे १० किलोमीटर, तर भिवंडीपासून केवळ ५ किलोमीटर अंतरावरच आहे. हे सर्वच डोंगर सुमारे ७०० ते १००० हजार फूट उंचीचे असून चढून जायला फारसे अवघड नाहीत. दिंडेश्वरला तर आता वर दिंडेश्वर महादेवाच्या देवळापर्यंत जीपने जाण्यासारखा रस्ताच होऊ घातला आहे! त्यामुळे आबालवृद्धांना तिथे जायला अजून सोपे होणार असले तरी, पावसाळ्यात तिथे दाटी-वाटीने उतरणारे ढग पुन्हापुन्हा येत राहतील की नाही याबद्दल शंका आहे. तिथे बागडणारे मोर आणि मधूनच दृष्टीस पडणारे तरस, तसेच देवळाकडे जायच्या रस्त्यालगत असलेल्या जंगलात सातत्याने वस्तीला येणारे पक्षी दिसत राहतीलच, असेही सांगता येत नाही.

परिसरात असलेली दाट वृक्षसंपदा हळूहळू कमी होत असली, तरी झुडूपी जंगल अजून बऱ्याच प्रमाणात शिल्लक आहे. त्यातही काळा-पांढरा कुडा, बारामुखी आदींचा खास उल्लेख करायला हवा. पळस, पांगारा, काटेसावर, साग इत्यादीदेखील भरपूर प्रमाणात आहेत. मात्र वर्षानुवर्षे कुऱ्हाडीचे घाव आणि मानवनिर्मित आगींची धग सोसावी लागत असल्यामुळे त्यांची वाढ,

उंची, तसेच पसारा खुरटत गेल्याचे जाणवते. नाही म्हणायला डोंगराच्या पायथ्यालगत वनविभागाने लावलेले सागाचे वृक्ष काही स्थानिक लोकांच्या निगराणीखाली असल्यामुळे बऱ्यापैकी वाढत असल्याचे दिसते. ठाणे वनविभागाच्या परवानगीने आणि सहकार्याने 'हरियाली'तर्फे अनेक शाळा आणि कॉलेज यांच्या विद्यार्थ्यांना बरोबर घेऊन या परिसरात गेली तीन वर्षे वृक्षलागवड होत असते. मात्र दृश्य स्वरूपात त्याचे परिणाम दिसायला अजून किमान दोन वर्षे लागतील. एक मात्र खरे की, ठाणे परिसराची वृक्षपंढरी म्हणून विकास होण्याची या डोंगराची क्षमता उत्तम आहे. 'हरियाली'च्या माध्यमातून बांदोडकर, मुलुंड वाणिज्य, काळसेकर, साळवी, मेनन, ठाकूर, वझे आदी कॉलेजांचे राष्ट्रीय छात्रसेवा विभाग, तसेच भगवती, सेंट मेरीज एंजल आदी माध्यमिक शाळांचे विद्यार्थी आत्तापर्यंत वृक्षलागवडीच्या या कार्यात सहभागी झालेले आहेत.

तीन प्रमुख टेकड्या मिळून तयार झालेल्या या डोंगराच्या मधील टेकडीवर दिंडेश्वर महादेवाचे छोटेखानी पण सुंदर देऊळ आहे. एका बाजूला खोल दरी असलेल्या कड्यावर उभ्या असलेल्या या देवळाच्या परिसरात सतत वाहत असलेला भन्नाट वारा आपले स्वागत करत असतो. देवळात नेहमीच नंदी, शंकरपिंड, गणपती, ग्रामदेवता आदींचे अस्तित्व जाणवते. (ईशान्येकडे) प्रदूषणयुक्त धुक्याच्या आवरणाखाली सुस्तावलेले भिवंडी शहर दिसते. पूर्वेकडे त्याच अवस्थेतील कल्याण-डोंबिवली शहरे व त्यांच्या परिसरातून नागमोडी वळणं घेत जाणारी उल्हास नदी आपले लक्ष वेधून घेतात.

आपल्या स्वतःच्या प्रकृतीची काळजी न करता, आपल्या काठावरील बदलापूर, अंबरनाथ, उल्हास, कल्याण, डोंबिवली आदी अजागळरीत्या वाढणाऱ्या शहरांमधील सांडपाणी वाहून नेण्याचे कार्य करायला लागत असल्यामुळे, इथून पुढे ही नदी सतत दुथडी भरून वाहताना दिसत असते. मुंबई-नाशिक महामार्गावरील वाहतूक आणि तानसा वैतरणा-भातसा आदी जलाशयांकडून येणाऱ्या जलवाहिन्यादेखील आपल्या अस्तित्वाची जाणीव करून देतात. डोंगराच्या उत्तर-पश्चिम (वायव्य) दिशेला थोडे खाली उतरून गेलो, तर पुरातन समजल्या जाणाऱ्या पाताळनाथ देवळाचे पडके अवशेष चार-दोन शिळांच्या रूपाने दिसतात.

पावसात चिंब होण्याचा आनंद लुटायचा असेल, तर इथे पावसाळ्यातच यायला हवे. पळस-पांगारा-सावर आदी वृक्षांच्या फुलांकडून होणारी रंगांची उधळण न्याहाळायची असली, तर यायला हवे फेब्रुवारी-मार्च महिन्यांत. देवळात येणाऱ्या भाविकांची श्रद्धा अनुभवायची असली, तर यायचे महाशिवरात्रीला. पायथ्याच्या घोळ या छोटेखानी गावातच सोनाळे गट पंचायतीचे विद्यमान सरपंच असलेल्या अनंतराव मढवी यांचे ३५ जणांचे अविभक्त कुटुंब राहते. त्यांचे धाकटे बंधू भगवान मढवी यांचे वृक्षवल्लींवर असलेले खास प्रेम व त्याविषयीचे ज्ञान लक्षात येते. या ठिकाणी पोहोचण्यासाठी ठाणे-कल्याण-डोंबिवलीकडून येणाऱ्या भिवंडी बसने पाइपलाईन स्थानकावर उतरून पायथ्यापर्यंत सुमारे दोन किलोमीटर पायी चालायला लागते.

'हायवे नंबर ३'ने आपल्या वाहनांनी येणाऱ्या लोकांना कल्याण-भिवंडी जंक्शनपासून शहापूरच्या दिशेने सुमारे तीन किलोमीटर अंतरावर डावीकडे सोनाळे गावाचा (उजवीकडे बाण दाखवणारा) फलक दिसतो. तिथून डावीकडे जाणाऱ्या छोटेखानी रस्त्याने सुमारे तीन किलोमीटर अंतरावर दिंडेश्वर डोंगराच्या पायथ्याशी असलेल्या घोळ गावापर्यंत आपली वाहने नेता येतात. पक्षीनिरीक्षकांनी आत्तापर्यंत दुर्लक्ष केलेला, पण खास लक्ष द्यायला हवे असाच, हा सुंदर डोंगर आहे.

महाराष्ट्र टाइम्स : ७-१०-२००६

# रानवणवे ( ? ) आणि वृक्षलागवड



इ.स. २०१५ मधील ठाणे शहराची पर्यावरणासंबंधी काय परिस्थिती असेल याचे अंदाज बांधताना आधी या शहरातील आजचे पर्यावरण कसे आहे याची माहिती असणे आवश्यक आहे.

पर्यावरण म्हणजे नुसतेच वातावरण आणि त्यातील हवा नव्हे, तसेच नुसतीच सभोवतालची झाडे-झुडपे नव्हेत. मात्र ते पर्यावरणातील महत्त्वाचे घटक अवश्य होत. या पर्यावरणात समावेश होतो समग्र परिसराचा. शहराची रचना, त्यातील रस्ते, इमारती, निसर्ग, पिण्याचे पाणी आणि सांडपाण्याची व्यवस्था, वाहतूक व्यवस्था इत्यादी सर्व गोष्टींचा विचार केल्याशिवाय पर्यावरणाचा विचार करता येणार नाही. मात्र एखाद्या शहराचे पर्यावरण कसे आहे हे मापण्याचे प्रमुख दंडक म्हणजे तेथील हवा आणि परिसर हे होत. हवेत प्रदूषण असले, परिसरात अस्वच्छता असली, तर तेथील पर्यावरण ढासळलेले आहे असे आपण म्हणतो.

१९९७ मध्ये झालेल्या एका पाहणी अहवालानुसार ठाणे शहरातील हवा मुंबईपेक्षा अधिक प्रदूषित असल्याचे आढळून आलेले आहे. तसेच येथील वृक्षराईचे प्रमाणदेखील खूपच कमी झाल्याचे आढळून आले आहे. गेल्या २५/३० वर्षांत येथील हवामानातदेखील खूपच बदल झाल्याचे जुने रहिवासी सांगत असतात. अरुंद रस्ते, त्यावरदेखील असलेली अतिक्रमणे, कोलमडलेली वाहतूक व्यवस्था, घाणीचे ढिगारे, वाढत्या झोपडपट्ट्या, वातावरणात मिसळलेले नाना तऱ्हेचे गंध आणि आवाज, रस्त्यांवर हिंडणारी मोकाट गुरे आणि कुत्री, दुर्गंधियुक्त पाणी ओसंडून वाहणारे उघडे नाले, रस्त्याच्या कडेने आणि मोकळ्या जागांवर होणाऱ्या प्रातर्विधिक क्रिया या सर्व घटकांनी आज ठाणे शहर विद्रूप झालेले आहे. त्यामुळेच मुंबई किंवा इतर कुठल्याही औद्योगिक शहरांपेक्षा ठाणे शहरातील पर्यावरण आज वेगळे नाही. परिसर विद्रूप करण्यात आणि वातावरण प्रदूषित करण्यात हे सर्व घटक गेली पन्नास

वर्षे आपापल्या परीने हातभार लावत आहेत आणि हे असेच चालू राहिले, तर पुढील पंधरा ते वीस वर्षे ही परिस्थिती अधिकच खालावणार आहे. दर वर्षी सरासरी अर्धा डिग्री सेल्सियसप्रमाणे येथील हवामानातील उष्णता वाढत राहणार आहे आणि जमिनीखालील पाण्याची पातळी दर वर्षी किमान एकेका फुटाने खाली जात राहणार आहे. वाढत्या औद्योगिकीकरणामुळे बाहेरून येणारे लोकांचे लोंढे आणि स्थानिक लोकांची कर्तबगारी यांमुळे लोकसंख्या वाढत जाणार आहे. त्यामुळे नागरी सुविधांवर अधिकाधिक ताण पडत राहून त्यांची कमतरता भासणार आहे. साथीचे रोग पसरवून मृत्यूचे थैमान घालण्यास शहरातील अस्वच्छता केव्हा कारणीभूत होईल हे सांगता येत नाही. कर्त्या तरुण पिढीचे एका वेळचे जेवण आत्ताच दोन पोळ्या आणि अर्धा मूद भातावर आलेले आहे. समाजात लोकशाही रुजलेली असली, तरी सामाजिक स्वास्थ्याची जाण आणि कळकळ असलेले सक्षम लोकप्रतिनिधी निवडून देण्याची क्षमता या समाजात आलेली अजून दिसून येत नाही. त्यामुळे या परिस्थितीत काही सुधारणा होण्याची काही शक्यता दिसत नाही.

मात्र हे खरेच का असे होत राहणार आहे? या विध्वंसक घटकांना आळा घालणारे दुसरे पर्याप्त घटक नाहीत काय या वातावरणात? पर्यावरणाच्या ढासळत्या बुरुजांना आधार देऊन सावरणारे आणि त्यांना मजबूत करणारे कारागीर नाहीतच काय निसर्गात आणि या समाजात? काय आणि कसे करता येईल ? कोण करू शकेल ? जेणेकरून इसवी सन २०१५ मधील ठाणे शहरातील नागरिक पर्यावरणाच्या बाबतीत आजच्यापेक्षा अधिक सुखी होण्याची शक्यता नसली तरी निदान अधिक दुःखी होणार नाहीत?

खरे म्हणजे, समाजातील वाढत्या भ्रष्टाचाराप्रमाणेच वातावरणातील ढासळणारे पर्यावरण ही समस्या एखादे शहर, राज्य अथवा राष्ट्र यापुरतीच मर्यादित राहिलेली नसून तिने आंतरराष्ट्रीय स्वरूप धारण केले आहे. तरीदेखील ठिकठिकाणच्या स्थानिक परिस्थितीप्रमाणे तिच्यावर कमी-अधिक प्रमाणात मात करता येणे शक्य असते. आणि त्याच दृष्टिकोणातून आपण ठाणे शहराचा विचार करायचा आहे.

समृद्धीसाठी आपल्याला औद्योगिक वाढ हवी असते. त्यामुळे औद्योगिक प्रक्रिया आणि पेट्रोलवर व डिझेलवर चालणाऱ्या वाहनांची वाढती संख्या

यांतून निर्माण होत राहणारे प्रदूषण आपल्याला सर्वस्वी टाळता येणे शक्य नाही. मात्र, प्रदूषणविषयक आवश्यक ते कायदे करून व त्यांची कडक अंमलबजावणी करीत राहून या प्रदूषणावर थोड्याफार प्रमाणात अंकुश ठेवता येणे शक्य असते.

या सर्व प्रदूषणावर मात करण्याची क्षमता निसर्गातच आहे. या निसर्गाचे रक्षण आणि वृद्धी करणे मात्र मानवावर अवलंबून असते. या निसर्गाचे प्रमुख घटक म्हणजे सभोवतालची हिरवळ, वाहते पाणी, तसेच तलावांमधून साठविलेले व स्वच्छ ठेवलेले आणि भूगर्भाखालील पाण्याचे साठे हे होत. याबाबतीत ठाण्याची भौगोलिक परिस्थिती नुसतीच फार चांगली आहे असे नव्हे, तर त्यादृष्टीने ठाणे नुसते महाराष्ट्रातीलच नव्हे, तर सबंध भारतातील सर्वाधिक सुंदर शहर बनण्याची क्षमता ठेवून आहे. शहराच्या तीन बाजूंनी उंच असे सुंदर डोंगर, पावसाळ्यात त्यांतून खळाळत जाणारे पाणी, अगदी शहराजवळून जाणारी वीस किलोमीटर लांबीची खाडी, शहर आणि शहराभोवती असलेले असंख्य तलाव, भारतातील किती शहरांच्या वाट्याला आलेले आहेत?

सबंध मुंबई आणि ठाणे शहराला प्राणवायूचा पुरवठा करणाऱ्या आणि एकशे दहा चौरस किलोमीटरवर पसरलेल्या संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाचा अर्ध्याहून अधिक भाग ठाणे शहराचाच अविभाज्य भाग आहे याची जाणीव ठाणे शहरातील किती नागरिकांना आहे? मात्र या उद्यानात दरवर्षी जेवढे वृक्ष लावले जातात, त्यापेक्षा कितीतरी अधिक तोडले जातात किंवा नष्ट केले जातात ही वस्तुस्थिती आहे. पोटाची कधी न विझणारी आग शमविण्यासाठी या डोंगरावर याच दिवसांमध्ये ठायी-ठायी आगी लावल्या जातात. पोटाचा न भरणारा खळगा बुजविण्यासाठी या डोंगरातील माती चोरली जाते अन् दगड फोडले जातात आणि मग त्यात भस्मसात होतात प्राणवायूचा पुरवठा करणारे कोट्यवधी रुपये किमतीचे वृक्षरूपी कारखाने! त्यात भर म्हणूनच या उद्यानावर सर्व बाजूंनी आक्रमण होत असते. देशाच्या कानाकोपऱ्यातून येणाऱ्या लोकांच्या लोंढ्यांकडून हे सर्व थांबविता आले, तर नुसतीच प्रदूषणावर मात करता येईल असे नव्हे, तर शहराच्या सौंदर्यातही भर टाकता येईल. मात्र त्यासाठी आवश्यकता आहे ती तरुण, संवेदनशील मनांची आणि वणव्यांची तमा न बाळगता वृक्ष लावणाऱ्या हजारो हातांची!

जळत्या डोंगरांबरोबरच शहर आणि सभोवतालचे तलाव पोरके झालेले आहेत. त्यात साठलेल्या पाण्याचा उपयोग सर्जनापेक्षा विसर्जनासाठीच अधिक होत असतो! त्यामुळे दिवसेंदिवस त्यातील पाण्याचा साठा कमी होत जाऊन गाळात मात्र वृद्धी होत असते. आहे हे थांबविण्याची क्षमता आपल्या समाजात?

ज्या खाडीचा उपयोग तरुणांचे साहसपूर्ण क्रीडाप्रकार वाढविण्यासाठी आणि पक्ष्यांना आकृष्ट करण्यासाठी व्हावा, तिचा उपयोग कारखाने आणि शहरातील सांडपाणी सोडण्यासाठी फक्त होत असतो. त्यामुळे प्रदूषणाला अटकाव करण्याचे काम निसर्गातील हे घटक करणार कसे?

निसर्गातील या घटकांबरोबर इतरही काही घटक या प्रदूषणाला अटकाव करण्याचे काम करू शकतात. ते म्हणजे जागरुक शासन, कार्यक्षम अधिकारी, सुजाण नागरिक, सामाजिक जाणिवा जागत्या ठेवून पर्यावरणविषयक काम करणाऱ्या सेवाभावी संस्था, लोकशिक्षणाचे कार्य जबाबदारीपूर्वक पार पाडणारी प्रसिद्धिमाध्यमे आणि आपल्या भवितव्याविषयी जागरुक असणारे तरुण आणि बाल विद्यार्थी-विद्यार्थिनी. शेकडो हितसंबंधी लोकांचे शिव्याशाप खात शहरातील अतिक्रमणे आणि घाण दूर करणारे अधिकारी लाखो लोकांच्या सदिच्छा मिळवितात. हितसंबंधी लोकांचे दडपण आणि प्रलोभने यांना बळी न पडता वनजमिनीवरील अतिक्रमणे उठविण्याचे आणि मानवनिर्मित वणव्यांपासून वृक्षांचे रक्षण करणारे कार्यक्षम अधिकारीदेखील दिसतात. वृक्षवृद्धी आणि पर्यावरणविषयक जागरुकता निर्माण करणाऱ्या हरियाली, होप, जिज्ञासा यांसारख्या संस्थादेखील कार्यरत होताना दिसत आहेत. शाळा-कॉलेजांतील विद्यार्थी विद्यार्थिनी हिरीरीने त्यांच्या कार्यात सहभागी होताना दिसतात. त्यामुळेच ढासळत्या पर्यावरणविषयी निर्माण होणाऱ्या प्रश्नांची जाण नागरिकांमध्ये येताना दिसते आहे. अधिकारिवर्गाला आपले अधिकार आणि सामर्थ्य यांची जाणीव होताना दिसत आहे. तरुणांमध्ये दर्जेदार जीवन जगण्याची अभिलाषा निर्माण होताना दिसत आहे.

वृत्तपत्रे, दूरदर्शन या माध्यमांतून पर्यावरणविषयक कार्यक्रमच नव्हेत, तर त्यांच्या मालिकाच लोकांपुढे येताना दिसताहेत.

अशा वेळी शहरातील प्रदूषण वाढविणारे घटक आणि त्याला अटकाव करणारे घटक यांपैकी कोण अधिक कार्यरत राहून आपल्या क्षमतेचा अधिकाधिक उपयोग करण्यात यशस्वी होतात, यावर अवलंबून असणार आहे इसवी सन २०१५ मधील ठाण्याचे पर्यावरण!


मात्र आज सुजाण नागरिकांना एवढेच सांगावेसे वाटते की, वेळीच जागे व्हा. आपला परिसर नष्ट होऊ देऊ नका. परिसर नष्ट झाला, तर समाज भ्रष्ट होतो आणि समाज भ्रष्ट झाला, तर सृष्टी नष्ट होते हे लक्षात ठेवा.

लोकसत्ता : १३-३-१९९८

# काशेडीतील बदलते अस्मानी रंग














अंकुर प्रकाशन, ठाणे
जिथे शिक्षणातून
ज्ञान उमलते

# ग्यानबाची भटकंती

पुनम सिंगवी

हरियाली





